Smart ways for 100% success at the SSC Board Exam

**EXCLUSIVE STUDY MATERIAL FOR SSC STUDENTS**

**Subject** : Social Science.

**Prepared by**

State Council of Educationnal Research And Training ( SCERT – PUNE )

**In association with**

Department of Social Sciences
SCERT PUNE

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे महाराष्ट्र

## इयत्ता 10 वी पुनर्परीक्षार्थींसाठी साहित्य निर्मिती

## विषय : इतिहास व राज्यशास्त्र ( पेपर - 01 )

## नमुना प्रश्नपत्रिका , उत्तरपत्रिका व प्रश्नपेढी

# --अनुक्रमणिका--


| अ.क्र. | पुनर्परीक्षार्थींसाठी साहित्य | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 01 | इतिहास राज्य. सराव प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका – 01 | 4 ते 15 |
| 02 | इतिहास राज्य. सराव प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका – 02 | 16 ते 26 |
| 03 | इतिहास राज्य. सराव प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका – 03 | 27 ते 36 |
| 04 | इतिहास राज्य. सराव प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका – 04 | 37 ते 49 |
| 05 | इतिहास राज्य. सराव प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका – 05 | 50 ते 58 |
| 06 | इतिहास राज्य. सराव प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका – 06 | 59 ते 71 |
| 07 | इतिहास राज्य. प्रश्नपेढी | 72 ते122 |

# SSC बोर्ड परीक्षेत 100% यश मिळवण्याचे स्मार्ट मार्ग

## दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष अभ्यास साहित्य

## विषय: इतिहास

### पुस्तिकेची उद्दिष्टे

ही पुस्तिका पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी तयार करण्यात आली आहे.पुरवणी परीक्षा जुलै 2024 आणि त्यानंतरही होणाऱ्या परीक्षा मध्ये याचा उपयोग होणार आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे. त्यांना आगामी परीक्षेत चांगले गुण मिळवण्यास मदत होईल, इतरांपेक्षा मागे असलेले विद्यार्थी या प्रकारे त्यांना मदत करून, आम्हाला त्यांना जगवायचे आहे .

व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणायचे आहे. ते त्यांचे पुढील शिक्षण सुरू ठेवतील. ते शिक्षण सोडणार नाहीत. प्रथमच अपयशाचा सामना केल्यानंतर त्यांचा अभ्यास चांगला व्हावा, हे साहित्य विविध तज्ज्ञांद्वारे पद्धतशीर आणि सर्वात सोप्या पद्धतीने तयार केलेला आहे. विद्यार्थी जागरूक आहेत पाठ्यपुस्तक तसेच परीक्षा पद्धतीचे ज्ञान त्यांना आहे. तरीही, ही पुस्तिका प्रत्येक विभागाचा तपशीलवार वर्णन करते. पुस्तिकेत सुचविल्याप्रमाणे अभ्यास केल्याने, आम्हाला खात्री आहे की, विद्यार्थी यश प्राप्त करतील दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांसह भरपूर सराव करण्यास सक्षम व्हा. ते स्कोअर करतील आणि या जगात पाऊल टाकतील.यश प्राप्त करण्यासाठी मुख्य उद्दिष्टे खालीलप्रमाणे सारांशित केली जाऊ शकतात.

1) दहावीला आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक अभ्यास साहित्य उपलब्ध करून देणे.

2) 100% यश मिळविण्यासाठी प्रत्येक सरासरी आणि सरासरीपेक्षा कमी विद्यार्थ्यांना मदत करणे.SSC बोर्ड परीक्षा.

3) सरासरीपेक्षा कमी गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त गुण मिळवण्यासाठी प्रवृत्त करणे.

4) सामाजिकशास्त्रमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी संघर्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी व शिक्षकांना मदत करणे या सामग्रीच्या मदतीने एसएससी बोर्ड परीक्षेतील विषय विभाजित केले आहेत.

सराव प्रश्नपत्रिका – 01

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास | एकूण गुण : 40

---

**सूचना :**

(1) सर्व प्रश्न / कृती सोडविणे आवश्यक आहे.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे / कृतीचे पुन गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न / कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न / कृती राज्यशास्त्र या विषयावरील आहे.

(4) प्रश्न क्रमांक 2 (अ) आणि 8 (ब) मधील संकल्पनचित्रे / कृती त्याचा नमूना अराखड्यात पेनाने / पेन्सिलीने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(5) प्रश्न 1 ला (अ) , (ब) व प्रश्न 6 वा या प्रश्नाची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर ही गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

**प्र.1 ( अ ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **3**

**(1)** दूरदर्शन हे ------------ माध्यम आहे.

अ) दृक

ब) श्राव्य

क) दृक – श्राव्य

ड) यापैकी नाही

**(2)** महाराष्ट्रात तयार होणाऱ्या लाकडी बाहुलीला ------------- म्हणत.

अ) ठकी

ब) कालीचंडिका

क) गंगावती

ड) चंपावती

**(3)** भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार ---------------- येथे आहे.

अ) दिल्ली

ब) कोलकाता

क) मुंबई

ड) चेन्नई

**( ब ) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.** **3**

**(1)**

| | **ठिकाण** | **प्रसिद्धी** |
|---|---|---|
| | 1) माथेरान | – थंड हवेचे ठिकाण |
| | 2) ताडोबा | – लेणी |
| | 3) कोल्हापूर | – देवस्थान |
| | 4) अजिंठा | – जागतिक वारसा |
| **(2)** | 1) मल्लखांब | – शारीरिक कसरतीचे खेळ |


2) वॉटर पोलो – पाण्यातील खेळ
3) स्केटिंग – साहसी खेळ
4) बुद्धिबळ – मैदानी खेळ

**(3)** **इतिहासकार** **देश**


1) हिरोडोटस – ग्रीस
2) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल – जर्मनी
3) मायकेलफुको – फ्रान्स
4) रेने देकार्त – इंग्लंड

**प्र.2 ( अ ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही दोन )** **4**


**(1)** पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**(2)** पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**(3)** पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.



**ब) थोडक्यात टिपा लिहा. ( कोणतेही दोन )** **4**

**(1)** अभिलेखगार

**(2)** वर्तमानपत्र

**(3)** मनोरंजनाची साधने

**प्र.3 ) पुढील विधाने सकारण स्पष्ट कर. ( कोणतेही दोन )** **4**

**(1)** चित्रपट माध्यमात इतिहास हा विषय महत्वाचा आहे.

**(2)** आजच्या काळात परदेशात जाण्याचे चे प्रमाण वाढत आहे.

**(3)** सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.

**(4)** प्रसारमध्यमाद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चीकित्सक आकलन करून घ्यावे लागते.

**प्र.4 ) दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नाची उत्तरे लिहा.** **4**

मेजर ध्यानचांद हे हॉकीचे महान खेळाडू आणि भारतीय हॉकी संघाचे संघनायक होते. त्यांच्या नेतृत्त्वाखाली 1936 साली भारतीय हॉकी संघाने बर्लिन ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्यापूर्वी 1928 आणि 1932 मध्येही भारतीय हॉकी संघाने सुवर्णपदक जिंकली होती. तेव्हा ध्यानचंद हे भारतीय संघाकडून खेळले होते. 29 ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस ‘राष्ट्रीय क्रीडा दिवस’ म्हणून साजरा केला जातो. त्यांना ‘हॉकीचे जादूगार’ असे म्हणतात. 1956 मध्ये त्यांच्या हॉकीतील कामगिरीबद्दल त्यांना ‘पद्मभूषण’ या सन्मानाने विभूषित करण्यात आले.

**प्रश्न :**

**(1)** ‘हॉकीचे जादूगार’ कोणाला म्हणतात ?

**(2)** भारतात मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस काय म्हणून साजरा केला जातो.

**(3)** मेजर ध्यानचंद यांची ऑलिंपिक स्पर्धेतील कामगिरी थोडक्यात लिहा.

**प्र.5 ) पुढील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा. ( कोणतेही दोन )** **6**

**(1)** स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे काय ?

**(2)** मैदानी खेळ व बैठे खेळ याच्यांतील फरक स्पष्ट करा.

**(3)** पर्यटनाचे कोणतेही तीन प्रकार स्पष्ट करा.

**(4)** ग्रंथालय व्यवस्थापन का महत्वाचे आहे.

**प्र.6 ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **2**

**(1)** निवडणूक आयुक्तांची नेमणूक ---------------- करतात.

1) राष्ट्रपती
2) प्रधानमंत्री
3) लोकसभा सभापती
4) उपराष्ट्रपती

**(2)** लोकशाहीमध्ये --------------- निवडणुकीत सामील होऊन सत्तेत प्रवेश करतात.

1) राजकीय पक्ष
2) न्यायालये
3) सामाजिक संस्था
4) सरकारी संस्था.

**प्र.7 ) पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. ( कोणतेही दोन )** **4**

**(1)** राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.

**(2)** निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करते .

**(3)** माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या करभरातील गोपनीयता वाढली आहे.


**प्र.8 ( अ ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. ( कोणतेही एक )** **2**

**(1)** माहितीचा अधिकार


**(2)** भ्रष्टाचार

**ब ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही एक )** **2**

**(1)** पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**(2)** पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**प्र. 9) पुढील प्रश्नांचे थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही एक )** **2**

**(1)** पोटनिवडणूक संकल्पना स्पष्ट करा.

**(2)** पर्यावरण चळवळी चे कार्य स्पष्ट करा.



सराव उत्तरपत्रिका -1

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण : 40

---

**प्र.1 ( अ ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **3**

**(1)** दूरदर्शन हे ------------ माध्यम आहे.

अ) दृक

ब) श्राव्य

**क) दृक – श्राव्य**

**(2)** महाराष्ट्रात तयार होणाऱ्या लाकडी बाहुलीला ------------- म्हणत.

**अ) ठकी**

ब) कालीचंडिका

क) गंगावती

ड) चांपावती

**(3)** भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार ---------------- येथे आहे.

**अ) दिल्ली**

ब) कोलकाता

क) मुंबई

ड) चेन्नई

**( ब ) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.** **3**

**(1)** **ठिकाण** **प्रसिद्धी**

1) माथेरान – थंड हवेचे ठिकाण

**2) ताडोबा – लेणी** ( चुकीची जोडी )

3) कोल्हापूर – देवसस्थान

4) अजिंठा – जागतिक वारसा

**(2)** 1) मल्लखांब – शारीरिक कसरतीचे खेळ

2) वॉटर पोलो – पाण्यातील खेळ

3) स्केटिंग – साहसी खेळ

**4) बुद्धिबळ – मैदानी खेळ** ( चुकीची जोडी )

**(3)** **इतिहासकार** **देश**

1) हिरोडोटस – ग्रीस


**2)** जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल – जर्मनी

3) मायकेल फुको – फ्रांस


**4) रेने देकार्त – इंग्लंड**( चुकीची जोडी )

**प्र.2 ( अ ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही दोन )** **4**


**(1)** पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**(2)** पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**(3)** पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**ब) थोडक्यात टिपा लिहा. ( कोणतेही दोन )** **4**

**(1) अभिलेखगार :**

**उत्तर :**

1) ऐतिहासिक दस्तऐवज ज्या ठिकाणी जतन करून ठेवलेले असतात त्या ठिकाणास ‘अभिलेखागार ‘असे म्हणतात.

2) अभिलेखागारांमध्ये महत्त्वाची जुनी कागदपत्रे, दप्तरे, जुने चित्रपट, जागतिक करारांचे ऐवज इत्यादी जतन करून ठेवले जाते.

3) अभिलेखागारांमुळे मूळ कागदपत्रांचे संदर्भ मिळतात, तत्कालीन ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करता येतो, तत्कालीन भाषा, लिपी यांचा शोध घेता येतो. कालगणना करता येते. ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांना हस्तांतरित करता येतो.

4) भारताचे दिल्ली येथील राष्ट्रीय अभिलेखागार हे आशिया खंडातील सर्वात मोठे अभिलेखागार आहे.

**(2) वर्तमानपत्र :**

**उत्तर :**

1) मुख्यतः बातम्या, अग्रलेख, लोकांची मते, जाहिराती, रंजक व अन्य पूरक मजकूर यांचा समावेश असलेले, ठरलेल्या वेळी नियमितपणे छापून वितरित केले जाणारे प्रकाशन म्हणजे 'वर्तमानपत्र' होय.

2) वृत्तपत्रे ही स्थानिक , देशांतर्गत व जागतिक स्वरूपाच्या विविध बातम्या पुरवण्याचे काम करतात.

3) वृत्तपत्र ही जगाचा जगाचा एक दिवसाचा इतिहास असते.

**(3) मनोरंजनाची साधने :**

**उत्तर :**

1) मनोरंजनाची साधने मनाचे रंजन करतात.

2) मनाला विरंगुळा देतात छंद, वाचन, खेळ, नाटक, चित्रपट, फिरणे यांचा समावेश मनोरंजनात होतो.

3) उत्सव, मेळे, सण-समारंभ, खेळ, नाच-गाणे ही प्राचीन व मध्ययुगातील  युगातील मनोरंजनाची साधने होती.

4) बदलत्या काळाप्रमाणे मनोरंजनाच्या साधनांतही बदल होत गेला. टीव्ही, मोबाईल,  व्हिडिओ गेम्स,  चित्रपट अशी आधुनिक काळातील मनोरंजनाची साधने आहेत.

5) लोकसंगीत, शास्त्रीय संगीत, नाटके, दशावतारी खेळ, पुस्तके, वृत्तपत्रे ही सुद्धा मनोरंजनाची साधने आहेत.

**प्र.3 ) पुढील विधाने सकारण स्पष्ट कर.  ( कोणतेही दोन )** **4**

**(1) चित्रपट माध्यमात इतिहास हा विषय महत्वाचा आहे.**

**उत्तर :**

1) ऐतिहासिक घटनांवर आणि व्यक्तींवर चित्रपट बनवतांना इतिहासाचा आधार घ्यावाच लागतो.

2) चित्रपटाची कथा, विषय वास्तववादी होण्यासाठी तत्कालीन वातावरणाची निर्मिती करावी लागते .

3) पात्रांच्या तोंडची भाषा, बोलण्याच्या पद्धती ही माहिती असाव्या लागतात.

4) त्या वेळेची केशभूषा, वेशभूषा, रंगभूषा इत्यादीचे नियोजन करावे लागते.

म्हणून चित्रपटाच्या माध्यमात इतिहास विषय महत्त्वाचा असतो व त्याच्या जाणकारांची ही महत्व असते.

**(2) आजच्या काळात परदेशात जाण्याचे चे प्रमाण वाढत आहे.**

**उत्तर :**

1) जहाज, रेल्वे आणि विमान या वाहतूक क्षेत्रांमध्ये झालेल्या प्रगतीमुळे आधुनिक काळात पर्यटन सोपे झाले आहे.

2)  विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती, आर्थिक उदारीकरण यामुळे जग अधिक जवळ आलेले आहे.

3) व्यवसाय, चित्रपटाचे चित्रीकरण, अभ्यास या कारणांसाठी लोक जगभरातील ठिकाणांना भेटी देतात.

4) खेळ, आंतरराष्ट्रीय परिषदा, संमेलने, ऐतिहासिक-धार्मिक स्थळे पाहणे या उद्देशाने लोक जगभर प्रवास करीत असतात.

त्यामुळे आजच्या काळात लोकांचे परदेशात जाण्याची प्रमाण पूर्वीपेक्षा वाढलेली आहे.

**(3) सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.**

**उत्तर :**

1) सध्याच्या काळामध्ये खेळांचे आंतरराष्ट्रीकरण झालेले आहे.

2) सर्व सामान्यांचे थेट प्रक्षेपण जगाच्या कानाकोपऱ्यातून एकाच वेळी होत असते. त्यामुळे हौशी खेळाडू शिकण्यासाठी तर प्रेक्षक मनोरंजनासाठी सामने पाहतात.

3) सामने पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रेक्षक वर्ग येतो. त्यामुळे कंपन्या मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करून आपल्या उत्पादनाच्या जाहिराती खेळाच्या प्रक्षेपणा दरम्यान करीत असतात.

या कारणामुळे सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदललेले आहे.

**(4) प्रसारमध्यमाद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चीकित्सक आकलन करून घ्यावे लागते.**

**उत्तर :**

1) प्रसार माध्यमांद्वारे दिलेली माहिती वास्तवाला धरूनच असेल असे नसते.
2) ही माहिती देणाऱ्या प्रसार माध्यमांची हेतू , सरकारी धोरण, सामाजिक परिस्थिती अशा अनेक बाजू विचारात घेणे आवश्यक असते.
3) प्रसार माध्यमांचे पूर्वग्रह दृष्टिकोन ही त्या माहितीमध्ये दडलेले असतात.
4) जर्मनीतील 'स्टर्न' साप्ताहिकाने हिटलरने लिहिलेल्या काही रोजनिशा प्रसिद्ध केल्या. पुढे ती हस्तलिखिते बनावट असल्याचे सिद्ध झाले.
म्हणून प्रसारमाध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन करून घ्यावे लागते.

**प्र.4 ) दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नाची उत्तरे लिहा.** **4**

मेजर ध्यानचंद हे हॉकीचे महान खेळाडू आणि भारतीय हॉकी संघाचे संघनायक होते. त्यांच्या नेतृत्त्वाखाली 1936 साली भारतीय हॉकी संघाने बर्लिन ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्यापूर्वी 1928 आणि 1932 मध्येही भारतीय हॉकी संघाने सुवर्णपदक जिंकली होती. तेव्हा ध्यानचंद हे भारतीय संघाकडून खेळले होते. 29 ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय क्रीडा दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हणतात. 1956 मध्ये त्यांच्या हॉकीतील कामगिरीबद्दल त्यांना 'पद्मभूषण' या सन्मानाने विभूषित करण्यात आले.

**प्रश्न :**

**(1) 'हॉकीचे जादूगार' कोणाला म्हणतात ?**

**उत्तर :**

'मेजर ध्यानचंद' यांना हॉकीचे जादूगार असे म्हणतात.

**(2) भारतात मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस काय म्हणून साजरा केला जातो.**

**उत्तर :**

मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस हा 'राष्ट्रीय क्रीडा दिवस' म्हणून साजरा केला जातो.

**(3) मेजर ध्यानचंद यांची ऑलिंपिक स्पर्धेतील कामगिरी थोडक्यात लिहा.**

**उत्तर :**

1) मेजर ध्यानचंद यांच्या नेतृत्वाखाली 1936 साली भारतीय संघाने ऑलिंपिक मध्ये सुवर्ण पदक जिंकले.
2) तसेच 1928 व 32 साली सुद्धा त्यांच्या नेतृत्त्वाखाली हॉकी संघाने सुवर्णपदक जिंकली.
3) हॉकीतील कामगिरीबद्दल त्यांना पद्मभूषण या सम्मानाने विभूषित करण्यात आले.

**प्र.5 ) पुढील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा. ( कोणतेही दोन )** **6**

**(1) स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे काय ?**

**उत्तर :**

1) स्त्रीवादी इतिहास लेखन म्हणजे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून केलेली इतिहासाची पुनर्रचना होय.
2) इतिहास लेखनात पुरुषवादी दृष्टिकोनाचा प्रभाव अधिक होता त्यावर पुनर्विचार करावा आणि त्यात स्त्रियांचा अंतर्भाव करावा अशी भूमिका फ्रेंच विदुशी सीमा-द-बोव्हा हिने मांडली. त्यानंतर स्त्रीवादी इतिहास लेखन हा विचार स्वीकारला गेला.
3) स्त्रियांशी संबंधित नोकऱ्या, रोजगार, ट्रेड युनियन, स्त्रियांचे कौटुंबिक जीवन, स्त्री संस्था या सर्वांवर सविस्तर संशोधन सुरू झाले.
4) स्त्री हा एक स्वतंत्र वर्ग मानून इतिहास लिहिण्यावर भर दिला जाऊ लागला.
या दृष्टिकोनाला स्त्रीवादी इतिहास लेखन असे म्हणतात

**(2) मैदानी खेळ व बैठे खेळ याच्यांतील फरक स्पष्ट करा.**

**उत्तर :**

**मैदानी खेळ :**

1) मैदानी खेळ हे मैदानात प्रत्यक्ष जाऊन खेळायचे असतात.
2) मैदानी खेळांसाठी कसरत व कौशल्याची अधिक गरज असते.
3) मैदानी खेळांना शारीरिक क्षमतेची शक्तीची गरज असते.
4) मैदानी खेळात रोमांच असतो आनंदही अधिक मिळतो.
5) शक्ती अधिक खर्च झाल्याने या खेळात थकवा लवकर येतो.
6) मैदानी खेळात शारीरिक कौशल्याची गरज असल्याने प्रशिक्षणाची सरावाची गरज असते.
7) मैदानी खेळांमध्ये कबड्डी हॉकी खो-खो क्रिकेट अशा देशी-विदेशी खेळांचा समावेश होतो .
8) बहुतेक सर्व मैदानी खेळांच्या स्थानिक व आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित केला जातात.

**बैठे खेळ**

1) बैठखेळ  बसून खेळावे लागतात. ते घरात किंवा मोकळया जागेत पारावर कुठे ही खेळता येतात.
2) बैठे खेळांना तुलनेने कमी कसरतीची व कौशल्याची गरज असते.
3) या खेळांना शारीरिक क्षमतेची व शक्तीची गरज नसते.
4) बैठक खेळांत तितका रोमांच नसल्याने आनंद कमी मिळतो.
5) शक्तीची गरज नसल्याने या खेळांमध्ये थकवा लवकर येत नाही .
6) बैठे खेळांना शारीरिक कौशल्याची गरज नसल्याने प्रशिक्षण व सरावाची तितकीशी गरज नसते.
7) बैठ्या खेळात कॅरम, बुद्धिबळ, सारीपाठ, पत्ते इत्यादी खेळांचा समावेश होतो.
8) कॅरम, बुद्धिबळ या सारख्या मोजक्याच बैठे खेळांच्या स्पर्धा सोडल्यास अन्य बैठे खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या जात नाही.

**(3) पर्यटनाचे कोणतेही तीन प्रकार स्पष्ट करा.**

**उत्तर :**

पर्यटनाचे अनेक प्रकारात वर्गीकरण करण्यात येते.
1) **ऐतिहासिक पर्यटन** : पर्यटन आणि इतिहास यांचे अतूट नात आहे. म्हणूनच जगभरातील पर्यटकांचा ऐतिहासिक ठिकाणी पाहण्यासाठी ओढ वाढत आहे. पूर्वज्यांचे पराक्रम, त्यांनी निर्माण केलेल्या वास्तु, किल्ले, राजवाडे, स्मारक अशा स्थळांना पर्यटक भेटी देतात.
2) **भौगोलिक पर्यटन** : अभयारण्य, समुद्रकिनारे, नद्यांचे संगम, लोणार सारखी उल्कापाता निर्माण झालेली सरोवरे, बेटे, धबधबे हे देशाचे वैभव असते. निसर्गाचा आनंद उपभोगायला प्रत्येकाला आवडतो. निसर्गाची ओळख, कुतूहल यासाठी जगभरातील लोक अश्या ठिकाणांना भेटी देतात हे भौगोलिक पर्यटन होय.
3) **कृषी पर्यटन** : शेती व शेतीशी संबंधित उपक्रम पाहण्यासाठी केलेला प्रवास म्हणजे कृषी पर्यटन होय. सध्याच्या काळात मोठ्या प्रमाणात कृषी संशोधन चालू आहेत. त्यासाठी भारतभर कृषी संशोधन केंद्र आणि कृषी विद्यापीठ स्थापन झालेली आहेत.
4) **क्रीडा पर्यटन** : क्रीडा स्पर्धां मध्ये भाग घेण्यासाठी किंवा खेळांचे सामने पाण्यासाठी केलेले पर्यटन म्हणजे क्रीडा पर्यटन होय. विसाव्या शतकात क्रीडा पर्यटन हा नवा प्रकार उदयाला आलेला आहे.

**(4) ग्रंथालय व्यवस्थापन का महत्वाचे आहे.**

**उत्तर :**

1) ग्रंथालय ही ज्ञानाची आणि माहितीची भांडारघरे असतात.
2) ग्रंथालयात शास्त्राचा व्यवस्थापन शास्त्र, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण शास्त्र यासारख्या विषयांशी निकटचा संबंध आहे.
3) ग्रंथांचे संकलन त्याचे जतन आणि संवर्धन माहितीच्या स्त्रोतांचे प्रसारण अशी महत्त्वाची कामे ग्रंथालया मार्फत पार पडले जातात.
4) ग्रंथालयातील बहुतेक कामे अद्यावत संगणकीय प्रणालीच्या आधारे कली जातात.
5) वाचकांना आवश्यकतेनुसार हवे ते नेमके ग्रंथ उपलब्ध करून देणे या गोष्टीला ग्रंथालय व्यवस्थापनात अत्यंत महत्त्व असते. त्याला व्यवस्थापन गरजेचे असते.
6) कोणते पुस्तक कोठे ठेवलेले आहे ही त्वरित सांगता येऊ शकते. त्यामुळे पुस्तकांचा शोध घेण्यात ग्रंथालय व्यवस्थापनाचा आणि वाचकांचा दोन्हींचा ही वेळ फुकट जात नाही.

7) ग्रंथालय व्यवस्थापनामुळे पुस्तकांचा विध्वसं होत नाही.

**प्र.6 ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **2**

**(1)** निवडणूक आयुक्तांची नेमणूक ---------------- करतात.

**1) राष्ट्रपती**

2) प्रधानमंत्री

3) लोकसभा सभापती

4) उपराष्ट्रपती

**(2)** लोकशाहीमध्ये --------------- निवडणुकीत सामील होऊन सत्तेत प्रवेश करतात.

**1) राजकीय पक्ष**

2) न्यायालये

3) सामाजिक संस्था

4) वरीलपैकी नाही.

**प्र.7 ) पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. ( कोणतेही दोन )** **4**

**(1) राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.**

**उत्तर :**

हे विधान बरोबर आहे. कारण-

1) राजकीय पक्ष जनतेच्या मागण्या आणि गाऱ्हाणी शासनापर्यंत पोहोचवण्याचे काम करतात.

शासनपक्षा मार्फत आलेल्या धोरणांची योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून त्यांच्या या कार्यक्रमांना पाठिंबा मिळवतात .

2) या धोरणावरील जनतेच्या प्रतिक्रिया सरकारला सांगण्याचे काम राजकीय पक्ष करतात.

म्हणून राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.

**(2) निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करते .**

**उत्तर :**

हे विधान बरोबर आहे. कारण-

1) आचार संहिता लागू केल्यामुळे निवडणुका खुल्या वातावरणात व निपक्ष पद्धतीने घेता येतात.

2) निवडणुकीच्या काळात गैरप्रकारांना आळा घालता येतो

म्हणून निवडणूक आयोग निवडणुकीच्या दरम्यान आचारसंहिता लागू करतो

**(3) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या करभरातील गोपनीयता वाढली आहे.**

**उत्तर :**

हे विधान चूक आहे. कारण-

1) पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही सुशासनाची दोन वैशिष्ट्ये प्रत्यक्ष साधण्यासाठी भारतीय नागरिकांना माहितीचा अधिकार देण्यात आलेला आहे.

2) माहितीच्या अधिकारा मुळे शासनाच्या कारभारातील गोपनिता कमी झाली व शासनाचे व्यवहार अधिक खुले व पारदर्शक होण्यास मदत झालेली आहे.

**प्र.8 ( अ ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. ( कोणतेही एक )** **2**

**(1) माहितीचा अधिकार :**

**उत्तर :**1) लोकशाही अधिक सक्षम होण्यासाठी, नागरिक व शासन त्यांचा परस्परांवरील विश्वास वाढवण्यासाठी शासन काय करीत आहे हे नागरिकांना माहिती असणे आवश्यक असते.

2) पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही चांगल्या शासनाची वैशिष्ट्ये या अधिकारामुळे प्रत्यक्षात आणण्यासाठी भारतीय नागरिकांना 2005 साली माहितीचा अधिकार देण्यात आला.

3) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी झाली व शासनाचे व्यवहार अधिक खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली.

4) इ. स. 2000 नंतरच्या काळात नागरिकांसाठी सुधारणा करताना तो त्याचा हक्क माणून सुधारणा करण्याकडे कल वाढला आहे. त्यानुसार माहितीचा, शिक्षणाचा व अन्न सुरक्षेचा हक्क भारतीयांना मिळाला.

**(2) भ्रष्टाचार :**

**उत्तर :**1) भारतामध्ये सार्वजनिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भभ्रष्टाचाराची समस्या दिसून येते.

2( भ्रष्टाचारामुळे सरकारची कार्यक्षमता कमी होते.

3) सरकारी कामांना लागणारा वेळ, सार्वजनिक सोयी व सुविधांची घसरलेली गुणवत्ता वेगवेगळे आर्थिक घोटाळे यामुळे एकूण व्यवस्थेबद्दल अविश्वासाची असमाधानाची भावना लोकांमध्ये निर्माण होते. 4) अधिकारांचा गैरवापर हा ही भ्रष्टाचारच असतो.

4) निवडणुकीतील गैरप्रकार, लाच देणे व स्वीकारणे हे सर्व भ्रष्टाचाराचे प्रकार असतात. या घटनांमुळे लोकांचा लोकशाही पवरील विश्वास उडू शकतो.

**ब ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही एक )** **2**

**(1)** पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.

- भारतातील राष्ट्रीय पक्ष
  - भारतीय जनता पक्ष
  - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस
  - राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
  - तृणमूल काँग्रेस

( भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी )

**(2)** पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.

- निवडणूक आयोगाची कार्ये
  - मतदार याद्या तयार करणे
  - निवडणुकांचे वेळापत्रक व संपूर्ण कार्यक्रम ठरवणे
  - उमेदवारांच्या अर्जाची छाननी करणे
  - राजकीय पक्षणा मान्यता देणे
  - ( निवडणुकी संबंधी वाद सोडवणे )

**प्र. 9) पुढील प्रश्नांचे थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही एक** **2**

**(1) पोटनिवडणूक संकल्पना स्पष्ट करा.**

**उत्तर :**1) पोटनिवडणूक म्हणजे विधानसभा लोकसभा आणि स्थानिक शासन संस्थांमधील एखाद्या लोकप्रतिनिधीने राजीनामा दिल्यास अथवा एखाद्या लोकप्रतिनिचा मृत्यू झाला ती जागा रिकामी होते त्या जागेसाठी पुन्हा निवडणूक घेतली जाते. त्यास पोटनिवडणूक असे म्हणतात

**(2) पर्यावरण चळवळी चे कार्य स्पष्ट करा.**

**उत्तर :**1) पर्यावरणाचा ऱ्हास ही आजच्या काळातील एक राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय पातळीवरील गंभीर समस्या आहे.

2) पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक चळवळी सक्रिय आहेत.

3) भारतातही पर्यावरणातील विविध विषयांना प्राधान्य देत अनेक चळवळी सक्रिय झालेले आहेत.

4) जैवविविधतेचे संरक्षण, पाण्याच्या स्त्रोतांचे जतन, जंगल, वातावरण, नद्यांचे प्रदूषण, हरित पट्ट्यांचे संरक्षण, रासायनिक द्रव्यांचा वापर त्याचे दुष्परिणाम इत्यादी प्रश्न घेऊन ही चळवळी संघर्ष करीत आहेत.

All the best

सराव प्रश्नपत्रिका – 02

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण : 40

---

**सूचना :**

(1) सर्व प्रश्न / कृती सोडविणे आवश्यक आहे.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे / कृतीचे गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न / कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न / कृती राज्यशास्त्र या विषयावरील आहे.

(4) प्रश्न क्रमांक 2 (अ) आणि 8 (ब) मधील संकल्पनाचित्रे / कृती त्याचा नमूना अराखड्यात पेनाने / पेन्सिलीने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(5) प्रश्न 1 ला (अ) , (ब) व प्रश्न 6 वा या प्रश्नाची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर हे गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

**प्रश्न १ (अ ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.** 3

(१) भारतात प्रथम रेल्वे सुरू झाली त्याची बातमी.........मध्ये ‘चाक्या म्हसोबा’शीर्षकांतर्गत छापून आली.

(अ) दर्पण (ब) केसरी (क) ज्ञानोदय (ड) प्रभाकर

(२) हितोपदेश या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद .......... यांनी केला.

(अ) जेम्स मिल (ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर (क) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन (ड) जॉन मार्शल

(३) लिओनार्दो द विंची या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराने रेखाटलेल्या ........या चित्राचा समावेश लुव्र संग्रहालयात आहे.

(अ) नेपोलियन (ब) मोनालिसा (क) हॅन्स स्लोअन (ड) दुसरा जॉर्ज

**(ब) पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा** 3

(१)

(अ) बेंजामिन ट्युडेला --- जगातील पहिला युरोपीय शोधक प्रवासी
(ब) मार्को पोलो --- तेराव्या शतकातील इटालियन प्रवासी
(क) इब्न बतूता --- जगाचा नकाशा बनवणारा प्रवासी
(ड) गेरहार्ट मर्केटर --- सोळाव्या शतकातील पृथ्वीचा गोल बनवणारा नकाशा आरेखक

(२)

(अ) मल्लखांब ---- शारीरिक कसरतीचे खेळ
(ब) वॉटर पोलो ---- पाण्यातील खेळ
(क) स्केटींग ---- साहसी खेळ
(ड) बुद्धिबळ ---- मैदानी खेळ

(३)

(अ) प्रभाकर ---- आचार्य प्र.के.अत्रे
(ब) दर्पण ---- बाळशास्त्री जांभेकर


(क) दीनबंधु ---- कृष्णराव भालेकर
(ड) केसरी ---- बाळ गंगाधर टिळक

**प्रश्न २ (अ ) दिलेल्या सूचनानुसार कृती करा : (कोणत्याही दोन)** **4**


1) इतिहास विषयाशी संबंधित कोशांच्या संदर्भातील पुढील कालरेषा पूर्ण करा

| | | | |
|---|---|---|---|
| इ.स. ------ | इ.स.१९३२ | इ.स. ---------- | इ.स.१९४६ |
| भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश | --------------------- --------------------- | भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश | --------------------- --------------------- |

2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :




**3)** पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :




**प्रश्न २ (ब) थोडक्यात टिपा लिहा : (कोणतेही दोन)** **4**

(१) अॅनल्स प्रणाली
(२) वंचितांचा (सबऑल्टर्न) इतिहास
(३) विश्वकोश :

**प्रश्न ३ : पुढील विधाने सकारण स्पष्ट करा : (कोणतेही दोन)** **4**

(१) आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे.
(२) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.
(३) खेळण्यांद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो.
(४) बाळ ज. पंडित यांचे आकाशवाणीवरील क्रिकेटचे धावते समालोचन रंजक होत असे.

**प्रश्न ४ : पुढील परिच्छेद काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा** **4**

सोहगौडा ताम्रपट : हा ताम्रपट सोहगौडा (जिल्हा गोरखपूर, उत्तर प्रदेश) येथे सापडला. हा ताम्रपट मौर्य काळातील असावा असे मानले जाते. ताम्रपटावरील कोरीव लेख ब्राह्मी लीपीत आहे. लेखाच्या सुरुवातीस जी चिन्हे आहेत त्यातील पारासहित असलेला वृक्ष तसेच पर्वत (एकावर एक असलेल्या तीन कमानी) ही चिन्हे प्राचीन आहत नाण्यांवरही आढळतात. चार खांबांवर उभे असलेले दुमजली इमारतीप्रमाणे दिसणारे चिन्ह कोठारघरांचे निदर्शक असावेत, असे अभ्यासकांचे मत आहे. या कोठारघरांमधील धान्य जपून वापरण्यात यावे, असा आदेश त्या लेखात दिलेला आहे. दुष्काळजन्य परिस्थितीचे निवारण करण्यासाठी काय काळजी घ्यावी, या संदर्भातील हा आदेश असावा, असे मानले जाते.

**प्रश्न :**

(१) सोहगौडा ताम्रपट कोठे सापडला ? 1
(२) सोहगौडा ताम्रपटावरील कोरीव लेख कोणत्या लिपीमध्ये लिहिलेला आहे ? **1**
(३) सोहगौडा ताम्रपटाचे इतिहासाचे साधन म्हणून महत्त्व स्पष्ट करा. **2**

**प्रश्न ५ : पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** **6**

(१) पुढील विषयांच्या संशोधनात इतिहासाची संशोधन पद्धती कशी उपयुक्त ठरेल ते स्पष्ट करा.
(अ) विज्ञान (ब) कला (क) व्यवस्थापनशास्त्र
(२) प्रसारमाध्यमांची आवश्यकता स्पष्ट करा.
(३) खेळ आणि व्यावसायिक संधी याविषयी माहिती लिहा.
(४) ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन स्पष्ट करा.

**प्रश्न ६. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.** **2**

(१) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी .....जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.
(अ) २५% (ब) ३०% (क) ४०% (ड) ५०%
(२) भारताचे जलपुरुष या नावाने ओळखले जाणारे................यांनी राजस्थान येथे मोठी जलक्रांती घडवून आणली आहे.
(अ) बिरसा मुंडा (ब) डॉ.राजेंद्र सिंह (क) ईश्वरचंद्र विद्यासागर (ड) सावित्रीबाई फुले

**प्रश्न ७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा . (कोणतीही दोन)** **4**

1) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता वाढली आहे.
2) पहिल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदार याद्या तयार करण्याचे काम आव्हानात्मक होते.
3) ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

**प्रश्न ८ (अ ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतीही एक)** **2**

1) प्रादेशिक पक्ष
2) आदिवासी चळवळ

**प्रश्न ८ (ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतीही एक)** **2**

**1)** पुढील ओघ तक्ता पूर्ण करा :

**निवडणूक प्रक्रिया :**

| |
|---|
| मतदारसंघाची निर्मिती ↓ |
| ...................... ↓ |
| ...................... ↓ |
| ...................... ↓ |
| ...................... ↓ |
| मतमोजणी |

2) दिलेला आकृतीबंध पूर्ण करा :




**प्रश्न ९. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणताही एक)** **2**

1) मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले ?
2) पर्यावरण चळवळीचे कार्य स्पष्ट करा.

All the best

सराव उत्तरपत्रिका -2

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण : 40

**प्रश्न १ (अ )**

(१) भारतात प्रथम रेल्वे सुरू झाली त्याची बातमी **ज्ञानोदय** मध्ये ‘चाक्या म्हसोबा’ शीर्षकांतर्गत छापून आली.

(२) हितोपदेश या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद **फ्रेडरिक मॅक्सम्युलर** यांनी केला.

(३) लिओनार्दो द विंची या जगप्रसिद्ध इटालियन चित्रकाराने रेखाटलेल्या **मोनालिसा** या चित्राचा समावेश लुव्र संग्रहालयात आहे.

**प्रश्न १ (ब ) :**

1) चुकीची जोडी:इब्न बतूता -- जगाचा नकाशा बनवणारा प्रवासी

**2)** चुकीची जोडी : ताडोबा – लेणी

3) चुकीची जोडी : बुद्धिबळ -- मैदानी खेळ

**प्रश्न २ (अ ) :उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| इ.स. **१८७६** | इ.स.१९३२ | इ.स. **१९३७** | इ.स.१९४६ |
| भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिककोश | **भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश** | भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश | **भारतवर्षीय अर्वाचीन चरित्रकोश** |

**उत्तर:**

बैठे खेळ

- **कॅरम**
- **बुद्धिबळ**
- **पत्ते**
- **सोंगट्या**

**उत्तर:**

महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळे

- **अजिंठा लेणी**
- **वेरूळ लेणी**
- **घारापुरी (एलिफन्टा) लेणी**
- **छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई**

**प्रश्न २ (ब) :**

**(१) अ ॅनल्स प्रणाली :**

**उत्तर:** 1. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस फ्रान्समध्ये ॲनल्स नावाने ओळखली जाणारी इतिहासलेखनाची प्रणाली उदयाला आली. ॲनल्स प्रणालीमुळे इतिहासलेखनाला एक वेगळीच दिशा मिळाली.

**2**.इतिहासाचा अभ्यास फक्त राजकीय घडामोडी, राजे, महान नेते आणि त्या अनुषंगाने राजकारण, मुत्सद्देगिरी, युद्धे यांच्यावर केंद्रित न करता तत्कालीन हवामान, स्थानिक लोक, शेती, व्यापार, तंत्रज्ञान, दळणवळण, संपर्काची साधने, सामाजिक विभागणी आणि समूहाची मानसिकता यांसारख्या विषयांचा अभ्यास करणेही महत्त्वाचे मानले जाऊ लागले.

**3.**ॲनल्स प्रणाली सुरू करण्याचे आणि तिचा विकास करण्याचे श्रेय फ्रेंच इतिहासकारांना दिले जाते.

**(२) वंचितांचा (सबऑल्टर्न) इतिहास**

**उत्तर:** 1. वंचित समूहांचा इतिहास लिहिण्याची सुरुवात मार्क्सवादी इतिहासलेखनाच्या परंपरेतूनच झाली, असे म्हणता येईल.

**2.**इतिहासलेखनाची सुरुवात समाजाच्या तळाशी असलेल्या सर्वसामान्य लोकांच्या स्तरापासून करायला पाहिजे, ही कल्पना मांडण्यामध्ये अँटोनिओ ग्रामची या इटालियन तत्त्वज्ञाचे स्थान महत्त्वाचे आहे.

**3.**वंचितांचा इतिहास लिहिण्यासाठी लोकपरंपरा हे एक महत्त्वाचे साधन मानले गेले आहे.

**4**.वंचितांच्या इतिहासाला एक महत्त्वाची विचारसरणी म्हणून स्थान मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य रणजित गुहा या भारतीय इतिहासकाराने केले.

**(३) विश्वकोश** :

**उत्तर:** 1. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने मराठी विश्वकोश निर्मितीस चालना दिली.

2.तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखाली विश्वकोश निर्मिती सुरू झाली. जगभरातील ज्ञान साररूपाने या कोशांमध्ये आणले आहे.

3.इतिहास विषयाशी निगडित असणाऱ्या महत्त्वाच्या नोंदी यात आहे.

**प्रश्न ३ :**

(१) **आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे**.

**उत्तर:** आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे, कारण ---

1. जहाज, रेल्वे आणि विमान यांच्यामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटन करणे पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे.

**2.**जहाजांमुळे समुद्रकिनाऱ्यांवरचे देश जोडले गेले. रेल्वेच्या रूळांनी युरोप जोडला आहे.

**3**.विमानांनी जग जवळ आणले. आर्थिक उदारीकरणानंतर भारतातून परदेशात जाणाऱ्यांची आणि परदेशातून भारतात येणाऱ्यांची संख्या वाढली आहे.

**4**.अभ्यास, विरंगुळा, स्थलदर्शन, व्यावसायिक कामे (बैठका, करारमदार इत्यादी) चित्रपटांचे चित्रीकरण यांसारख्या कामांसाठी देश-विदेशात येणाऱ्या-जाणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण वाढले आहे.

**(२) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.**

**उत्तर:** वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते, कारण ---

1. वर्तमानपत्रांना रोजच्या रोज ताज्या बातम्या वाचकांपर्यंत पोहचवायच्या असतात. हे काम करत असताना 'बातमी मागची बातमी' सांगावी लागते. अशा वेळी वर्तमानपत्रांना इतिहासाची गरज पडते.

2.एखाद्या बातमीचा सविस्तर आढावा घेताना भूतकाळात तशाच स्वरूपाची एखादी घटना इतरत्र घडली असल्यास वर्तमानपत्रे ती बातमीमध्ये चौकट देऊन छापतात. तेव्हा वाचकाला जादा माहिती मिळते आणि घटनेच्या मुळापर्यंत जाता येते.

3. वर्तमानपत्रांमधील सदरांमध्ये पन्नास वर्षांपूर्वी, शंभर वर्षांपूर्वी अशा प्रकारची सदरे असतात. ती इतिहासाची साधने आणि इतिहासावर आधारित असतात. या प्रकारच्या सदरांमधून आपणांस भूतकाळातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक घटना समजतात. भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर वर्तमान कळण्यास मदत होते.

4. वर्तमानपत्रांना विशेष प्रसंगी पुरवण्या किंवा विशेषांक काढावे लागतात. उदा., १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले त्याला

२०१४ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली. त्या युद्धाचा सर्वंकष आढावा घेणारी पुरवणी काढताना त्या घटनेचा इतिहास माहीत असावा लागतो.

5. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनाला २०१७ मध्ये ७५ वर्षे पूर्ण झाली. अशा प्रसंगी वर्तमानपत्रे लेख, अग्रलेख, दिनविशेष, आढावा यांच्याद्वारे त्या घटनेचा वेध घेतात. त्या वेळी इतिहासाचा अभ्यास उपयोगी पडतो.

**(३) खेळण्यांद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो.**

**उत्तर:** खेळण्यांद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो, कारण ---

1.खेळण्यांमधून इतिहास आणि तंत्रज्ञानाची प्रगती यांवर प्रकाश पडतो, धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा समजतात. महाराष्ट्रात दिवाळीत किल्ले करण्याची मोठी परंपरा आहे. या मातीच्या किल्ल्यांवर छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रतिमा ठेवतात.

2.महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या साहाय्याने घडलेल्या इतिहासाला उजाळा देण्याचाच हा एक प्रकार आहे. इटलीतीलपाँपेई शहराच्या उत्खननात एक भारतीय हस्तिदंती बाहुली सापडली. ती पहिल्या शतकातील असावी असा इतिहासकारांचा अंदाज आहे.

3.त्यावरून भारत आणि रोम यांच्यातील परस्पर संबंधांबद्दल अनुमान करता येते. अशा रीतीने उत्खननातन मिळालेली खेळणी ही प्राचीन काळी विविध देशांमधील परस्परसंबंधांवर प्रकाश टाकू शकतात.

**(४) बाळ ज. पंडित यांचे आकाशवाणीवरील क्रिकेटचे धावते समालोचन रंजक होत असे**

**उत्तर:** बाळ ज. पंडित यांचे आकाशवाणीवरील क्रिकेटचे धावते समालोचन रंजक होत असे, कारण ---

1. क्रिकेट सामन्यांचे मराठी भाषेतून समालोचन पूर्वी बाळ ज. पंडित करत असत.

2.आकाशवाणीवरून हे धावते वर्णन ऐकण्यासाठी लोक जीवाचा कान करत असत. हे समालोचन करताना बाळ पंडित त्या मैदानाचा इतिहास, खेळाडूंचा इतिहास, खेळाशी संबंधित असणाऱ्या आठवणी आणि पूर्वीचे विक्रम यांची माहिती देत असत.

3.त्यांना खेळाचे आणि खेळाच्या इतिहासाचे उत्तम ज्ञान असल्यामुळे त्यांचे समालोचन रंजक व्हायचे.

**प्रश्न ४ : उत्तरे**

(१) सोहगौडा ताम्रपट जिल्हा गोरखपूर, उत्तर प्रदेश येथे सापडला.

(२) सोहगौडा ताम्रपटावरील कोरीव लेख ब्राह्मी लिपीमध्ये लिहिलेला आहे

(३) सोहगौडा ताम्रपटाचे इतिहासाचे साधन म्हणून महत्त्व पुढीलप्रमाणे-

1. सोहगौडा ताम्रपट लेखाच्या सुरुवातीस जी चिन्हे आहेत त्यातील पारासहित असलेला वृक्ष तसेच पर्वत (एकावर एक असलेल्या तीन कमानी) ही चिन्हे व चार खांबांवर उभे असलेले दुमजली इमारतीप्रमाणे दिसणारे चिन्ह कोठारघरांचे निदर्शक असावेत, असे अभ्यासकांचे मत आहे.

2. या कोठारघरांमधील धान्य जपून वापरण्यात यावे, असा आदेश त्या लेखात दिलेला आहे.

3.दुष्काळजन्य परिस्थितीचे निवारण करण्यासाठी काय काळजी घ्यावी, या संदर्भातील हा आदेश असावा, असे मानले जाते.

**प्रश्न ५ :**

(१) पुढील विषयांच्या संशोधनात इतिहासाची संशोधन पद्धती कशी उपयुक्त ठरेल ते स्पष्ट करा.

(अ) विज्ञान (ब) कला (क) व्यवस्थापनशास्त्र

उत्तर :

इतिहास भूतकाळात घडून गेलेल्या घटनांशी संबंधित असतो. वर्तमानात दिसणाऱ्या मानवी जीवनाची घडण ही त्या घटनांवरच आधारलेली असते. या घटना राजकारण, सामाजिक-धार्मिक संघटन, तत्त्वज्ञान, तंत्रज्ञान आणि विज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये घडलेल्या असतात. प्रत्येक क्षेत्रातील ज्ञानसंचयाचा स्वतंत्र इतिहास असतो. त्या त्या क्षेत्रातील पुढील वाटचालीची दिशा या ज्ञानसंचयाच्या स्थितीवर अवलंबून असते. त्या अनुषंगाने अनेक विषयांच्या संशोधनात इतिहासाची संशोधनपद्धती उपयुक्त ठरते. याबाबतची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

☞ **(अ) विज्ञान :**

1. वैज्ञानिक शोध आणि सिद्धान्त यांचा कालक्रम आणि त्या शोधांमागील कारणपरंपरेची साखळी समजावून घेणे. यासाठी विज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो. गरज ही शोधाची जननी असते, असे म्हटले जाते.

2.अनेकदा वैज्ञानिक शोध हे मानवी गरजांची पूर्ती आणि जिज्ञासेचे समाधान करण्याच्या प्रयत्नातून लागलेले असतात. त्यासाठी आधी अस्तित्वात असलेल्या वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग केला जातो. या शोधांमागील कारणपरंपरा, कालक्रम समजून घेण्यासाठी विज्ञानाच्या इतिहासाचे ज्ञान उपयोगी पडते.


☞ **(ब) कला :**

1. विविध कलाक्षेत्रांमधील अभिव्यक्ती व त्यामागील वैचारिक-भावनिक-सांस्कृतिक परंपरांच्या आधाराने झालेला कलांचा विकास समजावून घेणे महत्त्वाचे असते.
2.कोणत्याही कलाविष्काराचे मर्म, कलाकृतीच्या निर्मात्याची मानसिकता आणि विशिष्ट कलाशैलीच्या विकासाचा क्रम सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासाद्वारे समजू शकतो.

☞ **(क) व्यवस्थापनशास्त्र :**

1. उत्पादनाची संसाधने, मनुष्यबळ आणि उत्पादनाच्या विविध प्रक्रिया, बाजार आणि विक्री यांच्या व्यवस्थापनाच्या साखळीत त्यासंबंधातील भूतकालीन यंत्रणा कशा होत्या, हे समजावून घेणे आवश्यक असते.
2.या साखळीत गुंतलेल्या विविध स्तरांवरील लोकांची परंपरागत मानसिकता समजावून घेण्यासाठी या सर्वांचा डोलारा ज्या वेगवेगळ्या सामाजिक आणि आर्थिक संस्थांच्या संघटनावर अवलंबून असतो, त्यांचा इतिहास समजला तर वर्तमानात विविध पातळ्यांवरील व्यवस्थापन करणे सोपे होते.
अशा प्रकारे, संशोधनात इतिहासाची संशोधन पद्धती विज्ञान, कला, व्यवस्थापनशास्त्र या विषयांमधील संशोधनास उपयुक्त ठरते.

(२) प्रसारमाध्यमांची आवश्यकता स्पष्ट करा
उत्तर :
प्रसारमाध्यमांची आवश्यकता पुढीलप्रमाणे --
1. माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पसरवण्यासाठी प्रसारमाध्यमांची आवश्यकता असते.
2.अग्रलेख, विविध सदरे, पुरवण्या हे वर्तमानपत्राचे अविभाज्य भाग असतात.
3.वाचकांच्या पत्रव्यवहाराच्या माध्यमातून वाचकही आपले म्हणणे मांडत असतात.
4.लोकशाही अधिक सुदृढ होण्यास वर्तमानपत्रे मदत करू शकतात.




5.दूरदर्शन हे दृक्-श्राव्य माध्यम असल्याने त्याने वर्तमानपत्र आणि आकाशवाणी यांच्या मर्यादा ओलांडून जनतेला 'प्रत्यक्ष काय घडले' हे दाखवायला सुरुवात केली. जनतेला एखाद्या घटनेचा 'आँखो देखा हाल' पाहण्यासाठी दूरदर्शनला पर्याय नाही.
अशा प्रकारे, प्रसारमाध्यमांची आवश्यकता लिहिता येईल.

(३) खेळ आणि व्यावसायिक संधी याविषयी माहिती लिहा
उत्तर :
खेळ आणि व्यावसायिक संधी याविषयी माहिती पुढीलप्रमाणे --
1. खेळ आणि इतिहास या गोष्टी वरवर पाहता भिन्न वाटल्या तरीसुद्धा त्यांचा निकटचा संबंध आहे. इतिहासाच्या विद्यार्थ्यांना 'क्रीडा' क्षेत्रात अनेक संधी आहेत.
2.ऑलिंपिक किंवा एशियाड सामने किंवा कोणत्याही स्वरूपाची राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या संदर्भातील लेखन, समीक्षा करण्यासाठी इतिहासाच्या जाणकारांची मदत घ्यावी लागते.
3.खेळांच्या स्पर्धा सुरू असताना त्याबद्दल समीक्षापूर्ण निवेदन करण्यासाठी तज्ज्ञांची आवश्यकता असते. या तज्ज्ञांना खेळाचा इतिहास, मागील आकडेवारी, खेळातील विक्रम, गाजलेले खेळाडू, खेळासंबंधीची ऐतिहासिक आठवण अशा गोष्टींची माहिती देणे गरजेचे असते. यासाठी इतिहास उपयुक्त ठरतो.
4.दूरदर्शनवरून हॉकी, क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, बुद्धिबळ इत्यादी खेळांच्या सामन्यांचे प्रत्यक्ष सामना चालू असतानाचे प्रक्षेपण चालू असते. विविध वाहिन्यांमुळे या खेळांसंबंधित नोंदी ठेवणाऱ्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. खेळाशी संबंधित असणाऱ्या वाहिन्या २४ तास सुरू असतात. त्यामुळे या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

5.खेळाच्या स्पर्धांमध्ये पंचांची आवश्यकता असते. पंच म्हणून पात्रता प्राप्त करण्यासाठी परीक्षा असतात. अशी पात्रता प्राप्त केलेल्या पंचांना जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर काम करण्याची संधी मिळते.
6.सरकारी आणि खासगी पातळीवरून खेळांना उत्तेजन देण्याचे प्रयत्न चालू आहेत. खेळाडूंसाठी शिष्यवृत्तींची व्यवस्था करण्यात आली आहे. सरकारी आणि खासगी आस्थापनांमध्ये खेळाडूंसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.
अशा प्रकारे, खेळ आणि व्यावसायिक संधी याविषयी माहिती लिहिता येईल.

## ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन स्पष्ट करा.

उत्तर :

ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन संबंधीची माहिती पुढीलप्रमाणे --
**1.**ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन करणे हे एक मोठे आव्हान आहे.
2.आपल्या देशाला प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन अशा ऐतिहासिक स्थळांचा वारसा मिळाला आहे.
3.त्याचबरोबर नैसर्गिक समृद्धीचा वारसाही आपल्याला लाभलेला आहे. या वारशाचे नैसर्गिक आणि मानवनिर्मित (सांस्कृतिक) अशा दोन प्रकारचा वारसा असतो.
4.सपूर्ण जगात गौरवली गेलेली काही महत्त्वाची स्थळे भारतात आहेत. ताजमहाल आणि जंतरमंतर वेधशाळेच्या बरोबरीने महाराष्ट्रातील अजिंठा, वेरूळ, घारापुरी (एलिफंटा लेणी), छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक, पश्चिम घाटातील कास पठार यांचा समावेश आहे.
5. जागतिक वारसा स्थळांना भेट देण्याची इच्छा जगभरातील पर्यटकांना असते. ही वारसा स्थळे बघण्यासाठी आपल्या देशात परदेशातून हजारो लोक येतात.
6.जागतिक वारसा स्थळांमध्ये भारतातील एखाद्या स्थळाची निवड झाली की आपली छाती अभिमानाने फुगून येते. परंतु आपण जेव्हा सहलीच्या निमित्ताने अशा ठिकाणी जातो तेव्हा आपणांस काय चित्र दिसते? स्थळांच्या परिसरात पर्यटक खडूने, कोळशाने आपली नावे लिहितात, चित्रे काढतात. त्याचा विपरीत परिणाम आपल्या देशाच्या प्रतिमेवर होतो.
7.पर्यटन स्थळांच्या जतनासाठी पुढील निश्चय करणे आवश्यक आहे.
अ) मी पर्यटन स्थळाची स्वच्छता राखीन, कचरा टाकणार नाही.
ब) कोणत्याही ऐतिहासिक वास्तूचे विद्रूपीकरण करणार नाही.
अशा प्रकारे, ऐतिहासिक स्थळांचे जतन आणि संवर्धन स्पष्ट करता येईल.

**प्रश्न ६. : उत्तरे**

(१) महाराष्ट्रात स्थानिक शासनसंस्थांमध्ये महिलांसाठी **५०%** जागा राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत.
(२) भारताचे जलपुरुष या नावाने ओळखले जाणारे **डॉ.राजेंद्र सिंह** यांनी राजस्थान येथे मोठी जलक्रांती घडवून आणली आहे.

**प्रश्न ७. :उत्तरे**

(१) माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता वाढली आहे.
**उत्तर : प्रस्तुत विधान चूक आहे कारण-**

1. लोकशाहीत नागरिकांचे सक्षमीकरण अनेक मार्गांनी झाले पाहिजे. नागरिकांना सहभागाच्या संधी देत असतानाच त्यांच्याशी असणारा शासनाचा संवाद वाढला पाहिजे.
2. शासन व नागरिक यांच्यात जितके अंतर कमी आणि संवाद जास्त, त्या प्रमाणात लोकशाही प्रक्रिया सकस, सुदृढ होत जाते. त्यांच्यातील परस्पर विश्वास वाढण्यासाठीही शासन काय करते हे नागरिकांना समजले पाहिजे.
3. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व ही सुशासनाची दोन वैशिष्ट्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी भारतीय नागरिकांना माहितीचा अधिकार देण्यात आला.
4. माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी झाली व शासनाचे व्यवहार अधिक खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली.

(२) पहिल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी मतदार याद्या तयार करण्याचे काम आव्हानात्मक होते.
**उत्तर : प्रस्तुत विधान बरोबर आहे कारण-**

1. आपल्या देशात निरक्षरतेचे प्रमाण अधिक होते व त्यामुळे मतदान करण्याची विशेष पद्धत वापरली गेली.
2. मतदानासाठी स्टीलच्या जवळजवळ वीस लाख मतपेट्या तयार केल्या गेल्या आणि त्या मतपेट्यांवर पक्षांची निवडणूक चिन्हे चिकटवली गेली.
3. ज्या पक्षाला मतदान करायचे त्या पक्षाचे निवडणूक चिन्ह असलेल्या पेटीत मतदारांनी कोऱ्या कागदाची घडी करून टाकायची अशी पद्धत ठरवण्यात आली. त्यामुळे निरक्षर लोकांना मतदान करता आले.

(३) ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

**उत्तर : प्रस्तुत विधान बरोबर आहे कारण,**

1. आपल्या देशात १९८६ साली ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर ग्राहक चळवळीचा उदय झाला. या चळवळीचे उद्दिष्ट व्यापक आहे.
2. समाजातील प्रत्येक घटक हा ग्राहक असतो. अर्थव्यवस्थेतील बदलांमुळे, तसेच समाजव्यवस्था बदलल्यामुळे ग्राहकांवर परिणाम होतो. त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.
3. जसे भेसळ, वस्तूंची वाढवलेली किंमत, वजन-मापातील फसवणूक इत्यादी. अशा प्रकारच्या फसवणुकीपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

**प्रश्न ८ (अ ) उत्तरे :**

(१) प्रादेशिक पक्ष :

**उत्तर :**

1. समाजातील विशिष्ट प्रदेशाच्या वेगळेपणाचा अभिमान बाळगणारे आणि त्याचा विकास व्हावा म्हणून सत्तेच्या स्पर्धेत उतरणाऱ्या राजकीय गटांना 'प्रादेशिक पक्ष' म्हणतात.
2. त्यांचा प्रभाव त्या-त्या प्रदेशापुरता मर्यादित असतो. तरीही आपल्या प्रदेशात प्रभावी भूमिका घेऊन ते राष्ट्रीय राजकारणावर आपली छाप पाडतात.
3. प्रादेशिक पक्ष प्रादेशिक समस्यांना प्राधान्य देतात. आपल्या प्रदेशाचा विकास करण्यासाठी त्यांना केवळ अधिकारांऐवजी स्वायत्तता आवश्यक वाटते. संघशासनाला सहकार्य करत आपले स्वायत्ततेचे क्षेत्र अबाधित ठेवण्याचा प्रादेशिक पक्ष प्रयत्न करतात.

(२) आदिवासी चळवळ

**उत्तर :**

1. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी आदिवासींच्या जंगल संपत्तीवर उदरनिर्वाह करण्याच्या हक्कावर गदा आणली. छोटा नागपूर परिसरातील कोलाम, ओडिशातील गोंड, महाराष्ट्रातील कोळी, भिल्ल, रामोशी, बिहारमधील संथाळ, मुंडा आदिवासींनी मोठ्या प्रमाणात उठाव केला.
2. तेव्हापासून आदिवासींचा संघर्ष चालू आहे. भारतातील आदिवासींचे अनेक प्रश्न आहेत. त्यांतील प्रमुख प्रश्न म्हणजे त्यांचा वनावरील अधिकार नाकारला जातो.
3. आदिवासी चळवळीची प्रमुख मागणी म्हणजे आदिवासींचे वनावरील अधिकार मान्य करावेत, वनातील उत्पादने गोळा करण्याचा आणि वनजमिनीवर लागवड करण्याचा अधिकार त्यांना मिळावा

**प्रश्न ८ (ब ) उत्तरे :**

(१)

**उत्तर : निवडणूक प्रक्रिया :**

| |
|---|
| मतदारसंघाची निर्मिती<br>↓ |
| **मतदार याद्या निश्चिती** |

↓

**उमेदवारांकडून नामांकन पत्र व छाननी**

↓

**निवडणूक प्रचार**


↓

**प्रत्यक्ष मतदान**

↓

मतमोजणी

**२) उत्तर:**




**प्रश्न ९. उत्तरे :**

1)मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले?

**उत्तर :** मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे झालेले परिणाम -

1) स्वतंत्र्य भारतातील नव्या युवा वर्गाला यामुळे अर्थातच राजकीय अवकाश प्राप्त झाले.
2)अशा लोकशाहीची व्याप्ती वाढवणाऱ्या बदलामुळे भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.
3)इतकी मतदारसंख्या अन्य कोणत्याच लोकशाही असलेल्या देशात आढळत नाही. हा बदल केवळ संख्यात्मक नसून तो गुणात्मकही आहे.
4)अनेक राजकीय पक्ष या युवा मतदारांच्या पाठिंब्यामुळे सत्तेच्या स्पर्धेत उतरले.
5) भारतातील राजकीय स्पर्धेचे स्वरूपही त्यामुळे बदलले आहे.

(१) पर्यावरण चळवळीचे कार्य स्पष्ट करा.

**उत्तर :** पर्यावरण चळवळीचे कार्य पुढीलप्रमाणे ----

1)पर्यावरणाचा ऱ्हास ही आजच्या काळातील एक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील गंभीर समस्या आहे
2)पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरही अनेक चळवळी सक्रिय आहेत आणि या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्यही खूप मोठ्या प्रमाणावर आहे.
3)भारतातही पर्यावरणातील विविध विषयांना प्राधान्य देत अनेक चळवळी सक्रिय आहेत.

1. जैवविविधतेचे संरक्षण, पाण्याच्या विविध स्रोतांचे जतन, जंगल आवरण, नद्यांचे प्रदूषण, हरितपट्ट्याचे संरक्षण, रासायनिक द्रव्यांचा वापर व त्यांचे दुष्परिणाम इत्यादी प्रश्न घेऊन चळवळी पर्यावरण संघर्ष करत आहेत.

All the best

नमूना प्रश्नपत्रिका – 03

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण : 40

---

**सूचना :**

(1) सर्व प्रश्न / कृती सोडविणे आवश्यक आहे.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे / कृतीचे पुन गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न / कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न / कृती राज्यशास्त्र या विषयावरील आहे.

(4) प्रश्न क्रमांक 2 (अ) आणि 8 (ब) मधील संकल्पनचित्रे / कृती त्याचा नमूना अराखड्यात पेनाने / पेन्सिलीने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(5) प्रश्न 1 ला (अ) , (ब) व प्रश्न 6 वा या प्रश्नाची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर ही गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

**प्रश्न १. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.** **3**

१) भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार -------------- येथे आहे.
अ) दिल्ली ब) कोलकत्ता क) मुंबई ड) चेन्नई

२) 'हितोपदेश' या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद --------------- यांनी केला.
अ) जेम्स मिल ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर
क) माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ड) सर जॉन मार्शल

३) थॉमसकुकने ---------------------- विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरु केला.
अ) हस्तकौशल्याच्या वस्तू ब) खेळणी
क) खाद्यवस्तू ड) पर्यटन तिकिटे

**ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.** **3**


१) (अ) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगल -- रीझन इन हिस्टरी
(ब) लिओपोल्ड व्हॉन रंके -- द थिअरी ॲण्ड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी
(क) हिरोडोटस -- द हिस्टरीज
(ड) कार्ल मार्क्स -- डीसकोर्स ऑन द मेथड

२) (अ) प्रभाकर -- आचार्य प्र. के. अत्रे
(ब) दर्पण -- बाळशास्त्री जांभेकर
(क) दीनबंधू -- कृष्णराव भालेराव
(ड) केसरी -- बाळ गंगाधर टिळक

३) (अ) घारापुरी (एलिफंटा) -- लेणी
(ब) पंढरपूर -- देवस्थान
(क) सागरेश्वर -- धरण
(ड) पाचगणी -- थंड हवेचे ठिकाण

**प्रश्न २. (अ) दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.(कोणतेही दोन)** **4**


(१) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




3) पुढील कालरेषा पूर्ण करा :




**(ब) थोडक्यात टीपा लिहा.(कोणत्याही दोन):** **4**

1) ॲनल्स प्रणाली

2) मनोरंजनाची आवश्यकता.

3) कृषी पर्यटन

**प्रश्न ३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** **4**

(१) तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

(२) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.

(३) संत एकनाथांची भारुडे लोकप्रिय झाली.

(४) आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे.

**प्रश्न ४. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**


खेळ आणि इतिहास या गोष्टी वरवर पाहता भिन्न वाटल्या तरी सुद्धा त्याचा निकटचा संबंध आहे. इतिहासाच्या विद्यार्थ्यांना 'क्रीडा' क्षेत्रात अनेक संधी आहेत. ऑलम्पिक किंवा एशियाड सामने किंवा कोणत्याही स्वरूपाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या संदर्भातील लेखन समीक्षा करण्यासाठी इतिहासाच्या जाणकाराची मदत घ्यावी लागते.

खेळाच्या स्पर्धा सुरू असताना त्याबद्दल समीक्षा पूर्ण निवेदन करण्यासाठी तज्ञांची आवश्यकता असते. या तज्ज्ञांना खेळाचा इतिहास, मागील आकडेवारी, खेळातील विक्रम, गाजलेले खेळाडू, खेळासंबंधीचे ऐतिहासिक आठवण अशा गोष्टींची माहिती देणे गरजेचे असते. यासाठी इतिहास उपयुक्त ठरतो.

दूरदर्शन वरून हॉकी, क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, बुद्धिबळ इत्यादी खेळांच्या सामन्याचे प्रत्यक्ष सामना चालू असतानाचे प्रक्षेपण चालू असते. विविध वाहिन्यांमुळे या खेळासंबंधी नोंदी ठेवणाऱ्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. खेळाशी संबंधित असणाऱ्या वाहिन्या 24 तास सुरू असतात. त्यामुळे या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

खेळाच्या स्पर्धांमध्ये पंचांची आवश्यकता असते. पंच म्हणून पात्रता प्राप्त करण्यासाठी परीक्षा असतात. अशी पात्रता प्राप्त केलेल्या पंचांना जिल्हा राज्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळते. सरकारी आणि खाजगी पातळीवरून खेळांना उत्तेजन देण्याचे प्रयत्न चालू आहेत. खेळाडूंसाठी शिष्यवृत्तीची व्यवस्था करण्यात आली आहे. सरकारी आणि खाजगी आस्थापनामुळे खेळाडूंसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

(१) आकृतिबंध पूर्ण करा : 1




2) खेळांना उत्तेजन देण्यासाठी सरकार काय करते? 1

3) खेळांतून व्यावसायिक संधी कशा प्राप्त होतात? 2

**प्रश्न ५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : 6**

(१) मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय?

(२) कलाक्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, हे स्पष्ट करा.

(३) पर्यटनाशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे स्पष्ट करा.

(४) ऐतिहासिक वारसास्थळांच्या संदर्भात युनेस्कोने कोणते कार्य केले?

**प्रश्न ६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : 2**

(१) लोकशाहीचा गाभा म्हणजे --------------- होय.

(अ) प्रौढ मताधिकार (ब) सत्तेचे विकेंद्रीकरण

(क) राखीव जागांचे धोरण (ड) न्यायालयीन निर्णय

(2) शेतकरी चळवळीची ----------------- ही प्रमुख मागणी आहे.

(अ) वनजमिनीवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा.

(ब) शेतमालाला योग्य भाव मिळावा.

(क) ग्राहकांचे संरक्षण करावे.

(ड) धरणे बांधावीत.

**प्रश्न ७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सहकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) : 4**

(१) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजा प्रमाणे असते.

(२) 'शिरोमणी अकाली दल' हा राष्ट्रीय पक्ष आहे.


(३) लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष र्शावे लागते.

**प्रश्न ८. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतेही एक) : 2**


(१) माहितीचा अधिकार. (2) राष्ट्रीय पक्ष

**(ब) दिलेल्या सुचनेनुसार कृती करा (कोणतेही एक) : 2**

(१) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :




(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :




**प्रश्न ९ पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही एक) :** **2**

(१) 'निवडणूक आचारसंहिता' म्हणजे काय हे स्पष्ट करा.

(२) राजकीय पक्षाची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

All the best

सराव उत्तरपत्रिका – 03

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण : 40

---

**प्रश्न १. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.** **3**

(प्रत्येकी १ गुण)


४) दिल्ली
५) फ्रेडरिक मॅक्सम्यु
६) पर्यटन तिकिटे

**ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.** **3**


१) कार्ल मार्क्स -- डीसकोर्स ऑन द मेथड
२) प्रभाकर -- आचार्य प्र. के. अत्रे
३) सागरेश्वर -- धरण

**प्रश्न २. (अ) दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.(कोणतेही दोन)** **4**


(२) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.



(३) पुढील कालरेषा पूर्ण करा :




**(ब) थोडक्यात टीपा लिहा.(कोणत्याही दोन):** **4**

१) ॲनल्स प्रणाली -

उत्तर – अ) विसाव्या शतकातील सुरवातीला फ्रान्समध्ये उदयाला आलेली इतिहास लेखनाची ॲनल्स हि पएक प्रणाली आहे.

ब) ॲनल्स प्रणालीमुळे इतिहास लेखनाला एक वेगळीच दिशा मिळाली.

क) इतिहासाचा अभ्यास फक्त राजकीय घडामोडी, राजे, महान नेते आणि त्या अनुषंगाने राजकारण, मुत्सद्देगिरी, युद्धे यांच्यावर केंद्रित न करता तत्कालीन हवामान, स्थानिक लोक, शेती, व्यापार, तंत्रज्ञान, दळणवळण, संपर्काची साधने, सामाजिक विभागणी आणि समूहाची मानसिकता यासारख्या विषयाचा अभ्यास करणे महत्वाचे मानले जाऊ लागले.

ड) हि इतिहास लेखनाची प्रणाली व तिचा विकास करण्याचे श्रेय फ्रेंच इतिहासकारांना जाते.

2) मनोरंजनाची आवश्यकता –

उत्तर – अ) उत्तम रातीचे निखळ मनोरंजन व्यक्तीच्या निकोप वाढीसाठी महत्त्वाचे असते.

ब) चाकोरीबद्ध जगण्यातील कंटाळा दूर करून मनाला चैतन्य, ताजेपणा, शरीराला उत्साह मिळून देण्याचे काम मनोरंजन करते.

क) मनोरंजनामुळे माणसाच्या कार्यशक्ती वाढविण्यास मदत होते.

ड) मनोरंजनातून छंद व खेळाच्या जोपासनेने व्यक्तिमत्वाचा विकास होतो.

३) कृषी पर्यटन

उत्तर – अ) शहरी संस्कृतीत वाढलेल्या व कृषी जीवनाची माहिती नसलेल्यासाठी कृषी पर्यटन हा प्रकार आलेला आहे.

ब) भारतात कृषी संशोधन मोठ्या प्रमाणात सुरु आहे. त्यातून कृषी संशोधन केंद्रे, कृषी विद्यापीठ यात होणाऱ्या अभिनव प्रयोग पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात कृषी पर्यटन होत आहे.

क) पाण्याचे प्रमाण कमी असलेल्या इस्रायल सारख्या देशाने कृषीक्षेत्रात कलेला विकास व त्यांनी विकसित केलेले तंत्रज्ञान पाहण्यासाठी शेतकरी, विद्यार्थी मोठ्या प्रमाणात विदेशात जातात.

**प्रश्न ३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन)** **4**

(५) तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

उत्तर – अ) मानवी उत्क्रांतीत दगडाच्या हत्यारापासून ते कृषी उत्पादनाच्या विकासापर्यंत त्याला समजलेले विज्ञान व तंत्रज्ञान महत्वाचे आहे.

ब) कृषी उत्पादन, वस्तूंचे उत्पादन, स्थापत्य, अभियांत्रिकी यात होत गेलेला बदल समजावून घेण्यासाठी तंत्रज्ञानाचा अभ्यास करावा लागतो.

क) विज्ञानाच्या प्रगतीमुळे उत्पादन प्रक्रियांचे यांत्रिकीकरण होत गेले. याच साठी तंत्रज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो.

(६) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.

उत्तर – अ) रोजच्या रोज नवीन बातमी देत असतांना "बातमी मागची बातमी" सांगताना इतिहासाची गरज पडते.

ब) दिनविशेषासारखी सदरे देतांना पूर्वीच्या घटनांची माहिती करून घ्यावी लागते.

क) वर्तमानपत्रातील काही सदरे अशी असतात कि, त्या सदरातून भूतकाळातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक घटना समजतात.

ड) वर्तमानपत्रांना विशेष प्रसंगी पुरवण्या किवां विशेषांक काढावे लागतात त्या वेळी इतिहासाचा अभ्यास उपयोगी पडतो.

(७) संत एकनाथांची भारुडे लोकप्रिय झाली.

उत्तर – अ) आध्यात्मिक व नैतिक शिकवण देणारे एक रूपात्मक गीत म्हणजे भारुड होय.

ब) पथनाट्याप्रमाणे भारुड हे प्रयोगशील होते.

क) भारुडामध्ये विविधता, नाट्यात्मकता, विनोद आणि गेयता यामुळे ते लोकप्रिय झाली.

(८) आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे.

उत्तर – अ) जहाज, रेल्वे आणि विमान यांच्यामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटन सुलभ झाले आहे.

ब) आर्थिक उदारीकरणामुळे जग अधिक जवळ आले आहे.

क) अभ्यास, विरंगुळा, स्थलदर्शन, व्यावसायिक कामे, चित्रपटाचे चित्रीकरण यासारख्या कामांसाठी देश विदेशात पर्यटनाचे प्रमाण वाढले आहे.

**प्रश्न ४. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**


खेळ आणि इतिहास या गोष्टी वरवर पाहता भिन्न वाटल्या तरी सुद्धा त्याचा निकटचा संबंध आहे. इतिहासाच्या विद्यार्थ्यांना ‘क्रीडा’ क्षेत्रात अनेक संधी आहेत. ऑलम्पिक किंवा एशियाड सामने किंवा कोणत्याही स्वरूपाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या संदर्भातील लेखन समीक्षा करण्यासाठी इतिहासाच्या जाणकाराची मदत घ्यावी लागते.

खेळाच्या स्पर्धा सुरू असताना त्याबद्दल समीक्षा पूर्ण निवेदन करण्यासाठी तज्ञांची आवश्यकता असते. या तज्ज्ञांना खेळाचा इतिहास, मागील आकडेवारी, खेळातील विक्रम, गाजलेले खेळाडू, खेळासंबंधीचे ऐतिहासिक आठवण अशा गोष्टींची माहिती देणे गरजेचे असते. यासाठी इतिहास उपयुक्त ठरतो.

दूरदर्शन वरून हॉकी, क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी, बुद्धिबळ इत्यादी खेळांच्या सामन्याचे प्रत्यक्ष सामना चालू असतानाचे प्रक्षेपण चालू असते. विविध वाहिन्यांमुळे या खेळासंबंधी नोंदी ठेवणाऱ्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. खेळाशी संबंधित असणाऱ्या वाहिन्या 24 तास सुरू असतात. त्यामुळे या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

खेळाच्या स्पर्धांमध्ये पंचांची आवश्यकता असते. पंच म्हणून पात्रता प्राप्त करण्यासाठी परीक्षा असतात. अशी पात्रता प्राप्त केलेल्या पंचांना जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळते. सरकारी आणि खाजगी पातळीवरून खेळांना उत्तेजन देण्याचे प्रयत्न चालू आहेत. खेळाडूंसाठी शिष्यवृत्तीची व्यवस्था करण्यात आली आहे. सरकारी आणि खाजगी आस्थापनामुळे खेळाडूंसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

1) आकृतिबंध पूर्ण करा : 1




2) खेळांना उत्तेजन देण्यासाठी सरकार काय करते? 1

उत्तर – खेळाला उत्तेजन देण्यासाठी सरकारी आणि खाजगी आस्थापना मध्ये खेळाडूंना नोकरीच्या राखीव जागा दिल्या आहेत.

3) खेळांतून व्यावसायिक संधी कशा प्राप्त होतात? 2

उत्तर – अ) खेळाच्या सामन्यांचे प्रत्यक्ष प्रेक्षेपण चालू असतांना विविध खेळ संबंधी नोंदी ठेवणाऱ्यांची गरज असते. त्यामुळे यात

रोजगाराच्या संधी उपलब्ध असते.

ब) खेळाच्या स्पर्धेत मोठ्या प्रमाणात पंचाची गरज असते. पात्रता पूर्ण केलेल्या पंचांना मोठ्याप्रमाणात काम करण्याची संधी मिळते.

क) खेळा संबधी लेखन करणारे लेखक व समीक्षक

**प्रश्न ५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **6**

(५) मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय?

उत्तर – अ) मार्क्सवादात वर्ग संघर्षावर भर दिला आहे.

ब)मार्क्सवादी इतिहास लेखनात आर्थिक व्यवस्थेतील उत्पादनाची साधने, पद्धती आणि उत्पादनाच्या प्रक्रियेतील मानवी संबध यांचा विचार केलेला आहे.

क) प्रत्येक सामाजिक घटनेचा सर्वसामान्य लोकांवर काय परिणाम होतो याचे विश्लेषण करणे हे मार्क्सवादी इतिहास लेखनाचे महत्वाचे सूत्र होते.

ड) मार्क्सवादी इतिहासकारांनी जातीव्यवस्थेत होत गेलेला बदलांचा अभ्यास केला.

(६) कलाक्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, हे स्पष्ट करा.

उत्तर – अ) कलेच्या इतिहासाचे अभ्यासक पत्रकारितेच्या क्षेत्रात संधी उपलब्ध आहे.

ब) कलावस्तूच्या खरेदी-विक्री व्यवसायात कलांच्या जाणकारांची आवश्यकता असते.

क) चित्रपट आणि नाटक निर्मितीसाठी नेपथ्य, कलाकार, दिग्दर्शन, छायाचित्रकार, प्रकाशयोजना इत्यादी कलाकारांची आवश्यकता असते.

ड) संग्रहालय आणि अभिलेखागार, ग्रंथालय आणि माहिती प्रसारणाचे तंत्रज्ञान, पुरातत्त्वीय संशोधन आणि भारतीय विद्या या ठिकाणी व्यवसाय मिळू शकते.

इ) दागदागिने, धातूच्या वा लाकडी शोभेच्या वस्तू बनवणे या क्षेत्रात अनेक व्यवसायिक संधी आहेत.

(७) पर्यटनाशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे स्पष्ट करा.

उत्तर – अ) पर्यटकांच्या राहण्यासाठी असणारी निवासस्थाने चालवणे.

ब) पर्यटकांच्या खाण्यासाठी लागणारे व्यवसाय करणे.

क) स्थानिक हस्तोद्योग आणि स्थानिक वस्तू विक्रीची दुकाने.

ड) पर्यटकांच्या वाहतुकीची व्यवस्था करणारे पूरक व्यवसाय.

इ) पर्यटन मार्गदर्शक व फोटोग्राफर यांचे रोजगार निर्माण करणारे व्यवसाय निर्मिती होते.

(८) ऐतिहासिक वारसास्थळांच्या संदर्भात युनेस्कोने कोणते कार्य केले?

उत्तर – अ) नामशेष होण्याच्या वाटेवर असलेल्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसाचे जतन व संवर्धन व्हावे या हेतूने युनोस्कोने काही दिशादर्शक तत्त्वे जाहीर केले आहे.

ब) जागतिक वारशाच्या पदास पात्र असलेली स्थळे, परंपरा यांची यादी जाहीर केली.

क) याद्या जाहीर करून युनोस्को प्राचीन वारसा जपण्यासाठी लोकांचे व राष्ट्रांचे लक्ष वेधून घेते.

**प्रश्न ६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :** **2**

१) सत्तेचे विकेंद्रीकरण

(2) शेतमालाला योग्य भाव मिळावा.

**प्रश्न ७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) :** **4**

**1) संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजा प्रमाणे असते.**

उत्तर – हे विधान बरोबर आहे.

अ)  आपले संविधान हे लिखित स्वरुपात आहे. पण ते ग्रंथात बंदिस्त नसून प्रवाही आहे.

आ) संविधानात बदल करण्याचा अधिकार संसदेला आहे.

इ)   साविधानाच्या मलभूत चौकटीला धक्का न लावता काही बदल संसदेला करता येतो.

**2)  'शिरोमणी अकाली दल' हा राष्ट्रीय पक्ष आहे.**

उत्तर – हे विधान चूक आहे.

अ)  भारतीय निवडणूक आयोग राजकीय पक्षांना निकषांवर पक्षांना मान्यता देत असते.

आ) लोकसभा व विधानमंडळ यात मिळवलेल्या जागा आणि निवडणुकीत मिळालेल्या मतांची अट असते.

इ)   'शिरोमणी अकाली दल' हा राष्ट्रीय पक्षाच्या अटीची पूर्तता करत नाही. म्हणून 'शिरोमणी अकाली दल' राष्ट्रीय पक्ष नाही.

**3) लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे  लागते.**

उत्तर – हे विधान बरोबर आहे.

अ)  लोकशाही हि केवळ शासकीय न ठेवता ती लोकांपर्यंत पोहचवली पाहिजे.

आ) लोकशाहीत लोकांचे मुलभूत हक्क अबाधित ठेवले पाहिजे.

इ)   लोकशाहीला आव्हान देणाऱ्या समस्यांची वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**प्रश्न ८. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा  (कोणतेही एक) :** **2**

(२)  माहितीचा अधिकार.

उत्तर – अ) शासन व नागरिक यांच्यातील परस्पर विश्वास वाढवण्यासाठी शासन काय करते हे नागरिकांना समजले पाहिजे.

ब) पारदर्शकता आणि उत्तरदायीत्व हि सुशासनाची वैशिष्ट्ये प्रत्यक्षात आणण्यासाठी माहितीचा अधिकार देण्यात आला.

क) यामुळे शासनाच्या व्यवहारात खुलेपणा आणि पारदर्शीपणा आलेला दिसतो.

(2) राष्ट्रीय पक्ष


उत्तर – अ) राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी निवडणूक आयोगाने केलेल्या अटीची पूर्तता केलेली हवी.

ब) कमीतकमी चार राज्यात लोकसभा किवां विधानसभेच्या निवडणुकीत ६% मते किवां चार सदस्य लोकसभेवर निवडून आलेले पाहिजे.


क) लोकसभेच्या एकूण मतदार संघातून किमान 2% मतदार संघातून तीन राज्यातुने उमेदवार निवडून येणे गरजेचे आहे.

**(ब) दिलेल्या सुचनेनुसार कृती करा (कोणतेही एक)  :** **2**

(१) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :




(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा :



**प्रश्न ९ पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही एक) :** **2**

(३) 'निवडणूक आचारसंहिता' म्हणजे काय हे स्पष्ट करा.

उत्तर – अ) भारतात निवडणुका घोषित झाल्यापासून ते निकाल लागेपर्यंत राजकीय पक्षाने काय करावे व काय करू नये या बाबतीत निवडणूक आयोगाने केलेले नियम म्हणजे 'निवडणूक आचारसंहिता' होय.

ब) आयोगाने आपले सर्व अधिकार वापरून निवडणुकीतील गैरप्रकारांना आळा घालण्याचा प्रयत्न केला आहे.

(४) राजकीय पक्षाची ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

उत्तर – अ) निवडणुकांच्या माध्यमातून सत्ता मिळवणे हे राजकीय पक्षाचा हेतू असतो.

ब) प्रत्येक राजकीय पक्ष काही धोरणाचा, विचारांचा पुरस्कार करणारा असतो.

क) निवडणुकीत बहुमत मिळविल्यास सत्ता स्थापन करणे आणि बहुमत नमिळवल्यास विरोधी पक्ष म्हणून कार्य करणे.

ड) सरकार आणि जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करणे.

All the best

सराव प्रश्नपत्रिका – 04

इयत्ता: - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण : 40

---

**सूचना :**

(1) सर्व प्रश्न / कृती सोडविणे आवश्यक आहे.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे / कृतीचे पुन गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न / कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न / कृती राज्यशास्त्र या विषयावरील आहे.

(4) प्रश्न क्रमांक 2 (अ) आणि 8 (ब) मधील संकल्पनचित्रे / कृती त्याचा नमूना अराखड्यात पेनाने / पेन्सिलीने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(5) प्रश्न 1 ला (अ) , (ब) व प्रश्न 6 वा या प्रश्नाची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर ही गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

**प्र.1अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** 3

**1)** हितोपदेष या संस्कृत ग्रंथाना जर्मन भाशेत अनुवाद ------------ यांनी केला.

अ) जेम्स मिल ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

क) मांउट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ड) सर जॉन मार्षल

**(2) महाराष्ट्रा**चे पहिले मुख्यमंत्री ------------- यांनी मराठी विष्वकोश निर्मितीस चालना दिली.

अ) वसंतराव नाईक ब) षरद पवार

क) यषवंतराव चव्हाण ड) पृथ्वीराज चव्हाण

**(3)** महाबळेष्वर जवळील 'भिलार' हे ---------------- गाव म्हणून प्रसिध्द आहे.

अ) पुस्तकांचे ब) वनस्पतींचे क) आंब्याचे ड) किल्ल्यांचे

**ब)पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.** 3

**(1)** 1) द राईज ऑफ द मराठा पॉवर - न्या. म. गो. रानडे

2) मराठयांच्या इतिहासाची साधने - विश्णुषास्त्री चिपळूणकर

3) मराठयांची रियासत - गोविंद सखाराम सरदेसाई

4) गुलामगिरी - महात्मा फुले

**(2)**

1) कीचकवध - कृश्णाजी प्रभाकर खाडिलकर

2) एकच प्याला - राम गणेष गडकरी

3) इथे ओषाळला मृत्यू - वसंत कानेटकर

4) नटसम्राट - विजय तेंडुलकर

**(3)**

1) महाराज सयाजीराव विद्यापीठ - दिल्ली


2) बनारस हिंदू विद्यापीठ - वाराणसी

3) अलीगड मुस्लीम युनिव्हर्सिटी - अलीगड


4) षिवाजी विद्यापीठ - ग्वालियर

**प्र.2 अ ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही दोन )** **4**

**(1) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**(2) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**



**(3)** तक्ता पुर्ण करा

| क. | मराठी संगीत नाटक | लेखक |
|---|---|---|
| 1. | संगीत षाकुंतल | ....................................................... |
| 2. | .................................. | गोविंद बल्लाळ देवल |
| 3. | संगित मुकनायक | .......................................................... |
| 4. | .................................. | कृश्णाजी प्रभाकर खाडिलकर |

**ब) थोडक्यात टिपा लिहा. ( कोणतेही दोन )** 4

**(1)** लोकषिल्पकला

**(2)** खेळांचे महत्त्व

**(3)** कोश

**प्र.3 रा) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.( कोणतेही दोन )** **4**

**(1)** आजच्या काळात परदेशात जाण्याचे चे प्रमाण वाढत आहे.

**(2)** संत एकनाथांची भारूडे लोकप्रिय झाली.

**(3)** वर्तमानपत्रांना इतिहास विशयाची गरज पडते.

**(4)** मेजर ध्यानचंद यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हटले जाते.

**प्र.4 था) दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नाची उत्तरे लिहा.** **4**

खेळ आणि ग्रिक लोक यांचे नाते प्राचिन काळापासूनचे आहे. खेळांना नियमित व सुसंगटित स्वरूप ग्रीकांनी दिले. धावने, थाळीफेक, रथ व घोडयांच्या षर्यती, कुसती, मुश्टीयुध्द इत्यांदीचे सामने त्यांनी सुरू केले. प्राचीन ऑलिपिंक हि खेळाची स्पर्धा ऑलिपिंया या ग्रिक षहरात घेतली जात असे. या स्पर्धेत भाग घेणे व विजय मिळवणे मानाचे समजले जाते.

**प्रश्न :**

**(1)** प्राचिन ऑलिपिंक खेळाची स्पर्धा कोणत्या षहरात घेतली जात असे.

**(2)** खेळ आणि ग्रिक लोक यांचे नाते कोणत्या काळापासुनचे आहे.

**(3)** ऑलिपिंक स्पर्धाविशयी आपले मत मांडा.

**प्र.5 वा) पुढील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **6**

**(1)** मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय ?

**(2)** नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या प्रकल्पातुन कोणत्या **गोष्टी** साध्य होतात ?

**(3)** वाढत्या पर्यटणाचे होणारे फायदे स्पश्ट करा ?

**(4)** कला क्षे़त्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहे स्पश्ट करा ?

**प्र.6 वा ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **2**

**(1)** लोकषाहीचा गाभा म्हणजे **-----------**होय.

1) प्रौढ मताधिकार

2) सत्तेचे विकेंद्रीकरण

3) राखीव जागांचे धोरण

4) न्यायालयीन निर्णय

**(2) शेतकरी** चळवळीची **---------------** ही प्रमुख मागणी आहे.

1) वनजमिनीवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा.

2) षेतमालाला योग्य भाव मिळावा.

3) ग्राहकांचे संरक्षण करावे.

4) धरणे बांधावीत.

**प्र.7 वा ) पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.(कोणतेही दोन)** **4**

**(1)** संविधानाचे स्वरूप एखादया जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

**(2)** लोक**शा**ही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते.

**(3)** '**शि**रोमणी अकाली दल' हा **राष्ट्रीय** पक्ष आहे.


**प्र.8वा अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. ( कोणतेही एक )** **2**

**(1)** निवडणुक आयोग


**(2)** आदिवासी चळवळ

**ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही एक )** **2**

(1) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




(2) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.




**प्र.9वा) पुढील प्रश्नांचे थोडक्यात उत्तरे लिहा.(कोणतेही एक)** **2**

(1) वाढत्या भ्रश्टाचाराचे कोणते परिणाम होतात.

(2) 'निवडणुक आचारसंहिता' म्हणजे काय हे स्पश्ट करा.

All the best

सराव उत्तरपत्रिका – 04

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण : 40

---

**प्र.1 ( अ ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **3**

**(1)** हितोपदेश या संस्कृत ग्रंथाना जर्मन भाषेत अनुवाद **फ्रेडरिक मॅक्सम्युलर** यांनी केला.

अ) जेम्स मिल ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

क) मांउट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ड) सर जॉन मार्शल

**(2)** महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री **यशवंतराव चव्हाण** यांनी मराठी विश्वकोष निर्मितीस चालना दिली.

अ) वसंतराव नाईक ब) शरद पवार

क) यशवंतराव चव्हाण ड) पृथ्वीराज चव्हाण

**(3)** महाबळेश्वर जवळील 'भिलार' हे **पुस्तकांचे** गाव म्हणून प्रसिध्द आहे.

अ) पुस्तकांचे

ब) वनस्पतींचे

क) आंब्याचे

ड) किल्ल्यांचे

**( ब ) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.** **3**

**(1)**

1) द राईज ऑफ द मराठा पॉवर – न्या. म. गो. रानडे

2) मराठयांच्या इतिहासाची साधने – विष्णुशास्त्री चिपळूणकर

3) मराठयांची रियासत – गोविंद सखाराम सरदेसाई

4) गुलामगिरी – महात्मा फुले

उत्तर :– मराठयांच्या इतिहासाची साधने – विष्णुशास्त्री चिपळूणकर

**(2)** 1) कीचकवध – कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

2) एकच प्याला – राम गणेश गडकरी

3) इथे ओशाळला मृत्यू – वसंत कानेटकर

4) नटसम्राट – विजय तेंडुलकर

उत्तर :– नटसम्राट – विजय तेंडुलकर

**(3)**

1) महाराज सयाजीराव विद्यापीठ – दिल्ली

2) बनारस हिंदू विद्यापीठ – वाराणसी

3) अलीगड मुस्लीम युनिव्हर्सिटी – अलीगड


4) शिवाजी विद्यापीठ – ग्वालियर

उत्तर :– महाराज सयाजीराव विद्यापीठ – दिल्ली


**प्र.2 ( अ ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. ( कोणतेही दोन )** **4**

**(1) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**

१)




२)




**(3) तक्ता पुर्ण करा**

| **क्र.** | मराठी संगीत नाटक | लेखक |
|---|---|---|
| १. | संगीत शाकुंतल | **अण्णासाहेब किर्लोस्कर** |
| २. | **संगीत शारदा** | गोविंद बल्लाळ देवल |
| ३. | संगीत मुकनायक | **श्रीपाद कृष्ण कोल्हटकर** |
| ४. | **संगीत मानापमान** | कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर |

**प्र २. ब) टिपा लिहा .** **4**

१) लोकशिल्पकला

उत्तर :– १) लोककलांची परंपरा अश्मयुगीन काळापासून चालू आहे. हडप्पा संस्कृतीत मातीची आणि दगडांची शिल्पे, देवतांच्या मूर्ती तयार केल्या जात असत.

२) आजही बंगाल, बिहार, गुजरात महाराष्ट्र राजस्थान अशा अनेक राज्यांत मातीच्या गणेशाच्या, गोरीच्या मूर्ती तयार केल्या जातात.

३) मातीची खेळणी, मातीचे बैल तयार करण्याची पदधत हडप्पा संस्कृतीत होती.

४) पूर्वजनांच्या स्मरणासाठी उभे केलेले लाकडी खांब आणि वीरगळ यांवर शिल्पे कोरली गेलेली पाहावयास मिळतात.

अशा रितीने धार्मिक कारणांतून व मनोरंजनासाठी तयार केल्या जाणा—या कारगिरीतून लोकशिल्पकला टिकून राहिली व तिचा विकासही झाला.

२) **खेळांचे महत्त्व**

उत्तर :— खेळांचे पुढील दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे —

१) खेळांमुळे जीवनातील व्यथा व चिंता विसरल्या जातात.

२) माणसाच्या मनाला विरंगुळा मिळतो, त्यामुळे मन ताजेतवाने व उल्हसित होते.

३) खेळांमुळे व्यायाम होउन शरीर काटक व बळकट होते.

४) खेळांमुळे मनोधैर्य वाढते. चिकाटी, खिलाडूपणा हे गुण अंगी बाणतात.

५) सांघिक खेळातून सहकार्य व संघभावना वाढीस लागतात.

६) खेळांमुळे नेतृत्वगुणांचा विकास होतो.

खेळ हा शिक्षणाचा अविभाज्य भाग बनलेला असून खेळांमुळे व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व व संपन्न होते.

**३) कोष**

उत्तर :— १) शब्दांचा, विविध माहितीचा वा ज्ञानाचा केलेला पदधतशीर संग्रह म्हणजे **'कोष'** होय.

२) शब्दांचा व ज्ञानसंवर्धन करणा—या माहितीचा संग्रह म्हणजे **'कोष'** होय.

३) कोशवाङमयात ज्ञानाचे व माहितीचे शास्त्रशुदध संकलन आणि मांडणी केलेली असते.

४) अचूकपणा, वस्तुनिष्ठता व अदयावतता हे कोशवाङमयाचे गुणविशेष आहेत.

५) उपलब्ध ज्ञानाचे व्यवस्थापन सोप्या पदधतीने वाचकांना करून देणे, हे कोशवाङमयाचे उददिष्ट असते. कोशात सत्याला व वस्तुनिष्ठतेला फार महत्त्व असते. कोश हे राष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असून ते समाजजीवनाचा आरसा असतात.

**प्र ३) विधाने सकारण स्पष्ट करा.**

**१) आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे ?**

उत्तर :— १) जहाज, रेल्वे, आणि विमान या वाहतूक क्षेत्रांत झालेल्या प्रगतीमुळे आधुनिक काळात आंतराष्ट्रीय पर्यटन सोपे झाले आहे.

२) विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती व आर्थिक उदारीकरण यांमुळे जग अधिक जवळ आले आहे.

३) अभ्यास, व्यवसाय, चित्रपटांचे चित्रीकरण यांसारख्या विविध कारणांसाठी लोक जगभरातील ठिकाणांना भेटी देतात.

४) खेळ, आंतराष्ट्रीय परिषदा, संमेलने, ऐतिहासिक—धार्मिक स्थळे पाहणे या उददेशांनीही लोक जगभर हिंडत असतात. त्यामुळे पूर्वीपेक्षा आजच्या काळात लोकांचे परदेशात जाण्याचे प्रमाणे वाढत आहे.

**२) संत एकनाथांची भारूडे लोकप्रिय झाली ?**

**उत्तर :—** संत एकनाथांनी लोकशिक्षणाच्या हेतूने अनेक भारूडे लिहिली.

१) या भारूडांच्या माध्यमातून विषयांत विविधता आणि नाटयत्मकता होती.

२) विनोदाच्या माध्यमातून लोकांना शिक्षण देण्याचा, उपदेश करण्याचा हा प्रकार लोकांनाही आवडला.

३) ही भारूडे चालींवर गायली जात असत. त्यामुळे लोकसंगीताच्या आधारे ती गायली जात असतात.

४) व्यवहारातील साध्या साध्या उदाहरणांतून आणि विनोदाच्या माध्यमातून रचलेली संत एकनाथांची ही भारूडे म्हणूनच लोकप्रिय झाली.

**३) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते ?**

**उत्तरे :—** १) एखादयाला बातमीच्या सविस्तर आढावा घेताना वर्तमानपत्रांना तिचा भूतकाळ शोधावाच लागतो.

२) दिनविशेषासारखी सदरे देतानाही पूर्वीच्या घटना माहीत करून घ्यावा लागतात.

३) वर्तमानपत्रात काही सदरे अशी असतात की, ती इतिहासावरच आधारलेली असतात. अशा सदरांतून भूतकाळातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, घटना समजतात.

४) वृत्तपत्रे भूतकाळातील घटना, युदधे नेते आदींची शताब्दी वा ५०—७५ वर्षे पूर्ण झाल्या निमित्ताने लेख वा विशेष पुरवण्या काढतात. अशा वेळी संबंधित घटनेचा भूतकाळ अभ्यासावा लागतो.

**(4)** मेजर ध्यानचंद यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हटले जाते.

उत्तर :— १) मेजर ध्यानचंद हे त्या वेळच्या भारतीय हॉकी संघाचे मुख्य खेळाडू व संघनायक होते.

२) त्यांनी १९२८, १९३२, आणि १९३६ अशा सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांत भारताचे प्रतिनिधित्व करून भारताला हॉकीची सुवर्णपदके मिळवून दिली.

३) १९३२ च्या ऑलिम्पिकमध्ये त्यांनी अमेरिका व जपानविरूदध २५ गोल केले.

४) आपल्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्पर्धांत ४०० च्या वर गोल केले. म्हणून, मेजर ध्यानचंद यांच्या हॉकीतील या देदीप्यमान कामगिरीमुळे त्यांना 'हॉकीचे जादूगर' असे म्हटले जाते.

**प्र ४) उता—यातील प्रश्नांची उत्तरे** **4**

उत्तरे :— १) प्राचीन ऑलिपिंक हि खेळाची स्पर्धा ऑलिपिंया या ग्रिक शहरात घेतली जात असे.

उत्तरे :— २) खेळ आणि ग्रिक लोक यांचे नाते प्राचिन काळापासूनचे आहे.

**उत्तरे** :— ३) आधुनिक ऑलिम्पिक खेळ किंवा ऑलिंपिक हे उन्हाळी आणि हिवाळी क्रीडा स्पर्धांचे वैशिष्टय असलेले अग्रगण्य आंतराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आहेत. ज्यात जगभरातील हजारो खेळाडू विविध स्पर्धांमध्ये भाग घेतात. ऑलिम्पिक खेळ ही जगातील प्रमुख क्रीडा स्पर्धा मानली जाते. ज्यामध्ये २०० पेक्षा जास्त संघ सहभागी होतात, ज्यामध्ये सार्वभौम राज्ये आणि प्रदेशांचे प्रतिनिधित्व होते. उन्हाळी ऑलिम्पिक खेळ आणि हिवाळी ऑलिम्पिक खेळ प्रत्येक चार वर्षांनी आयोजित केले जातात.

**प्र. ५) १) मार्क्सवादी इतिहास लेखन म्हणजे काय ?**

**उत्तर :—** स्वातंत्रयोत्तर काळात भारतीय इतिहासलेखनात जे नवे वैचारिक प्रवाह आढळून येतात. त्यात 'मार्क्सवादी इतिहासलेखन' हा एक प्रमुख प्रवाह आहे.

१) मार्क्सवादात वर्गसंघर्षावर भर दिलेला आहे. मार्क्सच्या विचारांवर आधारित जे इतिहासलेखन केले गेले त्याला 'मार्क्सवादी इतिहासलेखन ' असे म्हणतात.

२) मार्क्सवादी इतिहासलेखन आर्थिक व्यवस्थेतील उत्पादणाची साधने, पदधती आणि उत्पादणाच्या प्रक्रियेतील मानवी संबंध यांचा प्रामुख्याने विचार केलेला आहे.

३) प्रत्येक सामाजिक घटनेचा सर्वसामान्य लोकांवर काय परिणाम होतो, याचे विश्लेषण करणे, हे मार्क्सवादी इतिहासलेखनाचे मुख्य सूत्र आहे.

४) मार्क्सवादी इतिहासकारांनी जातिव्यवस्थेत होत गेलेल्या बदलांचा अभ्यास केला. भारतातही या पदधतीचा अवलंब कोसंबी, डांगे शरद पाटील इत्यादींनी आपल्या इतिहासलेखनात प्रभावीपणे केलेला दिसून येतो.

**२) नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या प्रकल्पांतून कोणत्या गोष्टी साध्य होतात ?**

**उत्तर :–** नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या प्रकल्पांतून पुढील गोष्टी साध्य होतात –

१) प्रकल्पांतर्गत वारसास्थळाच्या मूळ स्वरूपात बदल न करता जतनाची व संवर्धनाची कामे करणे शक्य होते.

२) स्थानिक समाजाची घडण आणि मानसिकता कशी आहे, त्यांच्यापुढे वर्तमानात कोणती आव्हाने आहेत. तसेच स्थानिक लोकांच्या अपेक्षा काय आहेत. यांचा आढावा घेता येतो.

३) सांस्कृतिक वारसास्थळांचे जतन आणि संवर्धन करीत असताना स्थानिक लोकांच्या भावना दुखावल्या जाउ नयेत. यासाठी उपाययोजनांचे नियोजन करून स्थानिक लोकांना त्यात सहभागी करून घेता येते.

४) स्थानिक लोकांच्या परंपरागत कौशल्यांना प्रोत्साहन देउ शकतील, अशा उदयोग–व्यवसायांना चालना मिळावी, यासाठी योग्य नियोजन करणे शक्य होते.

**३) वाढत्या पर्यटनाचे होणारे फायदे स्पष्ट करा ?**

**उत्तर :–** पर्यटनाचे वैयक्तिक आणि देशालाही पुढील फायदे होतात –

१) पर्यटनामुळे स्थानिक रोजगार वाढतात. नव्या बाजारपेठा निर्माण होउन पर्यटनस्थळांचा विकास होतो.

२) हस्तोदयोग, कुटीरदयोग वाढीस लागून लोकांचे राहणीमान सुधारते. नव्या वसाहती निर्माण होतात. व खेडयांचे पुनरूज्जीवन होते.

३) विविध स्थळे, निसर्ग, संस्था यांना भेटी देउन माहिती मिळते, ज्ञान मिळते, माणसे बहुश्रुत होतात.

४) विविध प्रकारचे लोक भिन्न भाषिक व भिन्न संस्कृतींचे लोक एकत्र येतात. त्यातून सामाजिक आणि आंतराष्ट्रीय सामंजस्य वाढीस लागते. जागतिक पर्यटन वाढून देशाला परकीय चलन मिळते.

५) ऐतिहासिक स्थळे पाहून आपल्या वैभवशाली इतिहासाचे दर्शन होते. चांगल्या भविष्याची प्रेरणा मिळते. पूर्वजनांचा हा सांस्कृतिक वारसा व ठेवा आपण जपला पाहिजे याची जाणीव होते.

६) पर्यटनातून वैयक्तिक आणि सांघिक स्वरूपाचा आनंद, ज्ञान व अनुभव मिळतो.

**४) कलाक्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत, हे स्पष्ट करा.**

**उत्तर :–** विविध कलाक्षेत्रात व्यवसायाच्या पुढील संधी उपलब्ध असतात –

१) कलेच्या अभ्यासकांना संग्रहालये, अभिलेखागारे, ग्रंथालये, पुरातत्वीय संशोधन, पत्रकारीता आणि भारतीय विदया या ठिकाणी व्यवसाय मिळू शकतात.

२) औदयोगिक आणि जाहिरात क्षेत्रात तसेच कलावस्तूंच्या खरेदी–विक्री व्यवसायात कलांच्या जाणकारांची आवश्यकता असते.

३) चित्रपट आणि नाटक निर्मितीसाठी नेपथ्य, कलाकार, दिग्दर्शक, छायाचित्रकार, प्रकाशयोजना इत्यादी कलाकारांची आवश्यकता असते.

४) मुद्रणक्षेत्रात तसेच घरसजावटीच्या साहित्यनिर्मितीत कलाक्षेत्रातील जाणकारांची गरज असते.

**५)** दागदागिने, धांतूच्या वा लाकडी शोभेच्या वस्तू बनवणे या क्षेत्रांत अनेक क्षेत्रांतही व्यवसायिक संधी आहेत.

**६)** बांबू, काच, कापड, माती वा दगडी कलापूर्ण वस्तू, शिल्पे बनवणे या क्षेत्रांतही व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध असतात.

**प्र. ६ विधाने पुर्ण करा.** **2**

**१)** लोकशाहीचा गाभा म्हणजे सत्तेचे **विकेंद्रिकरण** होय.

**२)** शेतकरी चळवळींची **शेतमालाला योग्य भाव मिळावा** ही प्रमुख मागणी आहे.

**प्र. ७) चुक की बरोबर :– सकारण स्पष्ट करा.** **4**

**१) संविधानाचे स्वरूप एखादया जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.**

**उत्तर :–** हे विधान बरोबर आहे कारण :–

१) संविधान हे लिखित स्वरूपात असले तरी ते ग्रंथात बंद झालेले नसून ते प्रवाही असते.

२) संविधानात बदलत्या परिस्थितीनुसार बदल करण्याचा अधिकार संसदेला असतो.

३) संविधानाच्या मूलभूत चौकटीला धक्का न लावता जनतेच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी संसद असे बदल करू शकते संविधानाच्या या प्रवाही गुणधर्मामुळेच त्याचे स्वरूप एखादया जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

**२) लोकशाही टिकवण्यासाठी लक्ष राहावे लागते.**

**उत्तर :–** हे विधान बरोबर आहे कारण :–

१) लोकशाही व्यवस्था केवळ शासकीय पातळीवर असून चालत नाही, तर ती लोकापर्यंत पोहोचली पाहिजे.

२) लोकशाहीतील लोकांचे हक्क, स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी सतत जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

३) भ्रष्टाचार, हिंसा गुन्हेगारीकरण यांसारख्या लोकशाहीला आव्हान देणा–या समस्या वेळीच नष्ट कराव्या लागतात. त्यासाठी लोकांना आणि शासनालाही सतत दक्ष राहावे लागते.

**३) शिरोमणी अकाली दल, हा राष्ट्रीय पक्ष आहे.**

**उत्तर :–** हे विधान चूक आहे. कारण :– १) भारतीय निवडणूक आयोग हा राजकीय पक्षांच्या मान्यतेचे निकष निश्चित करून, राष्ट्रीय वा प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देत असतो.

२) संसद आणि विधिमंडळात मिळविलेल्या जागा आणि निवडणुकीत मिळालेल्या मतांची टक्केवारी यांचा या अटीत समावेश असतो.

३) शिरोमणी अकाली दल हा राष्ट्रीय पक्ष म्हणून निश्चित केलेल्या अटीत बसत नाही. तो पंजाब राज्यापुरता मर्यादित व प्रभावी असल्याने या पक्षाला राष्ट्रीय नव्हे. तर प्रादेशिक पक्ष म्हणून आयोगाने मान्यता दिलेली आहे.

**प्र. ८) अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा .**

**१) निवडणूक आयोग**

**उत्तर :–** १) लोकशाहीच्या यशस्वितेसाठी ठराविक कालावधीत निवडणुकांची गरज असते. या निवडणुका खुल्या वातावरणात घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असली पाहीजे.

२) या विचाराने संविधानाने कलम ३२४ अन्वये भारतीय निवडणूक आयोगाची निर्मिती केली. या यंत्रणेत एक मुख्य कारण आयुक्त

व अन्य दोन निवडणूक आयुक्त असून त्यांची राष्ट्रपतींकडून नेमणूक होते.

३) निवडणूक आयोगाकडे स्वत:चा स्वतंत्र कर्मचारीवर्ग नसतो. शासकीय अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांच्या मदतीने निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते. आयोगाच्या खर्चासाठी स्वतंत्र ऑर्थिक तरतूद केलेली असते. निवडणूक आयोगाला स्वायत्तता असते.

**२) आदिवासी चळवळ**

**उत्तर :–** १) आदिवासी हा प्रारंभापासूनच जंगलसंपत्तीवर उदरनिर्वाह करणारा समाज आहे.

२) ब्रिटिशांनी आदिवासींच्या जंगलसंपत्तीच्या अधिकारावरच गदा आणल्याने कोलाम, गोंड, संथाळ, मुंडा यांसारख्या आदिवासींनी ब्रिटिशांविरूदध ठिकठिकाणी उठाव केले होते.

३) स्वतंत्र भारतातही आदिवासींचे उदरभरणाचे प्रश्न सुटलेले नाहीत.

४) वनजमिनींवरील त्यांचे हक्क, वनांतील उत्पादने गोळा करण्याचे व वनजमिनींवर लागवड करण्याचे त्यांचे हक्क मान्य केले जात नाहीत. या मागण्यांसाठी अनेक ठिकाणी आदिवासींची आंदोलने अदयापही चालू आहेत.

**३) भ्रष्टाचार**

**उत्तर :–** १) कायदयाला भंग करून,वाजवीपेक्षा अधिक पैसे घेणे, दुस—यांना नाडणे याला **'भ्रष्टाचार'** असे म्हणतात.

२) भ्रष्ट्राचार केवळ ऑर्थिक स्वरूपातच असतो, असे नाही, तर सामाजिक, राजकीय, धार्मिक, सरकारी पातळीवर असा सर्वत्र होत असतो.


३) अधिकारांचा गैरवापर हाही भ्रष्टाचारच असतो. निवडणुकीतील गैरप्रकार, लाच देणे वा स्विकारणे, मालाची साठवणूक करून अधिक किमतीला विकणे हे सर्व प्रकार भ्रष्टाचाराचेच.

४) भारतात सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांत भ्रष्टाचार ही मोठी समस्या बनलेली आहे. वाढत्या भ्रष्टाचारामुळेच लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडू शकतो.

अ)

**भारतात झालेल्या प्रमुख चळवळी**

**उत्तर :–**




**प्र. ८ ब) समाजात लोकशाही रूजवण्यासाठीचे मार्ग :–**

उत्तर :–

सर्व समाज व घटकांचे सामालीककरण

मानवी मूल्यांचे जतन

**समाजात लोकशाही रूजवण्यासाठीचे मार्ग**

नागरीकांचे सक्षमीकरण

सामाजिक संस्थांना स्वायत्तता

**प्र. ९) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **2**

**१) वाढत्या भ्रष्टाचाराचे कोणते परिणाम होतात ?**

**उत्तर :–** भ्रष्टाचार वाढत गेल्यास, त्याचे पुढील परिणाम होतात –

१) राजकीय आणि प्रशासकीय स्तरांवर भ्रष्टाचार वाढून सरकारची कार्यक्षमता कमी होते. २) सरकारी कामे पूर्ण होण्यास बराच विलंब होतो.

३) सार्वजनिक सोई व सुविधा यांची गुणवत्ता घसरते.

४) वाढत्या घोटाळयांमुळे लोकशाही व्यवस्थेबददल लोकांत अविश्वासाची आणि असमाधानाची भावना निर्माण होते.

५) लोकांचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडून देशात अराजक माजू शकते.

**२) निवडणूक आचारसंहिता म्हणजे काय हे स्पष्ट करा ?**

**उत्तर :– १)** निवडनुका जाहीर झाल्यापासुन निर्णय घोषित होईपर्यंत सरकार, राजकीय पक्ष, उमेदवार व मतदार यांनी कोणत्यार नियमांचे पालन करावे व कोणते वर्तन करू नये. यासंबंधीची जी नियमावली निवडणूक आयोगाकडून जाहीर केले जाते, त्या आचारनियमावलीस 'निवडणूक आचारसंहिता' असे म्हणतात.

२) निवडणुकीच्या काळात गैरप्रकार होउ नयेत, म्हणून आचारसंहिता घोषित केली जाते. आचारसंहितेच्या भंग करणा–यांवर होणा–या कारवाईमुळे सामान्य मतदार आश्वस्त होतो व निवडणुका खुल्या वातावरणात व निष्पक्ष पदधतीने घेता येतात.

All the best

सराव प्रश्नपत्रिका – 05

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण : 40

---

**सूचना :**

(1) सर्व प्रश्न / कृती सोडविणे आवश्यक आहे.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे / कृतीचे गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न / कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न / कृती राज्यशास्त्र या विषयावरील आहे.

(4) प्रश्न क्रमांक 2 (अ) आणि 8 (ब) मधील संकल्पनचित्रे / कृती त्याचा नमूना अराखड्यात पेनाने / पेन्सिलीने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(5) प्रश्न 1 ला (अ) , (ब) व प्रश्न 6 वा या प्रश्नाची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर ही गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

**प्र १ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.** **3**

1) महाराष्ट्राचे आद्य कीर्तनकार------- यांना मानतात.

अ) संत ज्ञानेश्वर ब) संत तुकाराम क)संत नामदेव ड) संत एकनाथ

2) छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील-------- हा महत्त्वाचा कोश मानला जातो.

अ) भारतीय व्यवहार कोश ब) राज व्यवहार कोश क) व्यावहारिक कोश ड) भारतीय प्राचीन चरित्रकोश.

3) विसाव्या शतकाच्या सुरुवातीस फ्रान्समध्ये--------- नावाने ओळखली जाणारी इतिहास लेखनाची प्रणाली उदयास आली.

अ) सर्वेक्षण ब) ॲनल्स क) अनुवाद ड) नॅशनॅलिझम.

**ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा.** **3**

१ अ) प्रभाकर आचार्य------- प्र. के. अत्रे.

ब) दर्पण--------- बाळशास्त्री जांभेकर.

क) दीनबंधू-------- कृष्णराव भालेकर

ड) केसरी--------- बाळ गंगाधर टिळक.

२ अ) हू वेअर द शूद्राज -----------वंचितांचा इतिहास

ब) स्त्री पुरुष तुलना-------- स्त्रीवादी लेखन.

क) द इंडियन वॉर फॉर इंडिपेंडेंस-------- मार्क्सवादी इतिहास

ड) जेम्स ग्रँड डफ-------- वसाहतवादी इतिहास.

३) अ) लाल किल्ला--------- उदयपूर

ब) जंतर मंतर-------- जयपूर

क) बृहदिश्वर मंदिर------- तंजावार

ड ) कॅपिटल कॉम्प्लेक्स------- चंदिगड.

**प्र. २ अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.( कोणतेही दोन)** **4**

पुढील तक्ता पूर्ण करा.

| **इतिहासकार** | **ग्रंथाचे नाव** |
|---|---|
| जेम्स मिल | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
| जेम्स ग्रँड डफ. | ............. |
| ........... | द हिस्टरी ऑफ इंडिया |
| श्री अ डांगे | ........... |
| ............. | हू वेअर द शुद्राज |

२) कोश व त्यांचे स्थापना वर्ष काल रेषेवर दाखवा.

| इ.स.......... | इ.स १९३२ | इ.स........... | इ.स१९४६ |
|---|---|---|---|
| भारत वर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश | ............... | प्राचीन ऐतिहासिक कोश | .................. |

३) तक्ता पूर्ण करा.

| **ठिकाण** | **कशासाठी प्रसिद्ध** |
|---|---|
| १.लोणार. | ....... |
| २ ...... | धरण |
| ३......... | लेणी |
| ४.जंतर मंतर. | ......... |

**ब) टिपा लिहा.( कोणत्याही दोन)** **4**

१) मराठी रंगभूमी २)खेळ व चित्रपट ३) प्रसार माध्यमांची आवश्यकता.

**प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.( कोणतेही दोन)** **6**

१) वॉल्टेयर यांना आधुनिक इतिहास लेखनाचे जनक असे म्हटले जाते.

२) कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

३) प्रादेशिक इतिहास लेखनाला चालना मिळाली.

४) अभिलेखागारातील कागदपत्रे ऐतिहासिकदृष्ट्या विश्वासार्ह मानली जातात.

**प्र.४) दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.** **4**

भारताच्या प्राचीन ते अर्वाचीन इतिहासाच्या संदर्भात दूरदर्शन वरून प्रसारित झालेली भारत एक खोज ही मालिका महत्त्वाची आहे. पंडित नेहरू यांच्या डिस्कव्हरी ऑफ इंडिया या ग्रंथावर आधारित ही मालिका होती. श्याम बेनेगल दिग्दर्शित या मालिकेने प्राचीन काळ ते अर्वाचीन काळाचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय इतिहास मांडला. सखोल संशोधन आणि सादरीकरण या पातळीवर ही मालिका सरस ठरली.

हडप्पा संस्कृती, वैदिक काळ, रामायण -महाभारताचा अन्वयार्थ, मौर्य कालखंड, तुर्क अफगाण आणि मुघलांचे आक्रमण, मुघल कालखंड आणि मुघल बादशहांचे योगदान, भक्ती चळवळ, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, समाज सुधारणा चळवळी आणि स्वातंत्र्यसंग्राम अशा अनेक घटना या मालिकेतून मांडल्या गेल्या. या मालिकेत नाट्य, लोककला, प्रबोधनपर माहिती असा आधार घेत नेहरूंच्या रूपातील कलावंत रोशन सेठ प्रास्ताविक व अन्वयार्थ सांगत असत. नेहरूंचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि त्याचे प्रभावी सादरीकरण यामुळे ही मालिका संपूर्ण भारतभर वाखाणली गेली.

१) भारत एक खोज ही मालिका कोणत्या ग्रंथावर आधारित आहे?

२) भारत एक खोज या मालिकेचे दिग्दर्शन कोणी केले?

३) भारत एक खोज ही मालिका लोकप्रिय ठरण्यास कोणते घटक कारणीभूत असावेत असे तुम्हास वाटते?

**प्र.५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.( कोणतेही दोन)** **8**

१) खेळांचे महत्त्व स्पष्ट करा.

२) पर्यटन हा सर्वाधिक रोजगार निर्माण करणारा व्यवसाय होऊ शकतो याविषयी तुमचे मत व्यक्त करा.

३) उपयोजित इतिहासाचा वर्तमान काळाशी कसा सहसंबंध असतो?

४) पोवाडा म्हणजे काय, हे स्पष्ट करा.

**प्र.६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** **2**

१) लोकशाहीचा गाभा म्हणजे---------------- होय.

अ) प्रौढ मताधिकार

ब) सत्तेचे विकेंद्रीकरण

क) राखीव जागांचे धोरण

ड) न्यायालयीन निर्णय

२) शेतकरी चळवळीची--------- ही प्रमुख मागणी आहे.

अ) वन जमिनीवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा.

ब) शेतमालाला योग्य भाव मिळावा.

क) ग्राहकांचे संरक्षण करावे.

ड) धरणे बांधावीत.

**प्र.७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (फक्त २ )** **4**

१) लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष रहावे लागते.

२) देशात काही वेळा प्रादेशिक तेची भावना बळावते.


३) भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.

**प्र.८ अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा.( कोणतेही एक)** **2**


१) निवडणुक आयोग २) आदिवासी चळवळ.

**ब ) दिलेल्या सूचनानुसार कृती करा.( कोणतेही एक)** **2**

१) संकल्पना चित्र तयार पूर्ण करा.




२) महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्ष



**प्र.९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.( कोणतेही एक)** **2**

१) निवडणूक आचारसंहिता म्हणजे काय? हे स्पष्ट करा.

२) वाढत्या भ्रष्टाचाराचे कोणते परिणाम होतात ?

सराव उत्तरपत्रिका – 05

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण 40

---

**प्र.१ अ)** १)संत नामदेव

२) राज व्यवहार कोश

३)ॲनल्स

**ब )** १) अ) प्रभाकर---आचार्य प्र. के. अत्रे.

२) क) द इंडियन वॉर ऑफ इंडिपेंडेंस----- मार्क्सवादी इतिहास.

३)अ) लाल किल्ला ------उदयपूर.

**प्र २अ)**

१) जेम्स मिल--- द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया.

जेम्स ग्रँड डफ-------- द हिस्टरी ऑफ इंडिपेंडेंस इंडिया.

कर्नल टॉड-------- द हिस्टरी ऑफ इंडिया.

श्री.अ. डांगे------ द हिस्टरी ऑफ मराठा.

डॉ .बाबासाहेब आंबेडकर------हू वेअर द शुद्राज.

२) इस 1876 ----भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश.

इ.स. 1932 ---- भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश.

इ.स. 1937 ------भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश.

इ. स 1946------ भारतवर्षीय अर्वाचीन चरित्रकोश.

३) १) लोणार-------सरोवर

२) जायकवाडी------ धरण

३) अजिंठा--------- लेणी

४) जंतर-मंतर----वारसा स्थळ.

**ब) टिपा लिहा.**

1) **मराठी रंगभूमी** : 1) व्यक्तीने किंवा समुदायाने ललित कला सादर करण्याचे स्थान म्हणजे रंगभूमी होय. 2)19 व्या शतकाच्या मध्यात मराठी रंगभूमीचा उदय झाला. विष्णुदास भावे हे मराठी रंगभूमीचे जनक होत.3) सुरुवातीच्या काळात ऐतिहासिक, पौराणिक नाटकांबरोबरच प्रहसने रंगभूमीवर आली. या नाटकांना लिखित संहिता नसे. थोरले माधवराव पेशवे या नाटकामुळे संपूर्ण लिखित संहिता असलेली नाट्य परंपरा सुरू झाली. 4) 19 व्या शतकाच्या अखेरीस संगीत नाटकाची परंपरा सुरू झाली. सामाजिक प्रश्न आणि ऐतिहासिक विषय नाटकात हाताळले गेले. 5) मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात आचार्य अत्रे यांच्या नाटकांनी रंगभूमीला सावरले. 6) वि वा शिरवाडकर, विजय तेंडुलकर, वसंत कानेटकर अशा लेखकांनी मराठी रंगभूमीला समृद्ध केले.

२) **खेळ व चित्रपट : 1)** पूर्वीच्या चित्रपटांमधून नायक नायिका खेळ खेळत असल्याची किंवा खेळांची दृश्ये दाखवली जात असत. 2) अलीकडच्या काळात खेळ आणि खेळाडूंचा जीवनपट दाखवणारे हिंदी इंग्रजी चित्रपट निघाले आहेत. लगान, दंगल असे क्रिकेट कुस्ती खेळांशी

संबंधित चित्रपट निघाले आहेत.3) मेरीकोम, फोगट भगिनी या खेळाडूंच्या जीवनावर चित्रपट निघाले आहेत.4) प्रसिद्ध धावपटू मिल्खा सिंग, भारतरत्न सचिन तेंडुलकर आणि क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनी यांच्या कारकिर्दीवरही चित्रपट निघाले. एकूण खेळ व चित्रपट यांचा संबंध मुकपटापासून आज पर्यंत घनिष्ठ राहिलेला आहे.

३) **प्रसार माध्यमांची आवश्यकता** : प्रसार माध्यमांमुळे जग अधिक जवळ आले आहे कारण त्यामुळे माहिती क्षणार्धात जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचते. माहितीचा मुक्त प्रवाह समाजात पोहोचवण्यासाठी प्रसार माध्यमांची गरज असते. प्रसार माध्यमांमुळे लोकांना घटना प्रत्यक्ष पाहायला मिळतात. माहितीची देवाण-घेवाण होते. अद्ययावत ज्ञानाचा प्रसार होतो. प्रसार माध्यमांमुळे मनोरंजन होते तसेच शैक्षणिक, व्यावसायिक प्रगतीसाठी आवश्यक असलेली माहिती ग्रामीण व दुर्गम भागापर्यंत पोहोचवली जाते. प्रसार माध्यमांमुळे लोकशाही अधिक सुदृढ होण्यास मदत होते म्हणून प्रसार माध्यमे फार महत्त्वपूर्ण आहेत.

**प्र.३**

१) वॉल्टेअरच्या मते इतिहास लेखनासाठी वस्तुनिष्ठ सत्य आणि घटनांचा कालक्रम योग्य असायला हवा. तत्कालीन समाजाच्या परंपरा, शेती, व्यापार, आर्थिक व्यवस्था यांचा विचार होणे आवश्यक आहे. या त्याच्या मतामुळे इतिहासाची मांडणी करताना मानवी जीवनाचा सर्वांगीण विचार व्हायला हवा हा नवीन विचार पुढे आला म्हणून याला आधुनिक इतिहास लेखनाचे जनक असे म्हटले जाते.

२) कला वस्तूंच्या खरेदी विक्रीचे एक स्वतंत्र क्षेत्र असते. कला वस्तू नकली आहेत की खऱ्या आहेत त्यातील धातू ,लाकडाचा प्रकार, त्यांचा दर्जा योग्य आहे का हे त्यातील जाणकारच सांगू शकतो. कला वस्तूतील कलेचा दर्जा कसा आहे हे कलाकारच ओळखू शकतात. एकूण कला वस्तूंचे मूल्य ठरवताना वरील सर्व गोष्टींची पारख होणे आवश्यक असते. त्यासाठी कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

३) इंग्रजी शिक्षणाने भारतीयांत निर्माण झालेल्या आत्मजाणिवेने राष्ट्रवादी इतिहास लेखनास प्रवृत्त केले. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या भारताच्या पूर्वग्रह दूषित इतिहासाला भारताच्या विविध प्रांतातील इतिहास लेखकांनी विरोध केला. आपल्या प्रादेशिक वैशिष्ट्यांकडे इतिहासकारांचे लक्ष वेधले गेले. राष्ट्रवादी इतिहास लेखनाचा प्रभाव होताच त्यातूनच प्रादेशिक इतिहास लेखनाला चालना मिळाली.

४) ऐतिहासिक दस्तऐवज ज्या ठिकाणी जतन करून ठेवलेले असतात त्या ठिकाणास अभिलेखागार असे म्हणतात. अभिलेखागारांमध्ये महत्त्वाची जुनी कागदपत्रे, दप्तरे, जुने चित्रपट, जागतिक करारांचे ऐवज इत्यादी जतन करून ठेवले जाते. अभिलेखा गारांमुळे मूळ कागदपत्रांचे संदर्भ मिळतात. तत्कालीन ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करता येतो. तत्कालीन भाषा, लिपी यांचा शोध घेता येतो. काल गणना करता येते. ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांना हस्तांतरित करता येतो.

**प्र.४**

१) डिस्कव्हरी ऑफ इंडिया.
२) श्याम बेनेगल
३) या मालिकेत प्राचीन काळ ते अर्वाचीन काळ या दरम्यानचा सामाजिक सांस्कृतिक व राजकीय इतिहास मांडला गेला आहे. भारताच्या कानाकोपऱ्यातील समाजजीवन, संस्कृती, कला, साहित्य यावर प्रकाश टाकला गेल्याने लेख लोकांना ते पाहताना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळाला. सखोल संशोधन आणि प्रभावी सादरीकरणामुळे ही मालिका लोकप्रिय ठरली. पंडित नेहरूंचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन या मालिकेतील नाट्य, लोककला आणि प्रबोधन पर माहिती यांचाही लोकांवर खूप प्रभाव पडला.

**प्र.५**

१)1. खेळांमुळे जीवनातील व्यथा व चिंता विसरल्या जातात.2. माणसाच्या मनाला विरंगुळा मिळतो त्यामुळे मन ताजेतवाने व उल्हसीत होते. 3.खेळामुळे व्यायाम होऊन शरीर काटक व बळकट होते. खेळामुळे मनोधैर्य, चिकाटी, खिलाडूपणा हे गुण अंगी बाणतात.4. सांघिक खेळातून सहकार्य, संघभावना व नेतृत्व गुण वाढीस लागतात.

२) पर्यटन व्यवसायामुळे स्थानिक पातळीवर पुढील प्रमाणे रोजगार निर्मिती होते-
१) पर्यटन स्थळांच्या परिसरात बाजारपेठांचा विस्तार होऊन वस्तूंच्या खरेदी विक्रीत वाढ होते.
२) पर्यटकांना आवडणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीत वाढ होते त्यामुळे स्थानिक हस्तोद्योग व कुटीरोद्योग यांचा विकास होतो.
३) स्थानिक खाद्यपदार्थ,हस्त्कौशल्याच्या वस्तू इ.गोष्टी पर्यटन आवडीने खरेदी करतात.
४) हॉटेल व्यवसाय व निवासी व्यवस्था या व्यवसायांचा विकास होतो.
५) प्रवाशांच्या वाहतुकीसाठी बस, रिक्षा, टॅक्सी अशा वाहतूक क्षेत्रातील व्यवसाय वाढतात. प्रवासी एजंट, पर्यटन मार्गदर्शक( गाईड )असे नवे रोजगार निर्माण होतात.

३) १)भूतकाळातील घटनांच्या आधारावरच मानव वर्तमानकालीन वाटचाल निश्चित करतो.
२) आपल्या पूर्वजांचे कर्तृत्व, त्यांचा वारसा याबद्दल त्यांच्या मनात कुतूहल आणि आत्महत्या असते या वर्षाचा इतिहास पूर्वजांनी निर्मिलेल्या कलाकृती, परंपरा यांचे ज्ञान उपयोजित इतिहासाच्या अभ्यासाने वर्तमान मानवाला मिळते. उपयोजित इतिहासाच्या आधारे या मूर्त आणि अमूर्त वर्षाचे जतन करता येते.
३) उपयोजित इतिहासाद्वारे वर्तमानातील सामाजिक आव्हानांवर उपाययोजना करणे शक्य होते. वर्तमानातील समस्यांची सोडवणूक करता येते.
४) भूतकालीन अनुभवावरून वर्तमानात सामाजिक उपयुक्ततेचे निर्णय घेणे शक्य होते.
५) उपयोजित इतिहासाच्या अभ्यासाच्या आधारे वर्तमान काळाचे यथायोग्य आकलन आणि भविष्य काळासाठी दिशादर्शन होते.

४) पोवाडा- हा एक गद्यपद्यमिश्रित सादरीकरणाचा प्रकारआहे. पोवाड्यामध्ये शूर स्त्री – पुरुषांच्या पराक्रमाचे आवेशयुक्त व स्पुर्तिदायक भाषेत कथन केले जाते.छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अज्ञानदास या कवीने अफझलखान वाधाविषयी रचलेला आणि तुळशीदासाने रचलेला सिंहगडच्या लढाईचा पोवाडा प्रसिद्ध आहे.

ब्रिटीशांच्या काळात उमाजी नाईक ,चाफेकर बंधू ,महात्मा गांधी यांच्यावर पोवाडे रचले गेले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात अमर शेख , अण्णाभाऊ साठे आणि गवाणकर या शाहिरांनी रचलेल्या पोवाड्यांनी महाराष्ट्र गाजवला आणि पोवाडयांच्या माध्यमातून जागृती करण्यात आली.

राज्यशास्त्र

**प्र.६**

१) सत्तेचे विकेंद्रीकरण
२) शेतमालाला योग्य भाव मिळावा.

**प्र.७**

१) हे विधान बरोबर आहे; कारण-
१) लोकशाही व्यवस्था केवळ शासकीय पातळीवर असून चालत नाही तर ती लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे.
२) लोकशाहीतील लोकांचे हक्क स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी सतत जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.
३) भ्रष्टाचार, हिंसा, गुन्हेगारीकरण यासारख्या लोकशाहीला आव्हान देणाऱ्या समस्या वेळीच नष्ट कराव्या लागतात त्यासाठी लोकांना आणि शासनालाही सतत दक्ष रहावे लागते.

२) हे विधान बरोबर आहे; कारण-
१) विविधतेने नटलेल्या आपल्या भारतात भाषेविषयी, प्रदेशाविषयी, संस्कृतीविषयी आत्मीयतेची भावना निर्माण होते.
२) आत्मीयतेचे अभिमानात रूपांतर होऊन विविध संघटना अस्तित्वात येतात व त्यातून चळवळी उभ्या राहतात.
३) आपल्या प्रदेशाचा विकास, साधनसामग्री व रोजगाराच्या संधींवर आपला हक्क अशा प्रादेशिक अस्मिता प्रबळ होऊन देशात प्रादेशिकतेची भावना बळावते.

३) हे विधान बरोबर आहे; कारण-

१) भारतीय संविधानाने स्वातंत्र्यपूर्व काळातील मतदानाच्या अधिकारासाठी असणारी सर्व बंधने रद्द केल्यामुळे मतदारांची संख्या वाढली आहे.

२) संविधानाने स्वीकारलेल्या प्रौढ मताधिकाराच्या तरतुदीमुळे सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे.

३) सुरुवातीस मताधिकारासाठी असणारी 21 वर्षांची अट18 वर्षे पूर्ण अशी केल्यामुळे मताधिकार अधिक व्यापक झाला. मतदारांची एवढी संख्या जगातील कोणत्याच लोकशाही देशात नाही म्हणून भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.

**प्र.८अ)**

**१) निवडणूक आयोग**

१)लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी ठराविक कालावधीत निवडणुकांची गरज असते या निवडणुका खुल्या वातावरणात घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी

२)या विचाराने संविधानाने कलम 324 अन्वये भारतीय निवडणूक आयोगाची निर्मिती केली या यंत्रणेत एक मुख्य आयुक्त व अन्य दोन निवडणूक आयुक्त असून त्यांची राष्ट्रपतींकडून नेमणूक होते.

३) या तीनही आयुक्तांचा दर्जा व अधिकार समान असतात. निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्यापासून निवडणुकांचे निकाल जाहीर होण्यापर्यंत निवडणुकीची सर्व प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या यंत्रणेखाली असते.

४) निवडणूक आयोगाकडे स्वतःचा स्वतंत्र कर्मचारी वर्ग नसतो शासकीय अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांच्या मदतीने निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते .

५) आयोगाच्या खर्चासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद केलेली असते.

२) आदिवासी चळवळ आदिवासी हा प्रारंभा पासूनच जंगल संपत्तीवर उदरनिर्वाह करणारा समाज आहे.

२) ब्रिटिशांनी आदिवासींच्या जलसंपत्तीच्या अधिकारावरच गदा आणल्याने छोटा नागपूर परिसरातील कोलाम, ओडीसातील गोंड, महाराष्ट्रातील कोळी ,भिल्ल  यासारख्या आदिवासींनी ब्रिटिशांविरुद्ध ठिकठिकाणी उठाव केले होते.

३) स्वतंत्र भारतातही आदिवासींचे उदरभरणाचे प्रश्न सुटलेले नाहीत.

४) वन जमिनीवरील त्यांचे हक्क, वनातील उत्पादने गोळा करण्याचे व वन जमिनीवर लागवड करण्याचे त्यांचे हक्क मान्य केले जात नाहीत त्यामुळे अनेक ठिकाणी आदिवासींची आंदोलने अद्यापही चालू आहेत.

ब)

ग्राहक चळवळ

कामगार चळवळ

भारतात झालेल्या प्रमुख चळवळी

शेतकरी चळवळ

आदिवासी चळवळ

पर्यावरण चळवळ स्त्री चळवळ

२) महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्ष    शेतकरी कामगार पक्ष

शिवसेना
महाराष्ट्र नवनिर्माण सेना

भारतीय रिपब्लिकन पक्ष
समाजवादी पक्ष

**प्र.९** **2**

**१) निवडणूक आचारसंहिता**

१)निवडणुका जाहीर झाल्यापासून निर्णय घोषित होईपर्यंत सरकार राजकीय पक्ष उमेदवार व मतदार यांनी कोणत्या नियमांचे पालन करावे व कोणते वर्तन करू नये यासंबंधीची जी नियमावली निवडणूक आयोगाकडून जाहीर केले जाते त्या आचार नियमावलीस निवडणूक आचारसंहिता असे म्हणतात.

२) निवडणुकीच्या काळात गैरप्रकार होऊ नयेत म्हणून आचारसंहिता घोषित केली जाते.

**२)वाढत्या भ्रष्टाचाराचे परिणाम**

भ्रष्टाचार वाढत गेल्यास त्याचे पुढील परिणाम होतात-

१) राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर भ्रष्टाचार वाढवून सरकारची कार्यक्षमता कमी होते.

२) सरकारी कामे पूर्ण होण्यास बराच विलंब होतो.

३) सार्वजनिक सोयी व सुविधा यांची गुणवत्ता घसरते.

३) वाढत्या घोटाळ्यांमुळे लोकशाही व्यवस्थेबद्दल लोकात अविश्वासाची आणि अस समाधानाची भावना निर्माण होते.

४) लोकांचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडून देशात अराजकता माजू शकते.

All the best

सराव प्रश्नपत्रिका – 06

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण : 40

---

**सूचना :**

(1) सर्व प्रश्न / कृती सोडविणे आवश्यक आहे.

(2) उजवीकडील अंक प्रश्नांचे / कृतीचे गुण दर्शवितात.

(3) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न / कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न / कृती राज्यशास्त्र या विषयावरील आहे.

(4) प्रश्न क्रमांक 2 (अ) आणि 8 (ब) मधील संकल्पनचित्रे / कृती त्याचा नमूना अराखड्यात पेनाने / पेन्सिलीने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

(5) प्रश्न 1 ला (अ) , (ब) व प्रश्न 6 वा या प्रश्नाची उत्तरे उत्तरपत्रिकेत एकापेक्षा जास्त वेळा लिहिलेले असेल तर प्रथम लिहिलेले उत्तर ही गुणांसाठी गृहीत धरले जाईल.

**प्रश्न 1. ( अ ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :** 3

**1) आधुनिक इतिहास लेखनाचा जनक ........... यास म्हणता येईल.**

(अ) व्हॉल्टेअर

(ब) रेने देकार्त

(क) लिओपॉल्ड रांके

(ड) कार्ल मार्क्स

**2) भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक ........... हे होत.**

(अ) अलेक्झांडर कनिंगहॅम

(ब) विल्यम जोन्स

(क) जॉन मार्शल (ड) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

**3) मथुरा शिल्पशैली .......... काळात उदयाला आली.**

(अ) कुशाण

(ब) गुप्त

(क) राष्ट्रकूट

(ड) मौर्य

**( ब ) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा :** 3

1) (i) प्रभाकर - आचार्य प्र.के.अत्रे
 (ii) दर्पण - बाळशास्त्री जांभेकर
 (iii) दीनबंधु - कृष्णराव भालेकर


(iv) केसरी - बाळ गंगाधर टिळक

2) (i) जुम्मादादा आणि माणिकराव व्यायामशाळा – वडोदरा
(ii) स्वर्णिम गुजरात स्पोर्टस विद्यापीठ- गांधीनगर
(iii) खासबाग व मोतीबाग तालीम – कोल्हापूर
(iv) श्रीशिवछत्रपती क्रीडा संकुल – मुंबई


3) (i) महाराज सयाजीराव विद्यापीठ - दिल्ली
(ii) बनारस हिंदू विद्यापीठ - वाराणसी
(iii) अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी - अलिगढ
(iv) जिवाजी विद्यापीठ - ग्वालियर

**प्रश्न 2. (अ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतेही दोन ) :** 4

**(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**





**(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**(3) पुढील कालरेषा पूर्ण करा.**

भारतातील दूरदर्शनचा विकास




**(ब) थोडक्यात टिपा लिहा. (कोणत्याही दोन ) :** 4

(1) विश्वकोश
(2) मैदानी खेळ
(3) ॲनल्स प्रणाली

**प्रश्न 3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन ) :** 4

(1) बखर हा ऐतिहासिक साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे.

(2) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.

(3) सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.

(4) अभिलेखागारे व ग्रंथालये नियतकालिके आणि इतर प्रकाशने प्रसिद्ध करतात.

**प्रश्न 4 (दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून खालील प्रश्नाची उत्तरे लिहा: 4**

कीर्तनाच्या नारदीय अथवा हरिदासी आणि वारकरी या दोन मुख्य परंपरा आहेत. हरिदासी कीर्तन एकपात्री प्रयोगासारखे असते. या कीर्तनात 'पूर्वरंग' व 'उत्तररंग' असतात. नमन, निरूपणाचा अभंग व निरूपण याला पूर्वरंग आणि उदाहरणादाखल एखादे अख्यान सांगणेयाला उत्तररंग म्हणतात. वारकरी कीर्तनात सामूहिकतेवर भर असतो. कीर्तनकारांबरोबरटाळकऱ्यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात राष्ट्रीय कीर्तन नावाचा नवा प्रकार पुढे आला. ह कीर्तन नारदीय कीर्तनाप्रमाणेच सादर केले जाते. त्यामध्ये स्वातंत्र्य चळवळीतील नेते, शास्त्रज्ञ , समाजसुधारक अशा थोर लोकांच्या चरित्राच्याआधारे समाजप्रबोधन करण्यावर भर असतो. त्याची सुरुवात वाईचे दत्तोपंत पटवर्धन यांनीकेली. याशिवाय महात्मा जोतीराव फुले प्रणित सत्यशोधक समाजानेही कीर्तनाच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य केले. संत गाडगे महाराजांची कीर्तने सत्यशोधकी कीर्तनाशी नाते सांगणारी होती. जातिभेद निर्मूलन, स्वच्छता, व्यसनमुक्ती यांसारख्या विषयांवर ते त्यांच्या कीर्तनातून प्रबोधन करत असत.

1) कीर्तनाच्या मुख्य परंपरा कोणत्या ?

2) राष्ट्रीय कीर्तनातून समाजजागृती करण्याचा प्रयत्न कोणीकोणी केला ?

3) राष्ट्रीय कीर्तनातून समाजजागृतीचे कार्य कसे घडले ?

**प्रश्न 5. पुढील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन ) :** 6

1) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहास लेखनातील योगदान स्पष्ट करा.

2) इतिहासाच्या साधनांचे जतन व्हावे यासाठी किमान १० उपाय सुचवा.

3) कला क्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे स्पष्ट करा.

4) पर्यटनाशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे स्पष्ट करा.

**प्रश्न 6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : 2**

**1) नॅशनल कॉन्फरन्स हा पक्ष ...... येथे आहे.**

(अ) ओडिशा

(ब) आसाम

(क) बिहार

(ड) जम्मू आणि काश्मीर

**2) लोकशाहीचा गाभा म्हणजे ........**

(अ) प्रौढ मताधिकार

(ब) सत्तेचे विकेंद्रीकरण

(क) राखीव जागांचे धोरण

(ड) न्यायालयीन निर्णय

**प्रश्न 7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन ) : 4**

1) निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करते.

2) ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

3) लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते.


**प्रश्न 8. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतेही एक ) :** 2

1) आदिवासी चळवळ

2) प्रादेशिकता


**(ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (कोणतेही एक ) :** **2**

(1) **पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




(2) **पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

महिलांसंबंधी कायदे व प्रतिनिधित्वविषयक तरतुदी




**प्रश्न 9. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही एक ) :** 2

(1) मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले ?

(2) निवडणूक आचारसंहिता म्हणजे काय हे स्पष्ट करा.

All the best

सराव उत्तरपत्रिका – 06

इयत्ता : - दहावी

विषय : - इतिहास व राज्यशास्त्र (पेपर १ )

वेळ : 2 तास एकूण गुण 40

---

**प्रश्न 1. (अ )दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :** 3

**(1) आधुनिक इतिहास लेखनाचा जनक ........... यास म्हणता येईल.**

(अ) व्हॉल्टेअर

(ब) रेने देकार्त

(क) लिओपॉल्ड रांके

(ड) कार्ल मार्क्स

**(2) भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक ........... हे होत.**

(अ) अलेक्झांडर कनिंगहॅम

(ब) विल्यम जोन्स

(क) जॉन मार्शल

(ड) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

**(3) मथुरा शिल्पशैली .......... काळात उदयाला आली.**

(अ) कुशाण

(ब) गुप्त

(क) राष्ट्रकूट

(ड) मौर्य

**( ब )पुढी पैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा :** 3

**(1)** (i) प्रभाकर - आचार्य प्र.के.अत्रे
(ii) दर्पण - बाळशास्त्री जांभेकर
(iii) दीनबंधु - कृष्णराव भालेकर
(iv) केसरी - बाळ गंगाधर टिळक

**(2)** (i) जुम्मादादा आणि माणिकराव व्यायामशाळा – वडोदरा
(ii) स्वर्णिम गुजरात स्पोर्टस विद्यापीठ- गांधीनगर
(iii) खासबाग व मोतीबाग तालीम – कोल्हापूर
(iv) श्रीशिवछत्रपती क्रीडा संकुल – मुंबई

**(3)** (i) महाराज सयाजीराव विद्यापीठ - दिल्ली


(ii) बनारस हिंदू विद्यापीठ - वाराणसी

(iii) अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी - अलिगढ


(iv) जिवाजी विद्यापीठ - ग्वालियर

**प्रश्न 2. (अ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतेही दोन ) :** 4

1) **पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**





2) **पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**3) पुढील कालरेषा पूर्ण करा.**

भारतातील दूरदर्शनचा विकास




**(ब) थोडक्यात टिपा लिहा. (कोणत्याही दोन ) :** 4

१) विश्वकोश :

१ महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने मराठी विश्वकोश निर्मितीस चालना दिली.

२  तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखाली विश्वकोश निर्मिती सुरू झाली.

३ जगभरातील ज्ञान साररूपाने या कोशांमध्ये आणले आहे .

४ इतिहास विषयाशी निगडित असणाऱ्या महत्त्वाच्या नोंदी यात आहे.

२) **मैदानी खेळ**

मैदानी खेळांमध्ये देशी आणि  विदेशी खेळ असे प्रकार आहेत.

१  देशी खेळांमध्ये लंगडी, कबड्डी, आट्यापाट्या मुलामुलींमध्ये गोट्या-, लगोरी, विटीदांडू, भिंगऱ्या, भोवरे, फुगडी, झिम्मा, लंगडी असे खेळ लोकप्रिय आहेत खोखो इत्यादी- खेळांचा समावेश होत

२ विदेशी मैदानी खेळांत बॅडमिंटन, टेबल टेनिस तसेच हॉकी, क्रिकेट, फुटबॉल, गोल्फ, पोलो इत्यादी खेळांचा समावेश होतो. मैदानी खेळांमध्ये धावण्याच्या शर्यती जगभर लोकप्रिय आहेत यात 100 मीटर 200 मीटर, मॅरॅथॉन आणि अडथळ्यांच्या शर्यती यांचा समावेश होतो.

३) **ॲनल्स प्रणाली**

विसाव्या शतकाच्या : सुरुवातीस फ्रान्समध्ये ॲनल्स नावाने ओळखली जाणारी इतिहासलेखनाची प्रणाली उदयाला आली. ॲनल्स प्रणालीमुळे इतिहासलेखनाला एक वेगळीच दिशा मिळालीइतिहासाचा अभ्यास फक्त राजकीय . घडामोडी, राजे, महान नेते आणि त्या अनुषंगाने राजकारण, मुत्सद्देगिरी, युद्धे यांच्यावर केंद्रित न करता तत्कालीन हवामान, स्थानिक लोक, शेती, व्यापार, तंत्रज्ञान, दळणवळण, संपर्काची साधने, सामाजिक विभागणी आणि समूहाची मानसिकता यांसारख्या विषयांचा अभ्यास करणेही महत्त्वाचे मानले जाऊ लागलेॲनल्स प्रणाली सुरू करण्याचे . आणि तिचा विकास करण्याचे श्रेय फ्रेंच इतिहासकारांना दिले जाते.

**प्रश्न 3. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा : ( कोणतेही दोन)** 4

1) बखर हा ऐतिहासिक साहित्यातील महत्त्वाचा प्रकार आहे.

1) बखर ही ऐतिहासिक कागदपत्रे आहेत ज्यामध्ये इतिहासातील घटनांची आणि लोकांची माहिती आहे.

2) मराठा साहित्यात बखरांमध्ये राजे, सैनिक आणि लढायांच्या कथा आहेत.

3) मराठी भाषेतील प्रसिद्ध बखरांपैकी एक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजवटीत लिहिलेले ‘ ‘सभासद बखर’’.

4) चरित्रात्मक, वंशानुचरित्रात्मक, प्रसंगवर्णनात्मक, पंथीय, आत्मचरित्रपर, कैफियत,पौराणिक आणि राजनीतिपर अशा अनेक विभागांमध्ये बखरांची विभागणी करण्यात आली आहे.

२ ) वर्तमानपत्रांना इतिहास या विषयाची गरज पडते.

१. एखाद्या घटनेचा सखोल आढावा घेताना वृत्तपत्रांना त्या घटनेचा भूतकाळ अभ्यासावा लागतो.

२. वर्तमानपत्रातील काही सदरे ही फक्त इतिहासावर आधारित असतात. त्यातून भूतकाळातील आर्थिक, राजकीय व सामाजिक घडामोडी समजतात.

३. एखाद्या घटनेची किंवा व्यक्तीची शताब्दी अथवा ५०-७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल वृत्तपत्रे विशेष पुरवण्या काढतात. अशावेळी त्या घटनेचा किंवा व्यक्तीचा इतिहास अभ्यासणे आवश्यक असतो.

४. दिनविशेष सारख्या गोष्टींची माहिती इतिहासाद्वारेच मिळते. म्हणून वर्तमानपत्रांना इतिहासाचा अभ्यास आवश्यक असतो.

3) सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.

i) विसाव्या-एकविसाव्या शतकात खेळांचे आंतरराष्ट्रीयीकरण झाले आहे.

ii) प्रत्येक खेळाचे थेट प्रक्षेपण जगाच्या कानाकोपऱ्यात एकाच वेळी होत असते.

iii) हौशी खेळाडू शिकवण्यासाठी; प्रेक्षक मनोरंजनासाठी आणि निवृत्त खेळाडू समालोचनासाठी वाहिन्यांवर येतात.

iv) मोठा प्रेक्षक वर्ग सामने पाहतो; त्यामुळे कंपन्या मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करून आपल्या उत्पादनांच्या जाहिराती खेळाच्या प्रक्षेपणादरम्यान करीत असतात. या कारणांमुळे सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.

4) अभिलेखागारे व ग्रंथालये नियतकालिके आणि इतर प्रकाशने प्रसिद्ध करतात.

१) ग्रंथालये प्राचीन ग्रंथांचे ग्रंथांचे जतन करून ठेवते तसेच त्यांचे संवर्धनही करते, पण जे दस्तऐवज प्रदर्शित केले जात नाहीत त्यांचे जतन अभिलेखागारे करतात.

२) ऐतिहासिक माहिती जातं करणारे दस्तऐवज हाती देणे शक्य नसते.

3) या ऐतिहासिक घटना, इतिहासातील माहिती, शोध लोकांपर्यंत शास्त्रशुद्ध माहिती लोकांपर्यंत पोहचवावी

4) इतिहासाची सर्व साधने हा आपला ऐतिहासिकठेवा असून तो लोकांपर्यंतपोहोचण्याची गरज असते .म्हणून अभिलेखागारे व संग्रहालये नियतकालिके आणि अन्य प्रकाशने प्रसिद्ध करतात.

**प्रश्न 4) दिलेल्या उताऱ्याचे वाचन खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** 4

कीर्तनाच्या नारदीय अथवा हरिदासी आणि वारकरी या दोन मुख्य परंपरा आहेत. हरिदासी कीर्तन एकपात्री प्रयोगासारखे असते.या कीर्तनात 'पूर्वरंग' व 'उत्तररंग' असतात. नमन, निरूपणाचा अभंग व निरूपण याला पूर्वरंग आणि उदाहरणादाखल एखादे अख्यान सांगणे याला उत्तररंग म्हणतात. वारकरी कीर्तनात सामूहिकतेवर भर असतो.कीर्तनकारांबरोबर टाळकऱ्यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात राष्ट्रीय कीर्तन नावाचा नवा प्रकार पुढे आला. हे कीर्तन नारदीय कीर्तनाप्रमाणेच सादर केले जाते. त्यामध्ये स्वातंत्र्य चळवळीतील नेते, शास्त्रज्ञ , समाजसुधारक अशा थोर लोकांच्या चरित्राच्या आधारे समाजप्रबोधन करण्यावर भर असतो. त्याची सुरुवात वाईचे दत्तोपंत पटवर्धन यांनी केली. याशिवाय महात्मा जोतीराव फुले प्रणित सत्यशोधक समाजानेही कीर्तनाच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य केले. संत गाडगे महाराजांची कीर्तने सत्यशोधकी कीर्तनाशी नाते सांगणारी होती. जातिभेद निर्मूलन, स्वच्छता, व्यसनमुक्ती यांसारख्या विषयांवर ते त्यांच्या कीर्तनातून प्रबोधन करत असत.

(1) कीर्तनाच्या मुख्य परंपरा कोणत्या ?

कीर्तनाच्या नारदीय अथवा हरिदासी आणि वारकरी या दोन मुख्य परंपरा आहेत.

(2) राष्ट्रीय कीर्तनातून समाजजागृती करण्याचा प्रयत्न कोणीकोणी केला ?

दत्तोपंत पटवर्धन

(3) राष्ट्रीय कीर्तनातून समाजजागृतीचे कार्य कसे घडले ?

कीर्तन हे मनोरंजनचे एक माध्यम आहे .कीर्तनाच्या हरिदासी आणि वारकरी या दोन मुख्य परंपरा आहेत. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात राष्ट्रीय कीर्तन नावाचा नवा प्रकार पुढे आला. स्वातंत्र्य चळवळीतील नेते, शास्त्रज्ञ , समाजसुधारक अशा थोर लोकांच्या चरित्राच्या आधारे समाजप्रबोधन करण्यावर भर असतो. त्याची सुरुवात वाईचे दत्तोपंत पटवर्धन यांनी केली. याशिवाय महात्मा जोतीराव फुले प्रणित सत्यशोधक समाजानेही कीर्तनाच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य केले. संत गाडगे महाराजांची कीर्तने सत्यशोधकी कीर्तनाशी नाते सांगणारी होती.

**प्रश्न 5. पुढील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा. ( कोणतेही दोन )** 6

(1) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहास लेखनातील योगदान स्पष्ट करा.

भाषाशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र आणि इतिहासलेखन यांत मूलभूत संशोधन करणाऱ्या वि. का. राजवाडे यांचे इतिहासलेखनातील योगदान पुढीलप्रमाणे-

1. राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' असे शीर्षक असणारे २२ खंड संपादित केले.
2. इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन होय, हा विचार मांडला.
3. केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी केलेली कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकिकती म्हणजे इतिहास नव्हे, असे त्यांचे मत होते.
4. आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे, हा विचार त्यांनी भारतीय इतिहासकारांना दिला.
5. अस्सल कागदपत्रांच्याच आधारे इतिहास लिहिला गेला पाहिजे, याबाबत ते आग्रही होते.
6. स्थळ, काळ व व्यक्ती या त्रयींनी बद्ध झालेल्या मानवी प्रसंगांचे वर्णन इतिहासलेखनात असायला हवे असे त्यांचे मत होते.इतिहासाचार्य राजवाडे यांनी केलेले ऐतिहासिक लेखन व मांडलेली मते हे इतिहासलेखनाला दिलेले मोठे योगदान आहे

**(2) इतिहासाच्या साधनांचे जतन व्हावे यासाठी किमान १० उपाय सुचवा.**

इतिहासाच्या साधनांत **लिखित साधने, भौतिक साधने आणि मौखिक साधने** यांचा समावेश होतोया साधनांचे वेगवेगळ्या पद्धतीने जतन .
.करावे लागते

**१) लिखित साधनांचे जतन :**

१. **प्राचीन ग्रंथ, पुस्तके, ऐतिहासिक दस्तऐवज** यांचे जतन करावे लागतेत्यांची . **पाने बुरशी**, किंवा **पाण्यापासून** वाचवावी लागतात.

२या साधनांना . **पाणी लागणार नाही** याची काळजी घ्यावी लागते.

३. **कीटकनाशक औषधे** वापरावी लागतात.

**२भौतिक ( साधनांचे जतन :**

१. **किल्ले, स्मारके, राजवाडे** ही **भौतिक साधने** आहेत.

२अशा . **ऐतिहासिक वास्तूंची पाहणी** केली पाहिजेत्यांचे . **संरक्षण** केले पाहिजे.

३. **वास्तूंची नासधूस होणार नाही**, याची काळजी घेतली पाहिजे.

४. **वास्तूवर** कोणीही आपले **नाव** किंवा **अन्य माहिती लिहिली** किंवा **कोरली नाही पाहिजे.**

५. **ऐतिहासिक नाणी, प्राचीन हत्यारे** अशा विविध वस्तू काळजीपूर्वक हाताळाव्यातत्यांची . **चोरी होणार नाही** याची काळजी घ्यावी.

**३मौखिक ( साधनांचे जतन :**

१. **ओव्या, लोकगीते, गोष्टी** इत्यादी **मौखिक साधने** असतात.

२.अशा साधनांचे संकलन केले पाहिजे .

३ .**मौखिक साहित्य** जतन करण्यासाठी ते **लिखित स्वरूपात** आणावे.

४. **मौखिक साहित्य एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे** पाठवावे.

**२ )कला क्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे स्पष्ट करा.**
विविध कलाक्षेत्रांत व्यवसायाच्या पुढील संधी उपलब्ध असतात.

1. कलेच्या अभ्यासकांना संग्रहालये, अभिलेखागारे, ग्रंथालये, पुरातत्त्वीय संशोधन, पत्रकारिता आणि भारतीय विद्या या ठिकाणी व्यवसाय मिळू शकतात.

2. औद्योगिक आणि जाहिरात क्षेत्रात तसेच कलावस्तूंच्या खरेदी-विक्री व्यवसायात कलांच्या जाणकारांची आवश्यकता असते.

3. चित्रपट आणि नाटक निर्मितीसाठी नेपथ्य, कलाकार, दिग्दर्शक, छायाचित्रकार, प्रकाशयोजना इत्यादी कलाकारांची आवश्यकता असते.

4. मुद्रणक्षेत्रात तसेच घरसजावटीच्या साहित्यनिर्मितीत कला क्षेत्रातील जाणकारांची गरज असते.

5. दागदागिने, धातूंच्या वा लाकडी शोभेच्या वस्तू बनवणे, बांबू, काच, कापड, माती वा दगडी कलापूर्ण वस्तू, शिल्पे बनवणे या क्षेत्रातही व्यवसायच्या अनेक संधी उपलब्धआहेत,

**३) पर्यटनाशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे स्पष्ट करा.**

पर्यटन उद्योग हा एक उद्योग आहे ज्यामध्ये कामकाजाची मोठी सुरुवात केली जाऊ शकते.

1) जेव्हा जेव्हा कुशलतेने निरीक्षण केले जाते तेव्हा ते खरोखर स्थिर उद्योग आहे. त्यात प्रयोग आणि विकासासाठी प्रचंड विस्तार आहे.

2) पर्यटन उद्योग आणि शेजारीपणाच्या उद्योगात व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

3) एखादा प्रवासी त्या देशाच्या एअर टर्मिनलवर येण्यापूर्वीच ज्या देशाला सुट्टीचे स्थान असते त्यांचे उत्पन्न मिळू लागते. त्याला त्याच्या

व्हिसासाठी पैसे देण्याची गरज आहे.

4) तो त्याच्या चळवळीसाठी, राहण्याची व्यवस्था, भोजन, दुभाषे आणि सहाय्यकांना हप्ते, कागदपत्रे खरेदी, संदर्भ पुस्तके, किसेक्स वगैरे खर्च करतो.

हे त्या देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासास जोडते.

**प्रश्न 6. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :** **2**

**(1) नॅशनल कॉन्फरन्स हा पक्ष ...... येथे आहे.**

(अ) ओडिशा
(ब) आसाम
(क) बिहार
(ड) जम्मू आणि काश्मीर

**(२) लोकशाहीचा गाभा म्हणजे ........**

अ) प्रौढ मताधिकार
(ब) सत्तेचे विकेंद्रीकरण
(क) राखीव जागांचे धोरण
(ड) न्यायालयीन निर्णय

**प्रश्न 7. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. ( कोणतेही दोन )** **4**

(1) निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करते.

हेविधान बरोबर आहे__ "कारण निवडणुकीपूर्वी काही काळ व निवडणुकीच्या दरम्यान सरकार, राजकीय पक्ष व मतदारांनी निवडणुकीसंबंधी कोणत्या नियमाचे पालन करावे तेच ते स्पष्ट केलेले असते.आचारसंहिता लागू करते यामुळे निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान .

(2) ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

हे विधान **बरोबर** आहे; कारण -

१.अर्थव्यवस्थेतील बदलांचा आणि बदललेल्या समाजव्यवस्थेचा ग्राहकांवर परिणाम होत असतो

२. भेसळ वस्तुंच्या वाढवलेल्या किमती, वजनमापातील फसवणूक-, वस्तूंचा कमी दर्जा पण अधिक किमती इत्यादींसारख्या अनेक समस्यांना ग्राहकांना तोंड दयावे लागते.

३त्यानंतर ग्राहकांना आपल्या हक्कांची .साली ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला अशा फसवणुकीपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी जाणीव व्हावी व त्यांचे संरक्षण व्हावे, यासाठी 'ग्राहक चळवळ' अस्तित्वात आली.

**३) लोकशाही टिकवण्यासाठी दक्ष राहावे लागते. हे विधान बरोबर आहे; कारण**

i) लोकशाही व्यवस्था केवळ शासकीय पातळीवर असून चालत नाही; तर ती लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे.

ii) लोकशाहीतील लोकांचे हक्क, स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी सतत जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

iii) भ्रष्टाचार, हिंसा, गुन्हेगारीकरण यांसारख्या लोकशाहीला आव्हान देणाऱ्या समस्या वेळीच नष्ट कराव्या लागतात. त्यासाठी लोकांना आणि शासनालाही सतत दक्ष राहावे लागते.

**प्रश्न 8.( कोणतेही एक) :संकल्पना स्पष्ट करा** 2

**1) आदिवासी चळवळ**

१. पूर्वीपासूनच **आदिवासींचा उदरनिर्वाह** हा **जंगलावर** व **जंगलसंपत्तीवर** होत असे.

२. मात्र, **ब्रिटिश राजवटीत** आदिवासींना **जंगलावर उदरनिर्वाह** करण्यास **बंदी** घालण्यात आली.

३. या असहाय व अन्यायकारक बंदी विरोधात **ब्रिटिशांविरुद्ध** अनेक **आदिवासींनी** विविध ठिकाणी **उठाव** व **आंदोलने** केली. त्यांत **कोलाम**, **गोंड**, **कोळी**, **भिल्ल**, **रामोशी**, **मुंडा** या **आदिवासींचा प्रामुख्याने समावेश** होता.

४. भारताला **स्वातंत्र्य** मिळाल्यावरही **आदिवासींचा** वनांवरील **हक्क मान्य** करण्यात आला **नाही.**

५. म्हणून, त्यांच्या **मागण्या पूर्ण** करण्यासाठी **आदिवासींनी चळवळ** केली.

**आदिवासी चळवळीतील प्रमुख मागण्या:**

१. **वनांवर** व **जंगलसंपत्तीवर अधिकार** मिळावेत.

२. **वनांमध्ये** होणारी **उत्पादने** गोळा करण्याचे **अधिकार** मिळावेत.

३. **वनजमिनींवर** अन्य **लागवड** करण्याचा **अधिकार** मिळावा.

**(1)** प्रादेशिकता

**1. भारतात विविध भाषा बोलणारे, विविध परंपरा आणि संस्कृती असणारे लोक राहतात.**

**2. भौगोलि विविधतेबरोबरच साहित्य, शिक्षण, इतिहास, चळवळी यांबाबतीतही भारतात विविधता आढळते.**


**3. प्रत्येकालाच आपली भाषा, परंपरा, संस्कृती यांच्याविषयी आत्मीयता वाटते या .आत्मीयतेतनच वरील सर्वांबाबत अस्मिता निर्माण होतेव तेथील साधनसामग्री व रोजगाराच्या संधी यांवर आपला हक्क असावा आपल्या प्रदेशाचा विकास व्हावा ., या भावनेतून प्रादेशिक अस्मिता जागृत होते.**

**4. यातून आपल्या प्रदेशाच्या हितसंबंधांचे जतन करणे या हेतूपायी काही वेळेस स्वतंत्र राजकीय पक्ष, विविध दबाव गट अस्तित्वात येतात, चळवळी निर्माण होतात .**

**5. आपल्या प्रदेशाच्या हिताचे जतन करणे हा 'प्रादेशिकता' निर्मितीमागील मुख्य हेतू असतोआपल्या भाषेच्या ., प्रदेशाच्या विकासाला लोक प्राधान्य देऊ लागतात यालाच .'प्रादेशिकता' असे म्हणतात .**


**दिलेल्या सूचनेनुसार कृती (ब)करा) कोणतेही एक : (** **2**

(3) **पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




(4) **पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

महिलांसंबंधी कायदे व प्रतिनिधित्वविषयक तरतुदी




**प्रश्न 9. पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तरे लिहा) .कोणतेही एक : (** 2

मतदाराचे वय २१ वर्षांवरून १८ वर्षे केल्यामुळे कोणते परिणाम झाले ? १) स्वतंत्र भारतातील नव्या युवा वर्गाला यामुळे राजकीय अवकाश प्राप्त झाले. २) लोकशाही ची व्याप्ती वाढवणाऱ्या बदलामुळे भारतीय लोकशाही जगातील सर्वांत मोठी लोकशाही मानली जाते.

३) अन्य कोणत्याही लोकशाही असलेल्या देशात इतकी मतदार संख्या आढळत नाही.

४) बदल हा केवळ संख्यात्मक नसुन तो गुणात्मक ही आहे.

५) अनेक राजकीय पक्ष या युवा मतदारांच्या पाठिंब्यामुळे सत्तेच्या स्पर्धेत उतरले आहेत. भारतातील राजकीय स्पर्धेचे स्वरूप ही त्यामुळे बदलले आहे.

**2 )निवडणूक आचारसंहिता म्हणजे काय हे स्पष्ट करा**.

१) निवडणुका जाहीर झाल्यापासून निर्णय घोषित होईपर्यंत सरकार, राजकीय पक्ष, उमेदवार व मतदार यांनी कोणत्या नियमांचे पालन करावे व कोणते वर्तन करू नये, यासंबंधीची जी नियमावली निवडणूक आयोगाकडून जाहीर केली जाते, त्या आचारनियमावलीस 'निवडणूक आचारसंहिता' असे म्हणतात.

२) निवडणुकीच्या काळात गैरप्रकार होऊ नयेत, म्हणून आचारसंहिता घोषित केली जाते.

All the best

## प्रश्नपेढी : विषय : इतिहास

# पाठ क्र.1) इतिहास लेखन : पाश्चात्य परंपरा

**प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा**

(1) जर्मनीमधील गॉटिंगेन विद्यापीठात प्रथमच ……………या विषयाला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले.

(अ) नाणकशास्त्र (ब) भाषारचनाशास्त्र (क) इतिहास (ड) अक्षरवटिकाशास्त्र

**उत्तर :** जर्मनीमधील गॉटिंगेन विद्यापीठात प्रथमच **इतिहास** या विषयाला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले.

(2) ‘हिस्टरी’ हा शब्द …………….. भाषेतील आहे.

(अ) भारतीय (ब) ग्रीक (क) फ्रेंच (ड) जर्मन

**उत्तर :** ‘हिस्टरी’ हा शब्द **ग्रीक** भाषेतील आहे.

(3) आधुनिक इतिहास लेखनाचा जनक .......... यास म्हणता येईल.

(अ) व्हॉल्टेअर (ब) रेनेदेकार्त (क) लिओपॉल्ड रांके (ड) कार्ल मार्क्स

**उत्तर :** आधुनिक इतिहास लेखनाचा जनक **व्हॉल्टेअर** यास म्हणता येईल.

(4) सीमाँ-द-बोव्हा या ………विदुषीने आधुनिक इतिहास लेखनातील स्त्रीवादाची मूलभूत भूमिका सिद्ध केली.

(अ) भारतीय (ब) जर्मन (क) ब्रिटिश (ड) फ्रेंच

**उत्तर :** सीमाँ-द-बोव्हा या **फ्रेंच** विदुषीने आधुनिक इतिहास लेखनातील स्त्रीवादाची मूलभूत भूमिका सिद्ध केली.

(5) आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज हा ग्रंथ ......... याने लिहिला.

(अ) कार्ल मार्क्स (ब) मायकेल फुको (क) लुसिआँ फेबर (ड) व्हॉल्टेअर

**उत्तर :** आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज हा ग्रंथ **मायकेल फुको** याने लिहिला.

**प्रश्न - पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा**

(1)

(अ) मायकेल फुको -- फ्रेंच इतिहासकार

(ब) रेने देकार्त -- फ्रेंच तत्त्वज्ञ

(क) व्हॉल्टेअर -- ब्रिटिश इतिहासकार

(ड) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल -- जर्मन तत्त्वज्ञ


**उत्तर चुकीची जोडी : व्हॉल्टेअर – ब्रिटिश इतिहासकार**

**प्रश्न - दिलेल्या सूचनानुसार कृती करा :**


(1) तत्त्वज्ञाच्या कालखंडाशी संदर्भातील पुढील कालरेषा पूर्ण करा

| | | | |
|---|---|---|---|
| इ.स. ------------ | इ.स.१६९४-१७७८ | इ.स. ------------ | इ.स. १७९५-१८८६ |
| रेने देकार्त | --------------------- | कार्ल मार्क्स | --------------------- |


**उत्तर :**




(2) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




**उत्तर :**




**प्रश्न - थोडक्यात टिपा लिहा :**

**(1)अॅनल्स प्रणाली :**

**उत्तर:** 1. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस फ्रान्समध्ये ॲनल्स नावाने ओळखली जाणारी इतिहासलेखनाची प्रणाली उदयाला आली. ॲनल्स प्रणालीमुळे इतिहासलेखनाला एक वेगळीच दिशा मिळाली.

2.इतिहासाचा अभ्यास फक्त राजकीय घडामोडी, राजे, महान नेते आणि त्या अनुषंगाने राजकारण, मुत्सद्देगिरी, युद्धे यांच्यावर केंद्रित न करता तत्कालीन हवामान, स्थानिक लोक, शेती, व्यापार, तंत्रज्ञान, दळणवळण, संपर्काची साधने, सामाजिक विभागणी आणि समूहाची मानसिकता यांसारख्या विषयांचा अभ्यास करणेही महत्त्वाचे मानले जाऊ लागले.

3.ॲनल्स प्रणाली सुरू करण्याचे आणि तिचा विकास करण्याचे श्रेय फ्रेंच इतिहासकारांना दिले जाते.

**(2) स्त्रीवादी इतिहासलेखन :**

**उत्तर:** 1. स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून केलेली इतिहासाची पुनर्रचना होय.

2. स्त्रीवादी इतिहासलेखनामध्ये स्त्रियांचा अंतर्भाव करण्याबरोबर इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील पुरुषप्रधान दृष्टिकोनाचा पुनर्विचार करण्यावर भर दिला गेला.

3.त्यानंतर स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित नोकरी, रोजगार, ट्रेड युनियन, त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था, स्त्रियांचे कौटुंबिक आयुष्य यांसारख्या विविध पैलूंचा सविस्तर विचार करणारे संशोधन सुरू झाले.
4.१९९० नंतर 'स्त्री' हा एक स्वतंत्र सामाजिक वर्ग मानून इतिहास लिहिण्यावर भर दिला गेलेला दिसतो.

**(3) इतिहासकार् :**
**उत्तर:** 1. इतिहासात उपलब्ध पुराव्यांचे चिकित्सापूर्वक संशोधन करून, भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी कशी केली जाते, हे आपण पाहिले. अशी मांडणी करण्याच्या लेखनपद्धतीला इतिहासलेखन असे म्हणतात. अशा प्रकारे इतिहासाची चिकित्सापूर्वक मांडणी करणाऱ्या संशोधकाला इतिहासकार असे म्हटले जाते.
2.इतिहासाची मांडणी करताना भूतकाळात घडून गेलेल्या प्रत्येक घटनेची नोंद घेणे आणि तिचे ज्ञान करून देणे, इतिहासकाराला शक्य नसते.
3.इतिहासाची मांडणी करताना इतिहासकार भूतकाळातल्या कोणत्या घटनांची निवड करतो, हे त्याला वाचकांपर्यंत काय पोचवायचे आहे यावर अवलंबून असते.
4.निवडलेल्या घटना आणि त्यांची मांडणी करताना अवलंबलेला वैचारिक दृष्टिकोन या गोष्टी इतिहासकाराच्या लेखनाची शैली निश्चित करतात.

**प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा :**

**(1) स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले.**
**उत्तर:** स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित विविध पैलूंवर विचार करणारे संशोधन सुरू झाले, कारण ---
1.स्त्रीवादी इतिहासलेखन म्हणजे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून केलेली इतिहासाची पुनर्रचना. सीमॉं-द-बोव्हा या फ्रेंच विदुषीने स्त्रीवादाची मूलभूत भूमिका सिद्ध केली.
2.स्त्रीवादी इतिहासलेखनामध्ये स्त्रियांचा अंतर्भाव करण्याबरोबर इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील पुरुषप्रधान दृष्टिकोनाचा पुनर्विचार करण्यावर भर दिला गेला.
3.त्यानंतर स्त्रियांच्या आयुष्याशी निगडित नोकरी, रोजगार, ट्रेड युनियन, त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था, स्त्रियांचे कौटुंबिक आयुष्य यांसारख्या विविध पैलूंचा सविस्तर विचार करणारे संशोधन सुरू झाले.
4.१९९० नंतर 'स्त्री' हा एक स्वतंत्र सामाजिक वर्ग मानून इतिहास लिहिण्यावर भर दिला गेलेला दिसतो.

**(2) फुको यांच्या लेखनपद्धतीला ज्ञानाचे पुरातत्त्व म्हटले आहे.**
**उत्तर:** फुको यांच्या लेखनपद्धतीला ज्ञानाचे पुरातत्त्व म्हटले आहे, कारण ---
1. विसाव्या शतकातील फ्रेंच इतिहासकार मायकेल फुको याच्या लिखाणातून इतिहासलेखनाची एक नवी संकल्पना पुढे आली.
2. मायकेल फुको याच्या 'आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज' या ग्रंथामध्ये त्याने इतिहासाची कालक्रमानुसार अखंड मांडणी करण्याची पद्धत चुकीची आहे, असे प्रतिपादन केले.
3.पुरातत्त्वामध्ये अंतिम सत्यापर्यंत पोचणे हे उद्दिष्ट नसून भूतकाळातील स्थित्यंतरांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न असतो याकडे त्याने लक्ष वेधले. फुको याने इतिहासातील स्थित्यंतरांचे स्पष्टीकरण देण्यावर भर दिला. म्हणून त्याने या पद्धतीला ज्ञानाचे पुरातत्त्व असे म्हटले.
4. इतिहासकारांनी पूर्वी विचारात न घेतलेल्या मनोविकृती, वैद्यकशास्त्र, तुरुंगव्यवस्था यांसारख्या विषयांचा त्याने इतिहासाच्या दृष्टीतून विचार केला.

**प्रश्न - पुढील परिच्छेद काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा**

| |
|---|
| ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात मेसोपेटोमियातील सुमेर संस्कृतीमध्ये झाली, असे सद्यपरिस्थितीत म्हणता येईल. सुमेर साम्राज्यात होऊन गेलेले राजे, त्यांच्यामधील संघर्षाच्या कहाण्या यांची वर्णने तत्कालीन शिलालेखांमध्ये जतन केलेली आहेत. त्यातील सर्वाधिक प्राचीन शिलालेख सुमारे ४५०० वर्षांपूर्वी सुमेरमधील दोन राज्यांमध्ये झालेल्या युद्धाची नोंद करणारा असून, तो सध्या फ्रान्समधील लुव्र या जगप्रसिद्ध संग्रहालयात ठेवलेला आहे. |

**प्रश्न :**

1) ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात कोणत्या संस्कृती पासून झाली ? **1**

2) सुमेरमधील दोन राज्यांमध्ये झालेल्या युद्धाची नोंद करणारा प्राचीन शिलालेख कोठे ठेवलेला आहे ? **1**

3) मेसोपेटोमियातील सुमेर संस्कृतीच्या प्राचीन शिलालेखाचे इतिहासाचे साधन म्हणून महत्त्व स्पष्ट करा. **2**

**उत्तरे –**

(1) ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात मेसोपेटोमियातील सुमेर संस्कृतीपासून झाली.

(2) सुमेरमधील दोन राज्यांमध्ये झालेल्या युद्धाची नोंद करणारा प्राचीन शिलालेख फ्रान्समधील लुव्र या जगप्रसिद्ध संग्रहालयात ठेवलेला आहे.

(3) मेसोपेटोमियातील सुमेर संस्कृतीच्या प्राचीन शिलालेखाचे इतिहासाचे साधन म्हणून महत्त्व पुढीलप्रमाणे :--

1. ऐतिहासिक घटनांच्या लिखित नोंदी करण्याच्या परंपरेची सुरुवात मेसोपेटोमियातील सुमेर संस्कृतीमध्ये झाली, असे सद्यपरिस्थितीत म्हणता येते.

2.सुमेर साम्राज्यात होऊन गेलेले राजे, त्यांच्यामधील संघर्षाच्या कहाण्या यांची वर्णने तत्कालीन शिलालेखांमध्ये जतन केलेली आहेत.

**प्रश्न - पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

**(1) आधुनिक इतिहासलेखन पद्धतीची चार वैशिष्ट्ये कोणती ?**

उत्तर :

गतकाळात घडून गेलेल्या घटनांची क्रमशः संगती लावून त्यांचे आकलन करून घेणे या उद्दिष्टाने इतिहासाचे संशोधन, लेखन आणि अभ्यास केला जातो. ही एक अखंडितपणे चालणारी प्रक्रिया असते. आधुनिक इतिहासलेखन पद्धतीची चार वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे --

आधुनिक इतिहासलेखनाच्या पद्धतीची चार प्रमुख वैशिष्ट्ये सांगितली जातात :

1. आधुनिक इतिहासलेखन पद्धती शास्त्रशुद्ध आहे. तिची सुरुवात योग्य प्रश्नांची मांडणी करण्यापासून होते.

2.हे प्रश्न मानवकेंद्रित असतात. म्हणजेच ते भूतकाळातील विविध मानवी समाजाच्या सदस्यांनी विशिष्ट कालावधीत केलेल्या कृतींसंबंधी असतात. इतिहासात त्या कृतींचा संबंध दैवी घटना किंवा देवदेवतांच्या कथाकहाण्यांशी जोडण्याचा प्रयत्न केला जात नाही.

3.या प्रश्नांच्या इतिहासातील उत्तरांना विश्वासार्ह पुराव्यांचा आधार असतो. त्यामुळे इतिहासाची मांडणी तर्कसुसंगत असते.

4.मानवजातीने भूतकाळात केलेल्या कृतींच्या आधारे मानवजातीच्या वाटचालीचा वेध इतिहासात घेतला जातो.

**:**

वरील वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या आधुनिक इतिहासलेखनाच्या परंपरेची बीजे प्राचीन ग्रीक इतिहासकारांच्या लेखनात आढळतात, असे मानले जाते.

**(2) लिओपॉल्ड व्हॉन रांके यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन स्पष्ट करा.**

उत्तर :

लिओपॉल्ड व्हॉन रांके यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन पुढीलप्रमाणे --

1. एकोणिसाव्या शतकातील इतिहासलेखनाच्या पद्धतीवर प्रामुख्याने बर्लिन विद्यापीठातील लिओपॉल्ड व्हॉन रांके याच्या विचारांचा प्रभाव होता.

2. लिओपॉल्ड व्हॉन रांके याने इतिहास संशोधनाची चिकित्सक पद्धती कशी असावी ते सांगितले.

3.मूळ दस्तऐवजांच्या आधारे प्राप्त झालेली माहिती ही सर्वाधिक महत्त्वाची आहे, यावर त्याने भर दिला.

4.तसेच ऐतिहासिक घटनांशी संबंधित असलेल्या सर्व प्रकारची कागदपत्रे आणि दस्तऐवज यांचा कसून शोध घेणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे लिओपॉल्ड व्हॉन रांके याने सांगितले.

5.अशा पद्धतीने ऐतिहासिक सत्यापर्यंत पोचता येणे शक्य आहे, असा विश्वास त्याने व्यक्त केला.

6.इतिहासलेखनातील काल्पनिकतेवर त्याने टीका केली. त्याने जागतिक इतिहासाच्या मांडणीवर भर दिला.

7.'द थिअरी अँड प्रॅक्टिस ऑफ फ हिस्टरी' आणि 'द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी' या ग्रंथांमध्ये लिओपॉल्ड व्हॉन रांकेच्या विविध लेखांचे संकलन आहे.

अशा प्रकारे, लिओपॉल्ड व्हॉन रांके यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन लिहिता येईल.

**(3) कार्ल मार्क्स यांचा वर्गसिद्धान्त स्पष्ट करा.**

उत्तर :

कार्ल मार्क्स यांचा वर्गसिद्धान्त पुढीलप्रमाणे --

1. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कार्ल मार्क्स याने मांडलेल्या वर्गसिद्धान्तांमुळे इतिहासाच्या दृष्टिकोनात महत्त्वाचा बदल घडवून आणणारी वैचारिक प्रणाली अस्तित्वात आली.

2.इतिहास अमूर्त कल्पनांचा नसून जिवंत माणसांचा असतो. माणसामाणसांमधील नातेसंबंध त्यांच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी उपलब्ध असलेल्या उत्पादन साधनांच्या स्वरूपावर व मालकीवर अवलंबून असतात.

3.समाजातील वेगवेगळ्या घटकांना ही साधने समप्रमाणात उपलब्ध होत नाहीत. त्यातून समाजाची वर्गावर आधारित विषम विभागणी होऊन वर्गसंघर्ष निर्माण होतो.

4.मानवी इतिहास अशा वर्गसंघर्षाचा इतिहास असून ज्या वर्गाच्या ताब्यात उत्पादन साधने असतात तो इतर वर्गांचे आर्थिक शोषण करतो, अशी मांडणी कार्ल मार्क्स याने केली.

5. कार्ल मार्क्स यांचा ‘दास कॅपिटल’ हा ग्रंथ वर्गसिद्धान्तांमुळे जगप्रसिद्ध आहे.

अशा प्रकारे, कार्ल मार्क्स यांचा वर्गसिद्धान्त मांडता येईल.

# पाठ क्र.2 : इतिहासलेखन : भारतीय परंपरा

**प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा**

(1) 'सोहगौडा ताम्रपट' हा ताम्रपट .................... येथे सापडला.

(अ) महाराष्ट्र (ब) उत्तर प्रदेश (क) दिल्ली (ड) बिहार

**उत्तर :** सोहगौडा ताम्रपट हा ताम्रपट **उत्तर प्रदेश** येथे सापडला.

(2) भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक .......... हे होत.

(अ) अलेक्झांडर कनिंगहॅम (ब) विल्यम जोन्स (क) जॉन मार्शल (ड) फ्रेडरिक मॅक्सम्युलर

**उत्तर :** भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक **अलेक्झांडर कनिंगहॅम** हे होत.

(3) हितोपदेश या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद .......... यांनी केला.

(अ) जेम्स मिल (ब) फ्रेडरिक मॅक्सम्युलर (क) माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन (ड) जॉन मार्शल

**उत्तर :** हितोपदेश या संस्कृत ग्रंथाचा जर्मन भाषेत अनुवाद **फ्रेडरिक मॅक्सम्युलर** यांनी केला.

(4) 'मराठी रियासत' प्रकाशित करून ..........यांनी मराठी इतिहासलेखन क्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे.

(अ) गोविंद सखाराम सरदेसाई (ब) वि.का. राजवाडे

(क) स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर (ड) दामोदर धर्मानंद कोसंबी

**उत्तर :** 'मराठी रियासत' प्रकाशित करून **गोविंद सखाराम सरदेसाई** यांनी मराठी इतिहासलेखन क्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे.

(5) न्या.महादेव गोविंद रानडे यांनी ......या ग्रंथात मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी विस्ताराने मांडली.

(अ) 'गुलामगिरी' (ब) 'द राईज ऑफ द मराठा पॉवर'

(क) 'हू वेअर द शूद्राज'(ड) 'द इंडियन वॉर ऑफ इन्डिपेन्डन्स 1857' (१८५७ चे 'स्वातंत्र्यसमर')

**उत्तर :** न्या.महादेव गोविंद रानडे यांनी '**द राईज ऑफ द मराठा पॉवर**' या ग्रंथात मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी विस्ताराने मांडली.

**प्रश्न - पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा**

(1)

(अ हू वेअर द शूद्राज -- वंचितांचा इतिहास

(ब) स्त्रीपुरुष तुलना -- स्त्रीवादी लेखन

(क) हितोपदेश -- प्राच्यवादी इतिहासलेखन

(ड) गुलामगिरी -- मार्क्सवादी इतिहास

**उत्तर चुकीची जोडी : गुलामगिरी – मार्क्सवादी इतिहास**

(2)

(अ) न्या.महादेव गोविंद रानडे ------- 'मराठी रियासत'

(ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ------- हू वेअर द शूद्राज'

(क) महात्मा जोतीराव फुले ------ गुलामगिरी

(ड) दामोदरधर्मानंद कोसंबी -------- 'प्रिमिटिव्ह कम्युनिझम टु स्लेव्हरी'

**उत्तर चुकीची जोडी : न्या.महादेव गोविंद रानडे – 'मराठी रियासत'**

**प्रश्न - दिलेल्या सूचनानुसार कृती करा :**

**(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

| …………………… | | …………………… |
|---|---|---|
| | वंचितांचा (सबऑल्टर्न) इतिहासलेखन करणारे इतिहासकार | |
| …………………… | | …………………… |

उत्तर :

| **अँटोनिओ ग्रामची** | | **महात्मा जोतीराव फुले** |
|---|---|---|
| | वंचितांचा (सबऑल्टर्न) इतिहासलेखन करणारे इतिहासकार | |
| **रणजित गुहा** | | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** |

**(2) पुढील तक्ता पूर्ण करा.**

| | |
|---|---|
| जेम्स मिल | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
| जेम्स ग्रँड डफ | ……………………………… |
| ……………….. | द हिस्टरी ऑफ इंडिया |
| श्री.अ.डांगे | ……………………………… |
| ……………….. | हू वेअर द शूद्राज |

उत्तर :

| | |
|---|---|
| जेम्स मिल | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
| जेम्स ग्रँड डफ | **ए हिस्टरी ऑफ द मराठाज्** |
| **माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन** | द हिस्टरी ऑफ इंडिया |
| श्री.अ.डांगे | **प्रिमिटीव्ह कम्युनिझम टू स्लेव्हरी** |
| **डॉ.बाबासाहेब आंबेडकर** | हू वेअर द शूद्राज |

**प्रश्न - थोडक्यात टिपा लिहा :**

**(1) बखर :**

**उत्तर:** 1. 'बखर' हा ऐतिहासिक साहित्यातील एक महत्त्वा चा प्रकार आहे.

2.शूरवीरांचे गुणगान, ऐति हासि क घडामोडी, लढाया, थोर पुरुषांची चरित्रे यांविषयीचे लेखन आपणांस बखरीत वाचायला मिळते.

3.मराठी भाषेत विविध प्रकारच्या बखरी उपलब्ध आहेत. यांतील एक महत्त्वाची बखर 'सभासद बखर' होय.

4.छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत कृष्णाजी अनंत सभासद यांनी सदर बखर लिहिली.

5.छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीची माहिती यातून मिळते. 'भाऊसाहेबांची बखर' या बखरीत पानिपतच्या लढाईचे वर्णन आहे. याच विषयावर आधारित 'पानिपतची बखर' अशीही स्वतंत्र बखर आहे.

**(2) वंचितांचा (सबऑल्टर्न) इतिहास :**

**उत्तर:** 1. वंचित समूहांचा इतिहास लिहिण्याची सुरुवात मार्क्सवादी इतिहासलेखनाच्या परंपरेतूनच झाली, असे म्हणता येईल.

**2.**इतिहासलेखनाची सुरुवात समाजाच्या तळाशी असलेल्या सर्वसामान्य लोकांच्या स्तरापासून करायला पाहिजे, ही कल्पना मांडण्यामध्ये अँटोनिओ ग्रामची या इटालियन तत्त्वज्ञाचे स्थान महत्त्वाचे आहे.

**3.**वंचितांचा इतिहास लिहिण्यासाठी लोकपरंपरा हे एक महत्त्वाचे साधन मानले गेले आहे.

**4**.वंचितांच्या इतिहासाला एक महत्त्वाची विचारसरणी म्हणून स्थान मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य रणजित गुहा या भारतीय इतिहासकाराने केले.

**प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा :**

**(1) 'राजतरंगिणी' हा काश्मीरच्या इतिहासावरील ग्रंथ मध्ययुगीन काळातील महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे**

**उत्तर:** 'राजतरंगिणी' हा काश्मीरच्या इतिहासावरील ग्रंथ मध्ययुगीन काळातील महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे, कारण ---

1. इसवी सनाच्या १२व्या शतकात कल्हण याने लिहिलेला 'राजतरंगिणी' हा काश्मीरच्या इतिहासावरील ग्रंथ आहे.

2.इतिहासलेखन शास्त्रशुद्ध कसे असावे, याच्या आधुनिक संकल्पनेशी हा ग्रंथ जवळचे नाते सांगतो.

3.त्यामध्ये अनेक कोरीव लेख, नाणी, प्राचीन वास्तूंचे अवशेष, राजकुलांच्या अधिकृत नोंदी आणि स्थानिक परंपरा अशा अनेक साधनांचा चिकित्सक अभ्यास करून आपण हा ग्रंथ रचला, असा उल्लेख कल्हणाने केला आहे.

**प्रश्न - पुढील परिच्छेद काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

सोहगौडा ताम्रपट : हा ताम्रपट सोहगौडा (जिल्हा गोरखपूर, उत्तर प्रदेश) येथे सापडला. हा ताम्रपट मौर्य काळातील असावा असे मानले जाते. ताम्रपटावरील कोरीव लेख ब्राह्मी लीपीत आहे. लेखाच्या सुरुवातीस जी चिन्हे आहेत त्यातील पारासहित असलेला वृक्ष तसेच पर्वत (एकावर एक असलेल्या तीन कमानी) ही चिन्हे प्राचीन आहत नाण्यांवरही आढळतात. चार खांबांवर उभे असलेले दुमजली इमारतीप्रमाणे दिसणारे चिन्ह कोठारघरांचे निदर्शक असावेत, असे अभ्यासकांचे मत आहे. या कोठारघरांमधील धान्य जपून वापरण्यात यावे, असा आदेश त्या लेखात दिलेला आहे. दुष्काळजन्य परिस्थितीचे निवारण करण्यासाठी काय काळजी घ्यावी, या संदर्भातील हा आदेश असावा, असे मानले जाते.

**प्रश्न :**

(1) सोहगौडा ताम्रपट कोठे सापडला ? **1**

(2) सोहगौडा ताम्रपटावरील कोरीव लेख कोणत्या लिपीमध्ये लिहिलेला आहे ? **1**

(3) सोहगौडा ताम्रपटाचे इतिहासाचे साधन म्हणून महत्त्व स्पष्ट करा **2**

**उत्तरे :**

(1) सोहगौडा ताम्रपट जिल्हा गोरखपूर, उत्तर प्रदेश येथे सापडला.

(2) सोहगौडा ताम्रपटावरील कोरीव लेख ब्राह्मी लिपीमध्ये लिहिलेला आहे

(3) सोहगौडा ताम्रपटाचे इतिहासाचे साधन म्हणून महत्त्व पुढीलप्रमाणे :--

1. सोहगौडा ताम्रपट लेखाच्या सुरुवातीस जी चिन्हे आहेत त्यातील पारासहित असलेला वृक्ष

तसेच पर्वत (एकावर एक असलेल्या तीन कमानी) ही चिन्हे व चार खांबांवर उभे असलेले दुमजली इमारतीप्रमाणे दिसणारे चिन्ह कोठारघरांचे निदर्शक असावेत, असे अभ्यासकांचे मत आहे.

2. या कोठारघरांमधील धान्य जपून वापरण्यात यावे, असा आदेश त्या लेखात दिलेला आहे.

3.दुष्काळजन्य परिस्थितीचे निवारण करण्यासाठी काय काळजी घ्यावी, या संदर्भातील हा आदेश असावा, असे मानले जाते.

**प्रश्न - पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

**(1) वसाहतवादी इतिहासलेखन म्हणजे काय ?**

उत्तर :

वसाहतवादी इतिहासलेखन माहिती पुढीलप्रमाणे --

1. : भारतीय इतिहासाचा अभ्यास आणि लेखन करणाऱ्या सुरुवातीच्या इतिहासकारांमध्ये प्रामुख्याने ब्रिटिश अधिकारी तसेच ख्रिश्चन धर्मप्रसारकांचा अंतर्भाव होता.

2. भारतीय संस्कृती गौण दर्जाची आहे, या पूर्वग्रहाचे प्रतिबिंब त्यांच्यामधील काहींच्या लेखनात स्पष्टपणे उमटलेले दिसते.

3.वसाहतवादी ब्रिटिश सत्तेच्या समर्थनासाठी त्यांच्या इतिहासलेखनाचा वापर केला गेला.

4.१९२२ ते १९३७ च्या दरम्यान प्रसिद्ध झालेले 'केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया' या ग्रंथाचे पाच खंड हे वसाहतवादी इतिहासलेखनाचे ठळक उदाहरण आहे.

अशा प्रकारे, वसाहतवादी इतिहासलेखन माहिती लिहिता येईल.

**(2) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहास लेखनातील योगदान स्पष्ट करा.**

उत्तर :

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहास लेखनातील योगदान पुढीलप्रमाणे --

1. इतिहासलेखन, भाषाशास्त्र, व्युत्पत्ती व्याकरण अशा अनेक विषयांवर मूलभूत संशोधन करणारे आणि मराठी भाषेतून लेखन करणारे इतिहासकार म्हणून इतिहासाचार्य वि. का. राजवाडे परिचित आहेत.

2.आपला इतिहास आपण लिहिला पाहिजे, याचा पुरस्कार त्यांनी केला. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' असे शीर्षक असणारे २२ खंड त्यांनी संपादित केले. त्यांतील त्यांच्या प्रस्तावना अत्यंत अभ्यासपूर्ण आहेत.

3. ''इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन. केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी केलेली कटकारस्थाने आणि यद्धे ु यांच्याच हकिकती नव्हेत'', असे त्यांचे मत होते.

4.अस्सल कागदपत्रांच्याच आधारे इतिहास लिहिला पाहिजे, असा इतिहासाचार्य वि. का. राजवाडे चा आग्रह होता.

5. इतिहास संशोधनाच्या कार्यासाठी वि.का.राजवाडे यांनी पुण्यात ७ जुलै १९१० रोजी भारत इतिहास संशोधक मंडळ स्थापन केले.

अशा प्रकारे, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे इतिहास लेखनातील योगदान लिहिता येईल.

**(3) मार्क्सवादी इतिहासलेखन म्हणजे काय ?**

उत्तर :

मार्क्सवादी इतिहासलेखन माहिती पुढीलप्रमाणे --

आधुनिक इतिहासलेखनाच्या पद्धतीची चार प्रमुख वैशिष्ट्ये सांगितली जातात :

1. मार्क्सवादी इतिहासकारांच्या लेखनात आर्थिक व्यवस्थेतील उत्पादनाची साधने, पद्धती आणि उत्पादनाच्या प्रक्रियेतील मानवी संबंध यांचा विचार मध्यवर्ती होता.

2.प्रत्येक सामाजिक घटनेचा सर्वसामान्य लोकांवर काय परिणाम होतो याचे विश्लेषण करणे हे मार्क्सवादी इतिहासलेखनाचे महत्त्वाचे सूत्र होते.

3.मार्क्सवादी इतिहासकारांनी जातिव्यवस्थेत होत गेलेल्या बदलांचा अभ्यास केला.

4.भारतामध्ये मार्क्सवादी इतिहासलेखन पद्धतीचा अवलंब प्रभावी रीतीने करणाऱ्या इतिहासकारांमध्ये दामोदर धर्मानंद कोसंबी, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे, रामशरण शर्मा, कॉम्रेड शरद पाटील इत्यादींचे योगदान महत्त्वाचे आहे. 5. कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे डांगे हे भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. त्यांचे 'प्रिमिटिव्ह कम्युनिझम टु स्लेव्हरी' हे पुस्तक मार्क्सवादी इतिहासलेखनाचे उदाहरण आहे.

अशा प्रकारे, मार्क्सवादी इतिहासलेखन माहिती लिहिता येईल

# पाठ क्र.3) उपयोजित इतिहास

**प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा**

(1) जगातील सर्वांत प्राचीन संग्रहालय .......... या शहराचे उत्खनन करताना सापडले.

(अ) दिल्ली (ब) हडप्पा (क) उर (ड) कोलकाता

**उत्तर :** जगातील सर्वांत प्राचीन संग्रहालय **उर** या शहराचे उत्खनन करताना सापडले.

(2) भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार ......... येथे आहे.

(अ) नवी दिल्ली (ब) कोलकाता (क) मुंबई (ड) चेन्नई

**उत्तर :** भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार **नवी दिल्ली** येथे आहे.

(3) युनेस्कोच्या जागतिक नैसर्गिक वारशाच्या यादीत ……… समावेश २०१२ मध्ये केला गेला आहे.

(अ) अजिंठा लेणीचा (ब) वेरूळ लेणीचा(क) पश्चिम घाटाचा (ड) घारापुरी (एलिफन्टा) लेणीचा

**उत्तर :** युनेस्कोच्या जागतिक नैसर्गिक वारशाच्या यादीत **पश्चिम घाटाचा** समावेश २०१२ मध्ये केला गेला आहे.

(4) 'नॅशनल फिल्म अर्काइव्ह' (राष्ट्रीय फिल्म संग्रहालय) या संस्थेची मुख्य कचेरी ………येथे आहे.

(अ) नवी दिल्ली (ब) कोलकाता (क) मुंबई (ड) पुणे

**उत्तर :** 'नॅशनल फिल्म अर्काइव्ह' (राष्ट्रीय फिल्म संग्रहालय) या संस्थेची मुख्य कचेरी **पुणे** येथे आहे.

(5) गुजरात मधील पाटण येथील ……………हे जागतिक वारसा स्थळ - सांस्कृतिक आहे

(अ) कॅपिटल कॉम्प्लेक्स (ब) राणी की बाव

(क) चर्चेस आणि कॉन्व्हेन्ट्स (ड) जंतर मंतर

**उत्तर :** गुजरात मधील पाटण येथील **राणी की बाव** हे जागतिक वारसा स्थळ - सांस्कृतिक आहे

**प्रश्न - पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा**

(1)

(अ) कुटियट्टम -- केरळमधील संस्कृत नाट्यपरंपरा
(ब) रम्मन -- पश्चिम बंगालमधील नृत्य
(क) रामलीला -- उत्तर भारतातील सादरीकरण
(ड) कालबेलीया -- राजस्थानचे लोकसंगीत आणि लोकनृत्य

**उत्तर चुकीची जोडी : रम्मन – पश्चिम बंगालमधील नृत्य**

(2)

(अ) नवी दिल्ली -- लाल किल्ला
(ब) जयपूर -- जंतर मंतर,
(क) हंपी -- सूर्यमंदिर
(ड) गंगैकोंडचोळीश्वर -- बृहदीश्वर मंदिर

**उत्तर : चुकीची जोडी : हंपी – सूर्यमंदिर**

(3)

(अ) नॅशनल फिल्म अर्काइव्ह -- पुणे
(ब) *भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार* -- नवी दिल्ली
(क) इंडियन म्युझियम -- कोलकाता
(ड) इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेज -- चेन्नई

**उत्तर : चुकीची जोडी : इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेज – चेन्नई**

**प्रश्न - दिलेल्या सूचनानुसार कृती करा :**

**(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

| ------------------------- | | ------------------------- |
|---|---|---|
| | महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळे | |
| ------------------------- | | ------------------------- |

**उत्तर :**

| **अजिंठा लेणी** | | **वेरूळ लेणी** |
|---|---|---|
| | महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळे | |
| **घारापुरी (एलिफन्टा) लेणी** | | **छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई** |

**प्रश्न - थोडक्यात टिपा लिहा :**

**(1) अभिलेखागार :**

**उत्तर:** 1.अभिलेखागारांमध्ये महत्त्वाची जुनी कागदपत्रे, दप्तरे, जुने चित्रपट, इत्यादी जतन करून ठेवली जातात.

2.भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार नवी दिल्ली मध्ये आहे.

3.भारतातील प्रत्येक राज्याचे स्वतंत्र अभिलेखागार आहे.

**प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा :**

**(1) उत्तर: जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे, परंपरा यांची यादी युनेस्कोद्वारे जाहीर केली जाते, कारण –**

1. पुढील मानवी पिढ्यांच्या हितासाठी आपल्या वारशाचे जतन होणे आवश्यक आहे.

2.नामशेष होण्याच्या वाटेवर असलेल्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचे जतन आणि संवर्धन व्हावे या हेतूने युनेस्को या जागतिक संघटनेने काही दिशादर्शक तत्त्वे जाहीर केलेली आहेत.

3.त्या दिशादर्शक तत्त्वांच्या आधाराने जागतिक वारशाच्या पदास पात्र ठरणारी स्थळे, परंपरा यांची यादी जाहीर केली जाते.

**प्रश्न - पुढील परिच्छेद काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा**

इतिहासाविषयी लोकांच्या मनात अनेक गैरसमज असतात. उदा. इतिहास हा विषय फक्त इतिहासकारांसाठी आणि इतिहास विषयाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असतो, दैनंदिन जीवनात इतिहासासारख्या विषयाचा काही उपयोग नसतो, इतिहासासारखा विषय आर्थिकदृष्ट्या उत्पादक क्षेत्रांशी जोडला जाऊ शकत नाही, इत्यादी. अशा गैरसमजांवर मात करत इतिहासाची नाळ लोकांच्या वर्तमानातील जीवनसरणीशी जोडणारे क्षेत्र म्हणजे ‘जनांसाठी इतिहास’. परदेशातील अनेक विद्यापीठांमध्ये जनांसाठी इतिहास या विषयातील अभ्यासक्रम शिकवले जातात. भारतात बंगळुरू येथे ‘सृष्टि इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन अँड टेक्नॉलॉजी’ या संस्थेत ‘सेंटर फॉर पब्लिक हिस्टरी’ हा स्वतंत्र विभाग आहे. तिथे या विषयातील प्रकल्प आणि संशोधनाचे काम चालते.

**प्रश्न :**(1) ‘सृष्टि इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन अँड टेक्नॉलॉजी’ ही संस्था भारतात कोठे आहे ? **1**

(2) ‘सृष्टि इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन अँड टेक्नॉलॉजी’ या संस्थेत कोणता स्वतंत्र विभाग आहे ? 1

(3) इतिहासाविषयी लोकांच्या मनात कोणते अनेक गैरसमज असतात **2**

**उत्तरे –**

(1) सृष्टि इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन अँड टेक्नॉलॉजी’ ही संस्था भारतात बंगळुरू येथे आहे

(2) ‘सृष्टि इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन अँड टेक्नॉलॉजी’ या संस्थेत ‘सेंटर फॉर पब्लिक हिस्टरी’ हा स्वतंत्र विभाग आहे.

(3) इतिहासाविषयी लोकांच्या मनात असलेले गैरसमज पुढीलप्रमाणे :--

1. इतिहास हा विषय फक्त इतिहासकारांसाठी आणि इतिहास विषयाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असतो.
2. दैनंदिन जीवनात इतिहासासारख्या विषयाचा काही उपयोग नसतो.
3.इतिहासासारखा विषय आर्थिकदृष्ट्या उत्पादक क्षेत्रांशी जोडला जाऊ शकत नाही

**प्रश्न - पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

**(1)** पुढील विषयांच्या संशोधनात इतिहासाची संशोधन पद्धती कशी उपयुक्त ठरेल ते स्पष्ट करा.

(अ) विज्ञान (ब) कला (क) व्यवस्थापनशास्त्र

उत्तर :

इतिहास भूतकाळात घडून गेलेल्या घटनांशी संबंधित असतो. वर्तमानात दिसणाऱ्या मानवी जीवनाची घडण ही त्या घटनांवरच आधारलेली असते. या घटना राजकारण, सामाजिक-धार्मिक संघटन, तत्त्वज्ञान, तंत्रज्ञान आणि विज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये घडलेल्या असतात. प्रत्येक क्षेत्रातील ज्ञानसंचयाचा स्वतंत्र इतिहास असतो. त्या त्या क्षेत्रातील पुढील वाटचालीची दिशा या ज्ञानसंचयाच्या स्थितीवर अवलंबून असते. त्या अनुषंगाने अनेक विषयांच्या संशोधनात इतिहासाची संशोधनपद्धती उपयुक्त ठरते. याबाबतची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे --

◈मुख्य उत्तर :

☞ **(अ) विज्ञान :**

1. वैज्ञानिक शोध आणि सिद्धान्त यांचा कालक्रम आणि त्या शोधांमागील कारणपरंपरेची साखळी समजावून घेणे. यासाठी विज्ञानाचा इतिहास अभ्यासावा लागतो. गरज ही शोधाची जननी असते, असे म्हटले जाते.
2.अनेकदा वैज्ञानिक शोध हे मानवी गरजांची पूर्ती आणि जिज्ञासेचे समाधान करण्याच्या प्रयत्नातून लागलेले असतात. त्यासाठी आधी अस्तित्वात असलेल्या वैज्ञानिक ज्ञानाचा उपयोग केला जातो. या शोधांमागील कारणपरंपरा, कालक्रम समजून घेण्यासाठी विज्ञानाच्या इतिहासाचे ज्ञान उपयोगी पडते.

☞ **(ब) कला :**

1. विविध कलाक्षेत्रांमधील अभिव्यक्ती व त्यामागील वैचारिक-भावनिक-सांस्कृतिक परंपरांच्या आधाराने झालेला कलांचा विकास समजावून घेणे महत्त्वाचे असते.
2.कोणत्याही कलाविष्काराचे मर्म, कलाकृतीच्या निर्मात्याची मानसिकता आणि विशिष्ट कलाशैलीच्या विकासाचा क्रम सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासाद्वारे समजू शकतो.

☞ **(क) व्यवस्थापनशास्त्र :**

1. उत्पादनाची संसाधने, मनुष्यबळ आणि उत्पादनाच्या विविध प्रक्रिया, बाजार आणि विक्री यांच्या व्यवस्थापनाच्या साखळीत त्यासंबंधातील भूतकालीन यंत्रणा कशा होत्या, हे समजावून घेणे आवश्यक असते.
2.या साखळीत गुंतलेल्या विविध स्तरांवरील लोकांची परंपरागत मानसिकता समजावून घेण्यासाठी या सर्वांचा डोलारा ज्या वेगवेगळ्या सामाजिक आणि आर्थिक संस्थांच्या संघटनावर अवलंबून असतो, त्यांचा इतिहास समजला तर वर्तमानात विविध पातळ्यांवरील व्यवस्थापन करणे सोपे होते.

अशा प्रकारे, संशोधनात इतिहासाची संशोधन पद्धती विज्ञान, कला, व्यवस्थापनशास्त्र या विषयांमधील संशोधनास उपयुक्त ठरते.

# पाठ क्र.4 : भारतीय कलांचा इतिहास

**प्रश्न - दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा**

(1) चित्रकला आणि शिल्पकला यांचा .......... मध्ये समावेश होतो.

(अ) दृक्कला (ब) ललित कला (क) लोककला (ड) अभिजात कला

**उत्तर :** चित्रकला आणि शिल्पकला यांचा **दृक्कला** मध्ये समावेश होतो.

(2) मथुरा शिल्पशैली .......... काळात उदयाला आली.

(अ) कुशाण (ब) गुप्त (क) राष्ट्रकूट (ड) मौर्य

**उत्तर :** मथुरा शिल्पशैली **कुशाण** काळात उदयाला आली.

(3) हेमाडपंती मंदिराची बांधणी ………………… प्रकारची आहे.

(अ) चौकोनी (ब) आयताकृती (क) वर्तुळाकृती (ड) तारकाकृती

**उत्तर :** हेमाडपंती मंदिराची बांधणी **तारकाकृती** प्रकारची आहे.

**प्रश्न - पुढील प्रत्येक संचातील ब गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा**

(1)

(अ) कुतुबमिनार --- मेहरौली

(ब) गोलघुमट --- विजापूर

(क) छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस --- दिल्ली

(ड) ताजमहाल --- मार्क्सवादी इतिहास

**उत्तर चुकीची जोडी : छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस – दिल्ली**

**प्रश्न - दिलेल्या सूचनानुसार कृती करा :**

**(1) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| ………………….. | | ………………….. |
| | भारतात गुहाचित्रे असलेली राज्ये-स्थळे | |
| ………………….. | | ………………….. |

**उत्तर :**

| | | |
|---|---|---|
| **उत्तर प्रदेश** | | **बिहार** |
| | भारतात गुहाचित्रे असलेली राज्ये-स्थळे | |
| **कर्नाटक** | | **आंध्र प्रदेश** |

**प्रश्न - थोडक्यात टिपा लिहा :**

**(1) हेमाडपंती मंदिरे :**

**उत्तर:** 1. महाराष्ट्रातील बाराव्या-तेराव्या शतकातील मंदिरांना 'हेमाडपंती' मंदिरे असे म्हणतात.

2.हेमाडपंती मंदिराच्या बाह्य भिंती बऱ्याचदा तारकाकृती असतात. तारकाकृती मंदिराच्या बांधणीत मंदिराची बाह्य भिंत अनेक कोनांमध्ये विभागली जाते.

3.त्यामुळे त्या भिंती आणि त्यावरील शिल्पे यांच्यावर छायाप्रकाशाचा सुंदर परिणाम पाहण्यास मिळतो. हेमाडपंती मंदिरांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भिंतीचे दगड सांधण्यासाठी चुना वापरलेला नसतो.

4.दगडांमध्येच एकमेकांत घट्ट बसतील अशा कातलेल्या खोबणी आणि कुसू यांच्या आधाराने भिंत उभारली जाते.

5.मुंबईजवळील अंबरनाथ येथील अंब्रेश्वर, नाशिकजवळचे सिन्नर येथील गोंदेश्वर, हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ ही हेमाडपंती मंदिराची उत्तम उदाहरणे आहेत. त्यांची बांधणी तारकाकृती प्रकारची आहे. त्याखेरीज महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हेमाडपंती मंदिरे पहावयास मिळतात.

**(2)** मराठा चित्रशैली ::

**उत्तर:** 1. कलाशैलीचे उदाहरण म्हणून मराठा चित्रशैलीचा विचार करता येईल.साधारणपणे इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठा चित्रशैली विकसित होण्यास सुरुवात झाली.

2.या शैलीतील चित्रे रंगीत असून ती भित्तिचित्र आणि हस्तलिखितांमधील लघुचित्रांच्या स्वरूपातील आहेत.

3.वाई, मेणवली, सातारा यांसारख्या ठिकाणी जुन्या वाड्यांमधून मराठा चित्रशैलीतील काही भित्तिचित्रे पाहण्यास मिळतात. मराठा चित्रशैलीवर राजपूत चित्रशैलीचा आणि युरोपीय चित्रशैलीचा प्रभाव पडलेला दिसतो.

4.एखादी विशिष्ट चित्रशैली ज्या काळात विकसित झाली असेल, त्या काळातील राहणीमान, पोशाख, रीतीरिवाज इत्यादी गोष्टींचा अभ्यास त्या शैलीतील चित्रांच्या आधारे करता येतो.

**प्रश्न - पुढील विधाने सकारण स्पष्ट करा :**

**(1) चित्रकथीसारख्या नामशेष होणाऱ्या मार्गावर असलेल्या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे.**

**उत्तर: चित्रकथीसारख्या नामशेष होणाऱ्या मार्गावर असलेल्या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे, कारण ---**

1. इसवी सनाच्या बाराव्या शतकातील सोमेश्वर या चालुक्य राजाने लिहिलेल्या 'मानसोल्लास' किंवा 'अभिलषितार्थचिंतामणी' या ग्रंथात चित्रकथी परंपरेचे वर्णन केलेले आढळते. त्यावरून या परंपरेच्या प्राचीनत्वाची कल्पना येते.

2.कठपुतळ्या किंवा चित्रांच्या साहाय्याने रामायण, महाभारतातील कथा सांगण्याची परंपरा म्हणजे चित्रकथी परंपरा. या परंपरेतील चित्रे कागदावर काढून नैसर्गिक रंगात रंगवलेली असतात.

3.एका कथेसाठी साधारणपणे ३० ते ५० चित्रांचा वापर केला जातो. वेगवेगळ्या कथा सांगण्यासाठी अशा चित्रांच्या पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या पोथ्या चित्रकथी परंपरेमध्ये जपलेल्या असतात. नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या या परंपरेचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सरकार आणि कलाकारांतर्फे केले जात आहेत.

**प्रश्न - पुढील परिच्छेद काळजीपूर्वक वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा**

> लोकचित्रकलेची परंपरा गुहाचित्रांच्या परंपरेशी नाते सांगणारी आहे. घरातील लग्नकार्यात, सणासुदीला भिंतींवर चित्रे काढणे, अंगणात रांगोळी काढणे तसेच चित्रांच्या साहाय्याने आख्याने सांगणे यांतून प्रादेशिक लोककला परंपरेतील विविध चित्रशैली विकसित झाल्या. महाराष्ट्रातील वारली चित्रपरंपरा आणि पिंगुळ किंवा चित्रकथी परंपरा ही लोककला शैलीची निवडक उदाहरणे आहेत. ठाणे जिल्ह्यातील जिव्या सोम्या मशे यांचा वारली चित्रकला लोकप्रिय करण्यात फार मोठा वाटा आहे. त्यांना त्यांच्या वारली चित्रांसाठी भारतीय आणि जागतिक स्तरावरचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. सन २०११ मध्ये त्यांना पद्मश्री हा बहुमान मिळाला आहे.

**प्रश्न :**

(1) ठाणे जिल्ह्यातील कोणाचा वारली चित्रकला लोकप्रिय करण्यात फार मोठा वाटा आहे ? **01**

(2) जिव्या सोम्या मशे यांना सन २०११ मध्ये कोणता बहुमान मिळाला आहे ? **01**

(3) लोककला शैलीची निवडक उदाहरणे कोणती आहेत ? **02**

**उत्तरे :**

(1) ठाणे जिल्ह्यातील जिव्या सोम्या मशे यांचा वारली चित्रकला लोकप्रिय करण्यात फार मोठा वाटा आहे

(2) जिव्या सोम्या मशे यांना सन २०११ मध्ये पद्मश्री हा बहुमान मिळाला आहे

(3) महाराष्ट्रातील वारली चित्रपरंपरा आणि पिंगुळ किंवा चित्रकथी परंपरा ही लोककला शैलीची निवडक उदाहरणे आहेत.

**प्रश्न - पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

**(1) कला क्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत हे स्पष्ट करा.**

उत्तर :

कलेचा इतिहास ही एक ज्ञानशाखा आहे. त्या क्षेत्रात संशोधनाच्या आणि व्यवसायाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. कला क्षेत्रात व्यवसायाच्या कोणत्या संधी उपलब्ध आहेत याची माहिती पुढीलप्रमाणे --

1. कलेच्या इतिहासाचे अभ्यासक पत्रकारितेच्या क्षेत्रातही काम करू शकतात.

2.कलावस्तूंच्या खरेदी-विक्रीचे एक स्वतंत्र जग आहे. तिथे कलावस्तूंचे मूल्य ठरवण्यासाठी ती कलावस्तू नकली नाही ना, हे पारखण्याची आवश्यकता असते. त्यासाठी कलेच्या इतिहासाचा सखोल अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञांची आवश्यकता असते.

3.सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन तसेच सांस्कृतिक पर्यटन ही आता नव्याने विकसित होणारी क्षेत्रे आहेत. या क्षेत्रांमध्येही कलेच्या अभ्यासकांना अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत. त्यामध्ये संग्रहालय आणि अभिलेखागार, ग्रंथालय आणि माहिती प्रसारणाचे तंत्रज्ञान, पुरातत्त्वीय संशोधन आणि भारतीय विद्या ही काही महत्त्वाची क्षेत्रे आहेत.

4. औद्योगिक आणि जाहिरात क्षेत्र, तसेच घराची सजावट आणि सजावटीच्या वस्तू, रंगमंचावरील नेपथ्य, चित्रपट आणि दूरदर्शनवरील कार्यक्रम यांसाठी आवश्यक असणारे कला दिग्दर्शन, प्रकाशन आणि मुद्रण क्षेत्रात पुस्तके, नियतकालिके, वर्तमानपत्रे यांची मांडणी, सजावट व सुलेखन, भेटकार्डे, आमंत्रणपत्रिका, वैयक्तिक लेखनसामग्री, भेटवस्तू, इत्यादी अनेक गोष्टींसाठी उपयोजित कला क्षेत्रातील जाणकारांची आवश्यकता असते.

5.स्थापत्य आणि छायाचित्रण ही क्षेत्रेही उपयोजित कला या सदराखाली येतात. सध्याच्या काळात संगणकावर तयार केलेली स्थिर आणि चलत् चित्रे, नक्षी आणि आरेखने वापरली जातात. ती सुद्धा उपयोजित कलेचाच भाग आहेत. दागदागिने, मौल्यवान धातूंच्या कलावस्तू, रंगीत नक्षीची मातीची भांडी, बांबू आणि वेताच्या वस्तू, काचेच्या कलापूर्ण वस्तू, सुंदर कापड आणि वस्त्रे इत्यादींची निर्मिती अशी ही उपयोजित कलेची अत्यंत विस्तृत यादी आहे.

अशा प्रकारे, कला क्षेत्रात व्यवसायाच्या संधींची माहिती लिहिता येईल.

# प्रकरण 5) प्रसार माध्यमे आणि इतिहास व
# प्रकरण 6) मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास

**1)** भारतातील बेंगॅल गॅझेट' हे पहिले इंग्रजी वर्तमानपत्र --------------------यांनी सुरू केले.

**अ) जेम्सॅ ऑगस्टस हिकी**

ब) सर जॉन मार्शल

क) ॲलन हयूम

ड) माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन

**2)** दुरदर्शन हे ----------------------- माध्यम आहे.

अ) दृक

ब) श्राव्य

क) **दृक–श्राव्य**

ड) मुद्रण

**3)** 6 जानेवारी हा दिवस महाराष्ट्रात ................. म्हणून साजरा केला जातो.

अ) वृत्तपत्र दिन

**ब) पत्रकार दिन**

क) मुद्रण दिन

ड) नियतकालिक दिन

**प्रकरण ६ :– मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास**

**१)** महाराष्ट्राचे आदय किर्तनकार -------------------- यांना मानतात.

अ) संत ज्ञानेश्वर

ब) संत तुकाराम

**क) संत नामदेव**

ड) संत एकनाथ

**2)** ------------- या मराठीतील पहिल्या स्त्री चित्रपट निर्मात्या होय.

अ) कमलाबाई गोखले

**ब) कमलाबाई मंगरूळकर**

क) देविकाराणी

ड) कानंददेवी

**३)** 'मराठी रंगभूमीचे जनक' म्हणून ........................ यांना ओळखले जाते.

अ) वि. ज. किर्तने

ब) दत्तोपंथ पटवर्धन

क) **विष्णुदास भावे**

ड) अण्णासाहेब किर्लोस्कर

**ब) पुढीलपैकी प्रत्येक संचातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा ( प्रत्येकी 1 गुण )**

**प्रकरण ५ : प्रसारमाध्यमे आणि इतिहास**

1) 1)प्रभाकर - आचार्य प्र. के अत्रे

2) दर्पण - बाळशास्त्री जांभेकर

3) दिनबंधू - कृष्णराव भालेकर

4) केसरी - बाळ गंगाधर टिळक

**उत्तर : - चुकीची जोडी : प्रभाकर - आचार्य प्र. के अत्रे**

2) 1) साप्ताहिक – सात दिवस

2) पाक्षिक - पंधरा दिवस

3) मासिक – एक महिना

4) त्रैमासिक – दोन महिने

**उत्तर :- चुकीची जोडी : त्रैमासिक – दोन महिने**

**प्रकरण ६ :– मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास**

1) 1) थोरले माधवराव पेशवे - वि. ज. किर्तने

2) संगित शाकुंतल - अण्णासाहेब किर्लोस्कर

3) संगित शारदा - श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

4) संगित मानापमान – कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

**उत्तर:- चुकीची जोडी : संगित शारदा - श्रीपाद कृष्ण कोल्हटकर**

2) 1) **मराठी रंगभूमीवर आलेले पहिले नाटक** – सीता स्वयंवर

2) मुद्रीत स्वरूपात सहिता उपलब्ध असलेले पहिले नाटक – थोरले माधवराव पेशवे

3) रूपकात्मक नाटक – उदयाचा संसार

4) शेक्सपियरच्या 'किंग लिअर' नाटकावर – नटसम्राट बेतलेले मराठी नाटक

**प्रश्न क्र. 2 (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ( प्रत्येकी 2 गुण )

**1) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**


**प्रकरण ५ : प्रसारमाध्यमे आणि इतिहास**

आकाशवाणी

वृत्तपत्रे व नियतकालिके | **भारतातील प्रसार माध्यमे** | वेब पत्रकारीता

दुरदर्शन


2)





2) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.

प्रकरण ६ :– मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास

1) प्रश्न – उत्तर




2)




**ब) थोडक्यात टिपा लिहा.** (प्रत्येकी 2 गुण)

प्रकरण ५ : प्रसारमाध्यमे आणि इतिहास

**1) वर्तमानपत्राचे स्वातंत्र्या संग्रामातील कार्य -**

**उत्तर:**

1) स्वातंत्र्य काळात वृत्तपत्रे हे लोकांमध्ये माहिती आणि ज्ञान पोहचण्याचे पहिले माध्यम बनले.

2) याने लोकांमध्ये सामाजिक आणि राष्ट्रीय प्रबोधन घडून आणले आणि जुलमी ब्रिटीश राजवटी विरूदध त्यांना संगटीत केले.

3) सामाजिक धार्मिक व राजकीय चळवळीना पाठींबा देऊन साम्राज्यवादी धोरणांना विरोध केला.

4) तत्कालीन सामाजिक आणि राजकीय प्रश्नांना वाचा फोडली, त्याचबरोबर समाजसुधारक नेते व संघटना यांचे विचार लोकांपर्यंत पोहचवले.

**2) प्रसार माध्यमांची आवश्यकता –**

**उत्तर:**

1) प्रसार माध्यमामुळे जग अधिक जवळ आलेले आहे. कारण त्यामुळे माहिती **क्षणार्धात** जगाच्या एका टोकापासून दुस—या टोकापर्यंत पोहचते.

2) प्रसार माध्यमामुळे लोकांना घटना प्रत्यक्ष पाहायला मिळतात. अध्यावत ज्ञानाचा प्रसार होतो.

3) प्रसार माध्यमाव्दारे मनोरंजन होते. त्याचप्रमाणे शैक्षणिक व्यावसायिक प्रगतीसाठी आवश्यक असलेली माहिती ग्रामिण व दुर्गम भागापर्यंत पोहचविली जाते.

4) प्रसार माध्यमामुळे लोकशाही अधिक सुदृढ होण्यास मदत होते.

**प्रकरण ६ :— मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास**

**१) मनोरंजनाची आवश्यकता -**

**उत्तर :—**

1)मनोरंजन हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. म्हणुनच प्रत्येक मानवाला मनोरंजन**ची** आवश्यकता असते. **व्यक्तीच्या** निकोप वाढीसाठी निखळ मनोरंजन **महत्त्वाचे** असते.

2) चाकोरीबदध जगण्याचा कंटाळा दुर करून मनाला **चौतन्य** व उत्साह येण्यासाठी मनोरंजन आवश्यक असते.

3) मनोरंजन मनाला उत्साह व कार्यशक्ती मिळवून देण्याचे काम करते. मनोरंजनातून छंद वाढीस लागतात व त्यातून व्यक्तिमत्वाचा विकास होतो.

4) मनोरंजनाला विरंगुळा मिळतो व मनावरील ताण हलके होतात.

**2) मराठी रंगभुमी -**

**उत्तर :—**

1) **व्यक्तीने** किंवा समुदायाने ललितकला सादर करण्याचे स्थान म्हणजे रंगभुमी होय.

१९ व्या शतकाच्या मधात मराठी रंगभुमीचा उदय झाला. विष्णुदास भावे हे मराठी रंगभुमीचे जनक होत.

२) सुरूवातीच्या काळात ऐतिहासिक, पौराणिक नाटकाबरोबर प्रहसने रंगभुमीवर आली. या नाटकाचा लिखीत सहिता नसे

३) थोरले माधवराव पेशवे या नाटकांमुळे संपुर्ण **लिखित** सहिता असलेली नाटय परंपरा सुरू झाली.

४) मराठी रंगभुमीच्या काळात आचार्य अत्रे यांच्या नाटकांनी रंगभुमीला सावरले. वि.वा. शिरवाडकर, विजय तेंडुलकर, वसंत कानेटकर, अशा लेखकाने मराठी रंगभुमीला समृध्द केले.

**प्रश्न क्र. 3) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.** ( प्रत्येकी 2 गुण )
**प्रकरण ५ : प्रसारमाध्यमे आणि इतिहास**

**1) प्रसारमाध्यमांव्दारे मिळणा—या माहितीचे चिकित्सक आकलण करून घ्यावे लागते.**
**उत्तर:**

1) प्रसारमाध्यमांव्दारे आपल्यासमोर येणारी माहिती वास्तवाला धरून असेलच असे नसते.

2) ही माहिती देणा—या प्रसार माध्यमांचे हेतू, सरकारी धोरण, सामाजिक परिस्थिती अश्या अनेक बाजू विचारात घेणे आवश्यक असते.

3) प्रसारमाध्यमांचे पुर्व ग्रह, **दृष्टिकोन** हेही त्या माहितीत दडलेले असतात.

4) जर्मनीतील 'स्टर्न' साप्ताहिकाने हिटलरने लिहलेल्या रोजनिशा प्रसिध्द केल्या पुढे **ती** हस्तलिखीते बनावट असल्याचे सिध्द झाले.

म्हणुन प्रसारमाध्यमांव्दारे मिळणा—या माहितींचे **चिकित्सक** आकलन करून घ्यावे लागते.

**प्रकरण ६ :— मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास**

**1) संत एकनाथांची भारूडे लोकप्रिय झाली**

**उत्तर:**

1) या भारूडांच्या विषयात विविधता आणि नाटयात्म**ता** होती.

2) विनोदाच्या माध्यमातुन लोकांना शिक्षण देण्याचा उपदेश करण्याचा हा प्रकार लोकांनाही आवडला

3) ही भारूडे चालीवर गायली जात असत. त्यामुळे लोकसंगिताच्या आधारे ती गायली जात असत.

4) व्यव्हारातील साध्या उदाहरणा**तून** आणि विनोदाच्या **माध्यमातून** संत एकनाथांची **भारुडे** लोकप्रिय झाली.

**प्रश्न क्र. 4 ) दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नाची उत्तरे लिहा.**

**प्रकरण ५ : प्रसारमाध्यमे आणि इतिहास**

**आकाशवानी :—** स्वातंत्रयपूर्व कालखंडात १९२४ मध्ये 'इंडियन ब्रॉडकॉस्टींग कंपनी' या नावाने दर दिवशी कार्यक्रमाचे प्रसारण करणारे हे खासगी रेडिओ केंद्र सुरू झाले. नंतर ब्रिटिश सरकारने याच कंपनी**चे** इंडियन **स्टेट** ब्रॉडकॉस्टिंग सर्व्हिसेस असे नामकरण केले. ८ जुन १९३६ रोजी या कंपनी**चे** नामकरण 'ऑल इंडिया रेडिओ' असे झाले. भारत स्वातंत्र्य झाल्यावर **AIR** भारत सरकारच्या माहिती व प्रसारण खात्याचा एक भाग झाले. शासकीय कार्यक्रम व उपक्रमांची माहिती देणारे अधिकृत केंद्र असे याचे सुरूवातीला स्वरूप होते. ख्यातनाम कवी पंडीत नरेंद्र शर्मा यांच्या **सूचनेनुसार** 'आकाशवाणी' हे नाव **दिले** गेले. आकाशवाणी तर्फे विविध मनोरंजनपर प्रबोधनपर व **साहित्यिक** मूल्य असणारे कार्यक्रम सादर केले जातात. त्याचप्रमाणे शेतकरी कामगार,युवक आणि स्त्रिया यांच्यासाठी विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात. विविध भारती या लोकप्रिय रेडिओ **सेवेद्वारे** २४ भाषा आणि १४६ बोली भाषांमध्ये कार्यक्रम सुरू झाले.

**प्रश्न :**

**(1) I.B.C चे नामकरण काय झाले ? (1 गुण )**

**उत्तर : I.B.C म्हणजे** इंडियन ब्रॉडकॉस्टींग कंपनी खासगी रेडिओ केंद्र सुरू झाले. नंतर ब्रिटिश सरकारने याच कंपनी चे इंडियन ब्रॉडकॉस्टिंग सर्व्हिसेस असे नामकरण केले. ८ जुन १९३६ रोजी या कंपनी**चे** नामकरण 'ऑल इंडिया रेडिओ' असे झाले.

**(2) आकाशवाणी हे नाव कसे पडले . (1 गुण )**

**उत्तर :** ख्यातनाम कवी पंडीत नरेंद्र शर्मा यांच्या सुचनेनुसार आकाशवाणी हे नाव दिल्या गेले.

**(3) आकाशवाणी कोणते कार्यक्रम प्रसारित करते (2 गुण )**

**उत्तर :**

1) आकाशवाणी सुरूवातीच्या काळात सरकारी उपक्रम व कार्यक्रम यांची माहिती जनतेला अधिकृतपणे देत असे.

2) नंतरच्या काळात आकाशवाणी विविध मनोरंजनाचे आणि साहित्यिक कार्यक्रम सादर करू लागली

3) समाज प्रबोधनाचे विविध कार्यक्रम आकाशवाणी सादर करीत असते.

४) शेती, विज्ञान, अर्थकारण, संगित, साहित्य अश्या विविध क्षेत्रातील कार्यक्रम आकाशवाणी सादर करीत असते.

दशावतारी नाटके ही महाराष्ट्रातील लोकनाटयाचा एक प्रकार आहे. सुगीनंतर कोकण आणि गोवा येथे दशावतारी नाटकांचे प्रयोग होतात.दशावतारी नाटके मत्स्य,कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण बुद्ध कल्की या दहा अवतारांवर आधारित असतात. सर्वप्रथम सूत्रधार विघ्नहर्ता गणपतीला आवाहन करतो ?

दशावतारी नाटकातील पात्रांचा अभिनय, रंगभूषा, वेषभूषा, परंपरागत असते. नाटकातील बहुतेक भाग पदयमय असतो. काही संवाद पात्रे स्वयंस्फूर्तीने बोलतात. देवांसाठी लाकडी मुखवटे वापरतात. नाटकाचा शेवट हंडी फोडून दहीकाला वाटणे व आरती करणे या कृतीने होतो.

१८ व्या दशकातील श्यामजी नाईक काळे यांनी दशावतारी खेळ दाखवणारा एक फड स्थापन केला होता. तो फड घेउन ते महाराष्ट्रावर फिरत असत.

विष्णुदास भावे यांनी दशावतारी नाटयतंत्राचे संस्करण करून आपली पौराणिक नाटके सादर केली.

**प्रश्न १) दशावतारी नाटके हा कोणत्या राज्यातील लोकनाटयाचा प्रकार आहे ?**

**उत्तर :** दशावतारी नाटके हा महाराष्ट्र या राज्यातील लोकनाटयाचा प्रकार आहे.

**प्रश्न २) दशावतारी नाटकाचा सुरूवातीला सुत्रधार कोणाला आवाहन करतो ?**

**उत्तर :** दशावतारी नाटकाचा सुरूवातीला सुत्रधार विघ्नहर्त्या गणपतीला आवाहन करतो.

**प्रश्न ३) दशावतारी नाटकांच्या सादरीकरणाचे स्वरूप स्पष्ट करा**

**उत्तर :**

१) दशावतारी हे नाटक विष्णुच्या १० अवतारावार आधारित असते. पात्रांचा अभिनय, रंगभूषा, वेषभूषा यांच्या सह्याने नाटके सादर केली जातात.

२) देवांसाठी लाकडी मुखवटे वापरतात नाटकांची सुरूवात विघ्नहर्त्या गणपतीच्या आवाहनाने होते. नाटकांचा शेवट हंडी फोडून दहीकाला वाटणे व आरती करणे या कृतीने होतो.

३) नाटकातील बहुतेक भाग पदयमय असुन काही संवाद पात्रे स्वयंस्फुतीने बोलतात.

४) दशावतारी नाटके हा महाराष्ट्रातील लोकनाटयाचा प्रकार आहे.

**प्रश्न क्र 5) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. ( प्रत्येकी 3 गुण )**

**प्रकरण ५ : प्रसारमाध्यमे आणि इतिहास**

1) **वृत्तपत्रे सुरू होण्याआधीच्या काळात बातम्या लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी जगभर कोणते मार्ग अवलंब जात असत.**

**उत्तर :**

1) इजिप्त मध्ये सरकारी आदेशांचे कोरीव लेख सार्वजनिक ठिकाणी लावून ठेवले जात असत.

2) प्राचिन रोमन साम्राज्यात देशातील महत्त्वाच्या घटना सरकारी हुकूम कागदावर लिहून ते कागद प्रांतोप्रांती वाटत असत.

3) चिनमध्ये सातव्या शतकात सरकारी निवेदने सार्वजनिक ठिकाणी लावली जात असत.

4) इंग्लंड मधील लढायांची किंवा महत्वांच्या घटनांची पत्रके प्रवासी फिरस्ते, व अन्य लोकांना वाटत असत.

अश्या रितीने विविध देशातील राज्यात राजांचे राज्यभरातील प्रतिनिधी राजांचे आदेश जनतेपर्यंत व राज्यातील महत्वांच्या बातम्या राजांपर्यंत पोहचत असत.

**प्रकरण ६ :– मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास**

**1) भारतीय चित्रपट सृष्टीची जननी अशी महाराष्ट्राची ख्याती का आहे ?**

**उत्तर:**

1) भारतात चलचित्रपटाचा प्रारंभ महादेव गोपाळ पटवर्धन कुटूंबीयानी १८८५ मध्ये केली.

2) १८९९ मध्ये हरिचंद्र सखाराम भाटवडेकर यांनी भारतातील पहिला लघुपट तयार करून तो मुंबई आझाद मैदानावर दाखविला.

3) दादासाहेब तोरणे, करंदीकर, पाटणकर, व दिवेकर यांनी परदेशी तंत्रज्ञानाची मदत घेवून 'पुंडलिक' हा कथापट मुंबईत १९१२ मध्ये दाखविला.

४) दादासाहेब फाळके यांनी १९१३ मध्ये संपूर्ण भारतीय तंत्रज्ञान वापरून स्वत: दिग्दर्शित केलेला 'राजा हरिचंद्र' हा पहिला भारतीय चित्रपट मुंबई येथे प्रसिध्द केला.

अशा रितीने भारताला पुर्व लांबीचा चित्रपट तयार करून प्रदर्शित करण्याचा मान महाराष्ट्राकडे जातो. म्हणुन भारतीय चित्रपट सृष्टीची जननी अशी महाराष्ट्राची ख्याती आहे.

# पाठ 7) – खेळ आणि इतिहास

**प्रश्न क्र. 1 (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** ( प्रत्येकी 1 गुण )

**1)** ऑलिंपिक स्पर्धांची परंपरा --------------------- येथे सुरू झाली.

**अ) ग्रीस**

ब) रोम

क) भारत

ड) चीन

**2)** महाराष्ट्रात तयार होणाऱ्या लाकडी बाहुलीला ----------------------- असे म्हणत.

**अ) ठकी**

ब) काली चंडिका

क) गंगावती

ड) चंपावती

**3)** खेळ ही माणसाची --------------------- प्रवृत्ती आहे.

अ) कृत्रिम

**ब) नैसर्गिक**

क) सांघिक

ड) निकोप

**4)** कुस्तीसाठी पूरक असा ------------------ व त्यातील पकडी यांची निर्मिती उत्तर पेशवाईत बाळभट्ट देवधर यांनी केली.

अ) कबड्डी

ब) आट्यापाट्या

क) लंगडी

**ड) मल्लखांब**

**5)** मनोरंजन व शारीरिक व्यायाम यांसाठी केली जाणारी कोणतीही कृती म्हणजे '-------------------' होय.

अ) प्रयोग

ब) प्रवृत्ती

**क) खेळ**

ड) स्पर्धा

**6)** ---------------------- यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हणतात.

**अ) मेजर ध्यानचंद**

ब) मिल्खा सिंग

क) कपिल देव

ड) खाशाबा जाधव

**7)** क्रिकेटमध्ये अनेक विक्रम करणाऱ्या सचिन तेंडुलकर यांना भारत सरकारने '------------------' हा पुरस्कार देऊन त्यांच्या कामगिरीचा गौरव केला.

अ) पद्मश्री

ब) खेलरत्न

**क) भारतरत्न**

ड) अर्जुन

**8)** भारताचा ------------------ हा राष्ट्रीय खेळ आहे.

**अ) हॉकी**

ब) क्रिकेट

क) फुटबॉल

ड) कबड्डी

**9)** मारुती माने हे नाव --------------------- खेळाशी निगडित आहे.

अ) हॉकी

ब) कबड्डी

क) मॅरेथॉन

**ड) कुस्ती**

**10)** ' ------------- या प्राचीन संस्कृत ग्रंथात अनेक मनोरंजक खेळ व खेळण्यांचे वर्णन आलेले आहे.

अ) पंचतंत्र

**ब) कथासरित्सागर**

क) मृच्छकटिक

ड) हितोपदेश

**11)** ऑलम्पिक मध्ये मुष्टीयोद्धा स्पर्धेत कास्यपदक मिळवणारी ------ ही पहिली भारतीय महिला होय.

अ) पी. व्ही. सिंधु.

**ब) मेरी कोम**

क) फोगट

ड) सायना नेहवाल

**12)** विष्णू भट गोडसे यांनी लिहिलेल्या माझा प्रवास या पुस्तकात दिलेल्या -------------------- यांच्या दिनचर्येत खेळांना फार महत्त्व होते.

अ) तात्या टोपे

**ब) झाशीची राणी लक्ष्मीबाई**

क) बहादुरशहा जफर

ड) नानासाहेब पेशवे

**13)** 'हॉकीचे जादूगार' असे म्हटले जाणारे मेजर ध्यानचंद यांना त्यांच्या हॉकीतील कामगिरीबद्दल 1956 मध्ये ' ----------------------------- ' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अ) पद्मश्री

**ब) पद्मभूषण**

क) पद्मविभूषण

ड) भारतरत्न

**ब) पुढीलपैकी प्रत्येक संचातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.** ( प्रत्येकी 1 गुण )

**1)** 1) मल्लखांब - शारीरिक कसरतीचे खेळ

2) वॉटर पोलो - पाण्यातील खेळ

3) स्केटिंग - साहसी खेळ

4) बुद्धिबळ - मैदानी खेळ

**उत्तर : - चुकीची जोडी : बुद्धिबळ - मैदानी खेळ**

**2)** 1) मल्लविद्या गुरु - बाळभट्ट देवधर

2) हॉकीचे जादूगार - मिल्खा सिंग

3) पहिल्या भारतीय महिला मुष्टीयोद्धा - मेरी कोम

4) पहिला भारतीय महिला कुस्तीगीर - फोगट भगिनी

**उत्तर :- चुकीची जोडी : हॉकीचे जादूगार - मिल्खा सिंग**

**3)** 1) सचिन तेंडुलकर - क्रिकेट

2) मेरी कोम - मुष्टी योद्धा

3) मारुती माने - हॉकी

4) फोगट भगिनी - कुस्ती

**उत्तर:- चुकीची जोडी : मारुती माने - हॉकी**

**प्रश्न क्र. 2 (अ) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ( प्रत्येकी 2 गुण )

**1) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**

खेळांच्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा

- दिव्यांगांचे ऑलिम्पिक
- क्रिकेट विश्वचषक स्पर्धा
- एशियाड गेम्स
- फुटबॉल विश्वचषक स्पर्धा

**2) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**

भारतातील खेळांसाठीच्या प्रशिक्षण संस्था

- पैलवान जुम्मादादा व माणिकराव व्यायाम शाळा - वडोदरा
- क्रीडा विद्यापीठ - पतीयाळा
- हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ - अमरावती
- स्वर्णिम गुजरात स्पोर्ट्स विद्यापीठ - गांधीनगर
- श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी - पुणे

**3) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**

प्राचीन ऑलिंपिक स्पर्धांनी हे सामने सुरू केले

- रथ व घोड्यांच्या शर्यती
- मुष्टीयुद्ध
- धावणे
- कुस्ती
- थाळीफेक

**4) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**

विदेशी मैदानी खेळ

- बॅडमिंटन
- फुटबॉल
- टेबल टेनिस
- क्रिकेट
- ( हॉकी, गोल्फ, पोलो )

**ब) थोडक्यात टिपा लिहा.** ( प्रत्येकी 2 गुण )

**1) खेळांच्या स्पर्धा -**

**उत्तर:**

1) खेळांच्या स्पर्धांना जगभर मान्यता मिळाली आहे. ऑलिंपिक, एशियाड, दिव्यांगांचे ऑलिंपिक, क्रिकेट विश्वचषक स्पर्धा, हॉकी, कुस्ती, बुद्धिबळ इत्यादी खेळांच्या स्पर्धा जागतिक पातळीवर होतात.

2) आपल्या देशात हॉकी क्रिकेट हे खेळ लोकप्रिय आहेत.

3) या विविध खेळांच्या स्थानिक, शहर, तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा होतात.

4) राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्पर्धा गाजवणाऱ्या खेळाडूस त्याच क्षेत्रात उत्तम करिअर करता येते.

**2) देशी खेळ –**

**उत्तर:**

1) ज्या खेळांचा उदय भारतात झाला आणि ज्या खेळांना भारतीय परंपरा आहे. अशा खेळांना 'देशी खेळ' असे म्हणतात.

2) देशी खेळात बैठे खेळ आणि मैदानी खेळ असे दोन प्रकार आहेत. जे खेळ बसून कुठेही खेळता येतात त्यांना 'बैठे खेळ' तर जे मैदानात खेळावे लागतात त्यांना 'मैदानी खेळ' असे म्हणतात.

3) बुद्धिबळ, सारीपाट, पत्ते इत्यादी देशी बैठे खेळ आहेत. तर आट्यापाट्या, खो-खो, कबड्डी, कुस्ती वगैरे देशी मैदानी खेळ आहेत.

4) देशी खेळांचे वैशिष्ट्य म्हणजे या खेळांना जास्त किमतीचे साहित्य लागत नसल्याने हा खेळ कमी खर्चिक असतात.

**3) खेळांचे महत्त्व -**

1) मनोरंजन व शारीरिक व्यायाम यासाठी केले जाणारी कोणती कृती म्हणजे 'खेळ' होय.

2) जीवनातील व्यथा आणि चिंता विसरायला लावण्याचे सामर्थ्य खेळांमध्ये आहे.

3) मनाला विरंगुळा देणे आणि मन ताजेतवाने करण्याचे काम खेळ करतात.

4) खेळांमुळे मनोधैर्य, चिकाटी, खिलाडूपणा इत्यादी गुणांची वाढ होते.

5) सांघिक खेळ खेळल्यामुळे आपापसात सहकार्य संघ भावना वाढीस लागते आणि नेतृत्वगुणांचा विकास होतो. म्हणून खेळाला आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

**प्रश्न क्र. 3) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.** ( प्रत्येकी 2 गुण )

**1) खेळण्याद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो.**

**उत्तर:**

1) खेळण्यांमधून इतिहास आणि तंत्रज्ञानाची प्रगती यावर प्रकाश पडतो. धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा समजतात.

2) मातीचे किल्ले व त्यावर शिवकालीन देखावा उभा करण्यात येतो. त्यावरून किल्ल्यांच्या रचनेचा अभ्यास होतो.

3) मोहेंजोदडो येथील उत्खननात सापडलेल्या खेळण्यांवरून तत्कालीन पद्धती, पोशाख, खेळांचे प्रकार आणि तंत्रज्ञान यांची माहिती आपणास होते.

4) उत्खननात पॉपेई शहरात सापडलेल्या भारतीय हस्तीदंती बाहुली वरून भारत व रोम यांच्यातील प्राचीन संबंधावर प्रकाश पडतो.म्हणून खेळण्याद्वारे इतिहासावर प्रकाश पडतो.

**2) मेजर ध्यानचंद यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हटले जाते.**

**उत्तर:**

1) मेजर ध्यानचंद हे त्या वेळेच्या भारतीय हॉकी संघाचे मुख्य खेळाडू व संघनायक होते.
2) त्यांनी 1928, 1932 आणि 1926 अशा सलग तीन ओलंपिक स्पर्धात भारताचे प्रतिनिधित्व करून भारताला हॉकीचे सुवर्णपदक मिळवून दिली.
3) आपल्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये 400 च्या वर गोल केलेले आहेत.
म्हणून त्यांना हॉकीतील या कामगिरीमुळे 'हॉकीचे जादूगार' असे म्हटले जाते.

**(3) सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदलले आहे.**

**उत्तर :**

1) सध्याच्या काळामध्ये खेळांचे आंतरराष्ट्रीकरण झालेले आहे.

2) सर्व सामान्यांचे थेट प्रक्षेपण जगाच्या कानाकोपऱ्यातून एकाच वेळी होत असते. त्यामुळे हौशी खेळाडू शिकण्यासाठी तर प्रेक्षक मनोरंजनासाठी सामने पाहतात.

3) सामने पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रेक्षक वर्ग येतो. त्यामुळे कंपन्या मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करून आपल्या उत्पादनाच्या जाहिराती खेळाच्या प्रक्षेपणा दरम्यान करीत असतात.

या कारणामुळे सध्याच्या काळात खेळाचे अर्थकारण बदललेले आहे.

**प्रश्न क्र. 4 ) दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नाची उत्तरे लिहा.**

मेजर ध्यानचंद हे हॉकीचे महान खेळाडू आणि भारतीय हॉकी संघाचे संघनायक होते. त्यांच्या नेतृत्त्वाखाली 1936 साली भारतीय हॉकी संघाने बर्लिन ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्यापूर्वी 1928 आणि 1932 मध्येही भारतीय हॉकी संघाने सुवर्णपदक जिंकली होती. तेव्हा ध्यानचंद हे भारतीय संघाकडून खेळले होते. 29 ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय क्रीडा दिवस' म्हणून साजरा केला जातो. त्यांना 'हॉकीचे जादूगार' असे म्हणतात. 1956 मध्ये त्यांच्या हॉकीतील कामगिरीबद्दल त्यांना 'पद्मभूषण' या सन्मानाने विभूषित करण्यात आले.

**प्रश्न :**

**(1) 'हॉकीचे जादूगार' कोणाला म्हणतात ?** (1 गुण )

**उत्तर :**'मेजर ध्यानचंद' यांना हॉकीचे जादूगार असे म्हणतात.

**(2) भारतात मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस काय म्हणून साजरा केला जातो.** (1 गुण )

**उत्तर :**मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस हा 'राष्ट्रीय क्रीडा दिवस' म्हणून साजरा केला जातो.

**(3) मेजर ध्यानचंद यांची ऑलिंपिक स्पर्धेतील कामगिरी थोडक्यात लिहा.** ( 2 गुण )

**उत्तर :**

1) मेजर ध्यानचंद यांच्या नेतृत्वाखाली 1936  साली भारतीय संघाने ऑलिंपिक मध्ये सुवर्ण पदक जिंकले.
2) तसेच 1928 व 32 साली सुद्धा त्यांच्या नेतृत्त्वाखाली हॉकी संघाने सुवर्णपदक जिंकली.
3) हॉकीतील कामगिरीबद्दल त्यांना पद्मभूषण या सम्मानाने विभूषित करण्यात आले.

**प्रश्न क्र 5) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.** ( प्रत्येकी 3 गुण )

**1) खेळांचे महत्त्व स्पष्ट करा.**

**उत्तर :**

1) खेळाला आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. मनोरंजन व शारीरिक व्यायाम यासाठी केले जाणारी कोणती कृती म्हणजे 'खेळ' होय.

2) जीवनातील व्यथा आणि चिंता विसरायला लावण्याचे सामर्थ्य खेळांमध्ये आहे.

3) मनाला विरंगुळा देणे आणि मन ताजेतवाने करण्याचे काम खेळ करतात.

4) खेळांमुळे मनोधैर्य, चिकाटी, खिलाडूपणा इत्यादी गुणांची वाढ होते.

5) सांघिक खेळ खेळल्यामुळे आपापसात सहकार्य, संघ भावना वाढीस लागते आणि नेतृत्वगुणांचा विकास होतो.

**2) खेळातून व्यवसायिक संधी कशा प्राप्त होतात?**

**उत्तर:**

1) खेळा संबंधी लेखन करणारे लेखक व समीक्षक.

2) खेळाडूंना शिकवणारे प्रशिक्षक, मैदान तयार करणारे तज्ञ, पंच इत्यादी.

3) खेड्यांचे चित्रीकरण करणारे कॅमेरामन व त्यांचे सहाय्यक आणि संगणक तज्ञ.

4) आकाशवाणी, दूरदर्शन व विविध वृत्तवाहिन्यांवरून खेळांचे समालोचन करणारे समालोचक.

**3) मैदानी खेळ व बैठे खेळ याच्यांतील फरक स्पष्ट करा.**

**उत्तर :**

**मैदानी खेळ :**

1) मैदानी खेळ हे मैदानात प्रत्यक्ष जाऊन खेळायचे असतात.
2) मैदानी खेळांसाठी कसरत व कौशल्याची अधिक गरज असते.
3) मैदानी खेळांना शारीरिक क्षमतेची शक्तीची गरज असते.
4) मैदानी खेळात रोमांच असतो आनंदही अधिक मिळतो.
5) शक्ती अधिक खर्च झाल्याने या खेळात थकवा लवकर येतो.
6) मैदानी खेळात शारीरिक कौशल्याची गरज असल्याने प्रशिक्षणाची सरावाची गरज असते.
7) मैदानी खेळांमध्ये कबड्डी हॉकी खो-खो क्रिकेट अशा देशी-विदेशी खेळांचा समावेश होतो .
8) बहुतेक सर्व मैदानी खेळांच्या स्थानिक व आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित केला जातात.

**बैठे खेळ**

1) बैठखेळ  बसून खेळावे लागतात. ते घरात किंवा मोकळ्या जागेत पारावर कुठे ही खेळता येतात.
2) बैठे खेळांना तुलनेने कमी कसरतीची व कौशल्याची गरज असते.
3) या खेळांना शारीरिक क्षमतेची व शक्तीची गरज नसते.
4) बैठक खेळांत तितका रोमांच नसल्याने आनंद कमी मिळतो.
5) शक्तीची गरज नसल्याने या खेळांमध्ये थकवा लवकर येत नाही .
6) बैठे खेळांना शारीरिक कौशल्याची गरज नसल्याने प्रशिक्षण व सरावाची तितकीशी गरज नसते.

7) बैठ्या खेळात कॅरम, बुद्धिबळ, सारीपाठ, पत्ते इत्यादी खेळांचा समावेश होतो.

8) कॅरम, बुद्धिबळ या सारख्या मोजक्याच बैठे खेळांच्या स्पर्धा सोडल्यास अन्य बैठे खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या जात नाही.

# प्रकरण 8) पर्यटन आणि विकास

**प्र.१ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) कुकने----- विकण्याचा एजन्सी व्यवसाय सुरू केला.

अ)हस्तकौशल्याच्या वस्तू

ब )खेळणी

क )खाद्यपदार्थ

ड )पर्यटन तिकिटे

२) महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित असणाऱ्या किल्ल्यांवर दुर्ग अभ्यासक----- हे दुर्गभ्रमण यात्रा आयोजित करीत असत.

अ ) ना. स. इनामदार.

ब )रणजीत देसाई

क) विष्णू भट गोडसे

ड )गोपाळ निळकंठ दांडेकर

३ ) चारधाम , बारा ज्योतिर्लिंगे यामधील बहुसंख्य ठिकाणी लोकांची सोय व्हावी म्हणून----------- यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली.

अ )राणी लक्ष्मीबाई

ब ) पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

क) नानासाहेब पेशवे

ड) विष्णू भट गोडसे

४) शेतीच्या क्षेत्रात अभिनव प्रयोगाद्वारे नवीन तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या देशांमध्ये---------- हे नाव आघाडीवर आहे.

अ) इजिप्त

ब) जॉर्डन

क) इजराइल

ड) इटली

5 ) पर्यटन हा सर्वाधिक----------- निर्माण करणारा उद्योग होऊ शकतो.

अ) आनंद

ब)रोजगार

क) आत्मविश्वास

ड) नाविन्यपूर्ण प्रयोग.

**प्र.२ टिपा लिहा.**

१) पर्यटन  २) कृषी पर्यटन

प्र.३ **पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

१) आजच्या काळात परदेशात जाण्याचे प्रमाण वाढत आहे.

२) पर्यटन स्थळे ही काही लोकांच्या उपजीविकेची साधने ठरतात.

**प्र ४ पुढील प्रश्नांची पंचवीस ते तीस शब्दात उत्तरे लिहा.**

१) आपल्या परिसरात पर्यटनाच्या दृष्टीने कसा विकास कराल ?

२) महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळे कोणती ते लिहा.

**प्र.५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा**

१ ) पर्यटनाशी संबंधित व्यावसायिक क्षेत्रे स्पष्ट करा.

२) वाढत्या पर्यटनाचे होणारे फायदे स्पष्ट करा.

**प्र.६ पुढील उतारा वाचून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

महाबळेश्वर येथून जवळच असलेले भिलार हे निसर्गरम्य आणि स्ट्रॉबेरीचा गोडवा असलेले गाव. या पुस्तकाच्या गावामध्ये अनेक घरात पर्यटकांसाठीच पुस्तके आहेत. वाचन चळवळ वाढावी, मराठी भाषेतील नवे- जुने लेखक, संत साहित्य, कथा, कादंबरी, कविता, ललित, चरित्रे-आत्मचरित्रे, स्त्री साहित्य , क्रीडा, बाल साहित्य यांच्या फुललेल्या बहारदार विश्वात तुम्ही वाचन आनंद घ्यावा यासाठी महाराष्ट्र शासनाने हा प्रकल्प राबवला आहे.

आपण पर्यटनासाठी महाबळेश्वरला गेला तर भिलार गावाला म्हणजेच पुस्तकाच्या गावाला अवश्य भेट द्या.

प्र.१) भिलार गावाची वैशिष्ट्ये लिहा .

२) पुस्तकांच्या गावात कोणकोणत्या प्रकारची पुस्तके आहेत ?

३) भिलार गावाला पुस्तकांचे गाव असे का म्हटले जाते?

***उत्तर पत्रिका***

**प्र.१**

१)पर्यटन तिकिटे

२) गोपाळ निळकंठ दांडेकर

३) पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

४) इस्त्राईल

५) रोजगार

**प्र.२**

१) **पर्यटन**

दूरवरच्या स्थळांना विशिष्ट हेतूने भेट देण्यासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय. आपल्या राहत्या घरापासून विविध कारणांसाठी काही काळ दूर जाणे म्हणजे पर्यटन होय. पर्यटन ही मानवाची सहज प्रवृत्ती आहे .

पर्यटनाची परंपरा प्राचीन काळापासून चालू आहे. पर्यटनाचे हेतू व स्वरूप मात्र काळाप्रमाणे व गरजेप्रमाणे बदलत जातात. आधुनिक काळात वाहतुकीच्या सुविधांमुळे पर्यटन सोपे व गतिमान झाले आहे. विसाव्या शतकात तर पर्यटनाकडे आधुनिक उद्योग म्हणूनच पाहिले जाते. स्थानिक पर्यटन ते आंतरराष्ट्रीय पर्यटन असा पर्यटनाचा विस्तार होत जातो. वाढत्या पर्यटनाचा देशाला फायदाच होतो.

२) **कृषी पर्यटन**

शेती आणि शेतीशी संबंधित उपक्रम पाहण्यासाठी केलेला प्रवास म्हणजे कृषी पर्यटन होय. अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणात कृषी संशोधने चालू आहेत त्यासाठी भारतभर कृषी संशोधन केंद्रे आणि कृषी विद्यापीठे स्थापन झालेली आहेत. कोणत्या पिकांना कोणती माती योग्य, तिचा दर्जा, गांडूळ शेती, शेततळी, फळबागा इत्यादी उपक्रम काही भागात घेतले जातात. सिक्कीम सारखे राज्य सेंद्रिय उत्पादन राज्य म्हणून घोषित झाले आहे. प्रवासाचे प्रमाण कमी असूनही इजराइल सारख्या देशाने शेतीच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली हे सर्व अभिनव प्रकल्प व उपक्रम तसेच शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माहितीसाठी शेतकरी, विद्यार्थी, शहरी लोक जात असतात. परदेशी लोकही येतात यामुळे आज कृषी पर्यटन झपाट्याने वाढत आहे.

**प्र.३**

१)  १)जहाज, रेल्वे आणि विमान या वाहतूक क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय पर्यटन सोपे झाले आहे.

२) विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती व आर्थिक उदारीकरण यामुळे जग अधिक जवळ आले आहे.

३) अभ्यास, व्यवसाय, चित्रपटांचे चित्रीकरण यासारख्या विविध कारणांनी लोक परदेशात जातात.

४) खेळ, आंतरराष्ट्रीय परिषदा, संमेलने, ऐतिहासिक- धार्मिक स्थळे पाहणे या उद्देशानेही लोक जगभर हिंडत असतात त्यामुळे आजच्या काळात लोकांचे परदेशात जाण्याचे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढत आहे.

२) ऐतिहासिक, धार्मिक, निसर्गरम्य अशा ठिकाणांना पर्यटक भेटी देतात या पर्यटकांच्या गरजातून विविध रोजगारांची निर्मिती होते त्या स्थळांची माहिती सांगण्यासाठी मार्गदर्शक हवे असतात.

२) वैशिष्ट्यपूर्ण फोटो, स्थानिक पोशाखातील फोटो काढून घेण्यासाठी फोटोग्राफर, कपडे वाले हवे असतात.

३) घोडागाडी, रिक्षावाले अशा वाहतुकीचे व्यवसाय निर्माण होतात.

४) पर्यटक वस्तूंची खरेदी करतात त्यामुळे हस्तोद्योग, कुटीर उद्योगांना चालना मिळते. हॉटेल व्यवसाय बहरतो थोडक्यात पर्यटन स्थळे तेथील स्थानिक लोकांच्या उपजीविकेची साधने बनतात.

**प्र.४**

१) आपला परिसर कसा आहे हे विचारात घेऊन त्याचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करायला हवा त्या दृष्टीने पुढील बाबी करायला हव्यात.

१) परिसरातील ऐतिहासिक वास्तू आणि मंदिरे जतन केली पाहिजेत. त्यांची माहिती फलकावर लावणे, स्वच्छतेकडे लक्ष देणे या बाबी विचारात घ्याव्यात.

२) समुद्रकिनारे स्वच्छ करून पर्यटन वाढवता येईल.

३) गांडूळ प्रकल्प, शून्य कचरा प्रकल्प, सोलर वीज प्रकल्प, जैविक शेती असे विविध प्रकल्प राबवल्यास ते पाहण्यासाठी पर्यटक येतील.

४) परिसरातील कला, संस्कृती हस्तोद्योग, कुटिरोद्योग यांना चालना दिल्यास हे उद्योग पाहण्यासाठी, खरेदीसाठी पर्यटक येतील. आपल्या परिसराचा औद्योगिक, भौगोलिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकास केल्यास पर्यटन निश्चितच वाढेल असे वाटते.

२) महाराष्ट्रात पुढील प्रमाणे पर्यटन स्थळे आहेत.

१) लेणी - अजिंठा, वेरूळ, घारापुरी, कारले, भाजे इत्यादी.

२) प्रार्थना स्थळे - पंढरपूर, शिर्डी, शेगाव, कोल्हापूर, तुळजापूर, पैठण, आळंदी, जेजुरी, नांदेडचे गुरुद्वारा, मुंबईचे माउंट मेरी चर्च इत्यादी.

३) थंड हवेची ठिकाणे - पाचगणी, लोणावळा, महाबळेश्वर, माथेरान, चिखलदरा, खंडाळा

४) धरणे - कोयनानगर, जायकवाडी, भाटघर ,भंडारदरा

५) अभयारण्य - ताडोबा, दाजीपूर, सागरेश्वर

६) नैसर्गिक- जागतिक वारसास्थळात समाविष्ट झालेले पश्चिम घाटातील कास पठार.

**प्र.५**

१) पर्यटनाशी संबंधित अशी पुढील व्यवसायिक क्षेत्रे आहेत.

१) पर्यटकांच्या राहण्यासाठी असणारी निवासस्थाने (लॉजेस) चालवणे, ती बांधण्यासाठी संबंधित असणारे उद्योग.

२) खाद्यपदार्थांची दुकाने, हॉटेल्स, खानावळी इत्यादी उद्योग.

३) हस्तोद्योग व कुटिरोद्योग आणि त्यांच्या विक्रीची दुकाने.

४) हॉटेलशी संबंधित दूध, भाज्या, किराणा इत्यादी शेती व पशु उद्योग

५)पर्यटकांच्या वाहतुकीसाठी असणारे बस, रिक्षा, टॅक्सी आदी उद्योग.

६) प्रवासी एजंट्स, फोटोग्राफर मार्गदर्शक (गाईड्स), ठिकाणांची माहिती छापणारे मुद्रक इत्यादी व्यवसायही पर्यटनाशी संबंधित असतात.

२) पर्यटनाचे वैयक्तिक आणि देशालाही पुढील फायदे होतात.

१) पर्यटनामुळे स्थानिक रोजगार वाढतात.

२) नव्या बाजारपेठा निर्माण होऊन पर्यटन स्थळांचा विकास होतो.

३) नव्या वसाहती निर्माण होतात व खेड्यांचे पुनरुज्जीवन होते.

४) जागतिक पर्यटन वाढून देशाला परकीय चलन मिळते.

५) हस्तोद्योग, कुटीरोद्योग वाढीस लागून लोकांचे राहणीमान सुधारते.

६) विविध स्थळे, निसर्ग, संस्था यांना भेटी देऊन माहिती मिळते, ज्ञान मिळते, माणसे बहुश्रुत होतात.

७) विविध प्रकारचे लोक, भिन्न भाषिक व भिन्न संस्कृतीचे लोक एकत्र येतात. त्यातून सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढीस लागते.

८) ऐतिहासिक स्थळे पाहून आपल्या वैभवशाली इतिहासाचे दर्शन होते. चांगल्या भविष्याची प्रेरणा मिळते.

९) पूर्वजांचा हा सांस्कृतिक वारसा व ठेवा आपण जपला पाहिजे याची जाणीव होते.

१०) पर्यटनातून वैयक्तिक आणि सांघिक स्वरूपाचा आनंद, ज्ञान व अनुभव मिळतो.

**प्र.६**

१) निसर्गरम्य गाव व स्ट्रॉबेरी चे मोठ्या प्रमाणात उत्पादन.

२) भिलार येथे गावकऱ्यांच्या घरी ठेवलेल्या पुस्तकात संत वांडमय, बाल साहित्य, कथा, कादंबरी, कविता, आत्मचरित्रे, स्त्री साहित्य व क्रीडा साहित्य अशा सर्व प्रकारच्या पुस्तकांचा समावेश आहे.

३) भिलार गावातील अनेक घरांमध्ये पर्यटकांना वाचता यावीत यासाठी पुस्तके ठेवण्यात आली आहेत. या पुस्तकांच्या वाचनाचा आनंद पर्यटकांना घेता येतो. महाराष्ट्र शासनाने वाचकांना आनंद मिळावा म्हणून व वाचकांच्या सोयीसाठी ही पुस्तके अनेक लोकांच्या घरी ठेवलेली आहेत म्हणून भिलार गावाला पुस्तकांचे गाव असे म्हटले आहे.

# पाठ 9) ऐतिहासिक ठेव्यांचे जतन

प्रश्न १. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा. 3

१) भारतातील पहिले संग्रहालय ------------------- मध्ये स्थापन झाले.

अ) १८५१ **ब) १८१४** क) १८६४ ड) १८५७

२) इजिप्त ------------------मधील येथील ग्रंथालय हे जगातील सर्वात प्राचीन ग्रंथालय होते असे समजले जाते.

अ) असिरीयन **ब) अलेक्झांड्रीया** क) लूव्र ड) नॅशनल संग्रहालय

३) तामिळनाडूतील तंजावर येथे ----------------------हे ग्रंथालय आहे.

अ) नॅशनल लायब्ररी **ब) सरस्वती महाल ग्रंथालय**

क) डेव्हिड ससून लायब्ररी ड) स्टेट सेन्ट्रल लायब्ररी

४) दिल्ली येथे ------------------- हे ग्रंथालय आहे.

अ) नॅशनल संग्रहालय ब) नॅशनल लायब्ररी

**क) नेहरू मेमोरियल म्युझियम अ‍ॅण्ड लायब्ररी** ड) सरस्वती महाल ग्रंथालय

५) महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री -------------------- यांनी मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने मराठी विश्वकोश निर्मितीस चालना दिली.

अ) वसंतराव नाईक ब) शरद पवार **क) यशवंतराव चव्हाण** ड) पृथ्वीराज चव्हाण

६) बारा कोटीहून अधिक वस्तू अश्मीभूत अवशेष संग्रहित असलेले 'नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी' हे संग्रहालय ------------------- या देशात आहे.

**अ) अमेरिका** ब) इंग्लंड क) फ्रान्स ड) इजिप्त

७) भारतातील पहिले सरकारी अभिलेखागार इसवी सन 1891 मध्ये ---------------------या नावाने कोलकत्ता येथे स्थापन झाले.

अ) राष्ट्रीय अभिलेखागार ब) फेडरल रेकॉर्ड ऑफ नेशन

क) अर्काईव्हज् नॅशनल **ड) इंपिरियल रेकोर्ड डिपार्टमेंट**

८) छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील --------- हा महत्त्वाचा कोश मानला जातो.

अ) भारतीय व्यवहार कोश **ब) राज्यव्यवहारकोश**

क) व्यावहारिक कोश ड) भारतीय प्राचीन चीरित्रकोश

ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखून पुन्हा लिहा.

अ)

१) भारत वर्ष चित्रकोश - सिद्धेश्वर शास्त्री चित्राव

२) मराठी विश्वकोश - रघुनाथ भास्कर गोडबोले

३) भारतीय संस्कृती कोश - पंडित महादेव शास्त्री जोशी

४) महाराष्ट्रीयन ज्ञानकोश - श्रीधर व्यंकटेश केतकर

**उत्तर - मराठी विश्वकोश - रघुनाथ भास्कर गोडबोले**


ब)

१) दिल्ली - नेहरू मेमोरियल म्युझियम अँड लायब्ररी


| | | |
|---|---|---|
| २) हैदराबाद | - | सरस्वती महाल ग्रंथालय |
| ३) मुंबई | - | लायब्ररी ऑफ एशियाटिक सोसायटी |
| ४) कलकत्ता | - | नॅशनल लायब्ररी |
| **उत्तर - हैदराबाद** | **-** | **सरस्वती महाल ग्रंथालय** |

प्रश्न २. (अ) दिलेल्या सुचनेनुसार कृती करा.(कोणतेही दोन) 4

(४) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.




उत्तर –




(2) पुढील तक्ता पूर्ण करा.

| कोशाचे नाव | कोशकार |
|---|---|
| संगीत शास्त्रकार व कलावंताचा इतिहास | ------------------------------- |
| ------------------------------------- | श. रा. दाते |
| स्वातंत्र्यसैनिक: चरित्रकोश | --------------------------------- |
| ------------------------------------------ | रघुनाथ भास्कर गोडबोले |

उत्तर -

| कोशाचे नाव | कोशकार |
|---|---|
| संगीत शास्त्रकार व कलावंताचा इतिहास | लक्ष्मण दत्तोत्रेय जोशी |
| क्रांतिकारकांचा चरित्रकोश | श. रा. दाते |

| | |
|---|---|
| स्वातंत्र्यसैनिक: चरित्रकोश | न.र. फाटक |
| भारत वर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश | रघुनाथ भास्कर गोडबोले |

**(ब) थोडक्यात टीपा लिहा.**

**१) भारतीय संस्कृती कोश-**

अ) महादेव शास्त्री यांच्या संपादकात्वाखाली भारतीय संस्कृती कोशाची निर्मिती करण्यात आली.

ब) भारतीय संस्कृतीचे एकूण दहा खंड तयार करण्यात आले आहे.

क) या कोशामध्ये असेतू हिमाचल अशा भारताचा इतिहास आणि भूगोल यांची दखल घेण्यात आली आहे.

ड) भिन्न भाषिक लोक त्यांनी घडवलेला इतिहास सण उत्सव सांस्कृतिक बाबी यांचा अंतर्भाव यात केला गेलेला आहे.

**२) मराठी विश्वकोश -**

अ) महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती' मंडळाची स्थापना करण्यात आली.

ब) तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखाली विश्वकोश निर्मितीची सुरुवात झाली.

क) मराठी भाषा व साहित्य यांच्या विकासासाठी मराठी विश्वकोश निर्मितीस चालना देणे हा त्यामागचा खरा उद्देश होता.

ड) या मराठी विश्वकोशामध्ये जगभरातील ज्ञान सार रूपाने एकत्र आणले गेलेले आहे.

इ) या मराठी विश्वकोशा इतिहास विषयाशी निगडित असणाऱ्या महत्त्वाच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहे.

**३) कोश -**

अ) शब्दांचा विविध माहितीचा व ज्ञानाचा केलेला पद्धतशीर संग्रह म्हणजे 'कोश' होय.

ब) विविध ज्ञानाचे विशिष्ट पद्धतीने केलेले संकलन आणि मांडणी म्हणजे 'कोश' होय.

क) उपलब्ध ज्ञानाचे व्यवस्थापन आणि सुलभ रीतीने त्याच्या उपलब्धतेची सोय हे त्याचे उद्दिष्ट असते.

**४) लुव्र संग्रहालय-**

अ) पॅरिस शहरातील संग्रहालयाची स्थापना इसवी. सन. आठव्या शतकात झाली आहे.

ब) फ्रेंच राजगृहातील व्यक्तींनी जमा केलेल्या कला वस्तूंची संग्रह ल संग्रहालयात प्रदर्शित केले गेले आहे.

क) जगप्रसिद्ध इटालियन चित्रकार लिओनार्दो द विंची याने रेखाटलेले मोनालिसा हे चित्रही या संग्रहालयात आहे.

ड) नेपोलियन बोनापार्टमेंट आणलेल्या स्वाऱ्याच्या दरम्यान कलेच्या वस्तू सुद्धा याच संग्रहालयात संग्रही ठेवण्यात आलेले आहे.

इ) सध्या या संग्रहालयात अश्मयुक्त आधुनिक काळातील जवळपास 3 लाख 80 हजाराहून अधिक कला वस्तू ठेवण्यात आलेल्या आहे.

**५) संग्रहालय शास्त्रातील पदवी देणाऱ्या भारतातील संस्था-**

अ) राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय दिल्ली

ब) महाराजा सयाजीराव विद्यापीठ वडोदरा

क) कोलकत्ता विद्यापीठ कोलकत्ता

ड) बनारस हिंदू विद्यापीठ वाराणसी

इ) अलिगड मुस्लिम युनिव्हर्सिटी अलीगढ

ई) जिवाजी विद्यापीठ ग्वालियर

प्रश्न ३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

१) नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्ट्री युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका हे अमेरिकेतील एक प्रसिद्ध संग्रहालय आहे.

उत्तर - अ) अमेरिकेतील स्मित सोनिया इन्स्टिट्यूशन या संस्थेच्या व्यवस्थापनाखाली नॅशनल म्युझियम ऑफ नॅशनल हिस्टरी युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका हे संग्रहालय स्थापन करण्यात आले आहे.

ब) हे संग्रहालय इसवी सन 1846 मध्ये सुरू करण्यात आले आहे.

क) या संग्रहालयात वनस्पती प्राणी यांचे अवशेष आणि जीवाश्मक जिने दगड मानवी प्रजातीचे अश्मभूत अवशेष आणि पुरावस्तू यांचे संग्रहित केलेले आहेत

क) येथे जवळपास बारा कोटीहून अजून नमुने संग्रहित आहे.

२) प्रत्येक समाजातील भाषिक कोशवाङ्मय निर्माण होण्याची गरज असते.

उत्तर - अ) वाचकापर्यंत ज्ञान पोहोचून त्यांच्या जिज्ञासापुरती निर्माण करण्याचं काम कशामुळे केले जाते.

ब) कशामुळे ज्ञान माहिती व संदर्भ सहज आणि सोप्या पद्धतीने वाचकांना मिळत असल्याने त्याचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळते.

क) कोश वांग्मय हे राष्ट्राच्या सांस्कृतिक बौद्धिक प्रगतीचे प्रतीक असते. म्हणूनच समाजाचा बौद्धिक स्तर उच्च करण्यासाठी कोश वाङ्मयाची गरज असते.

३) कोणत्याही कोशाला इतिहासाची जोड देणे आवश्यक असते.

उत्तर - अ) इतिहास विषयात आणि कोशात वस्तुनिष्ठतेला अत्यंत महत्त्व असते.

ब) वस्तुनिष्ठता हे कोश आणि इतिहास यातील समान धागा आहे.

क) स्वराज्याची ध्येय धोरणे जीवनमूल्ये आदर्श यांचा प्रभाव कोशावर पडलेला असतो

**प्रश्न ४. दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

इतिहास या विषयातील कोश परंपरा समृद्ध आहे रघुनाथराव भास्कर गोडबोले यांचा भारत वर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश हा आद्यकोष होय भारत वर्षीय प्राचीन ऐतिहासिक खुशाल प्राचीन काळातील भारतीय व्यक्ती आणि स्थळे यांचा अंतर्भाव आहे या कोषात भारत वर्षात पूर्वी आपणामध्ये जे जे प्रख्यात लोक होऊन गेले त्यांचा त्यांच्या स्त्रिया त्यांचे पुत्र त्यांचा धर्म त्यांचे देश व राजधान्या तसेच त्या देशातील नद्या व पर्वत इत्यादीकासहित जो इतिहास तो यात दिला आहे.

श्रीधर व्यंकटेश केतकर यांचे महाराष्ट्रीयन ज्ञानकोश चे 23 खंड आहेत मराठी माणसांना बहुश्रुत करावे त्यांच्या ज्ञानाची कक्षा विस्तारावी त्यांच्या विचाराचे क्षेत्र अधिक व्यापक व्हावे आणि जगातील प्रगत लोकांच्या बरोबरीने त्यांनी प्रगल्भ व्हावे ही शेतकऱ्यांची ज्ञानकोश रचने मागील भूमिका होती या खंडामध्ये त्यांनी व्यापक इतिहासाची मांडणी केली आहे.

या पुढचा महत्त्वाचा कोश म्हणजे भारत वर्षीय चित्रकोश होय सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी भारतीय चित्रकोश मंडळाची स्थापना करून तिच्यातर्फे भारत वर्षीय प्राचीन चित्रकोष भारत वर्षीय मध्ययुगीन चित्रकोश भारत वर्षीय आरवाचे चित्रकोश असे तीन चित्रकोश संपादून प्रसिद्ध केले या कोषांची कल्पना यावी म्हणून प्राचीन चित्र कोशातील नोंदी बघता येतील या कोशात श्रुती स्मृती सूत्रे वेदांगे उपनिषदे पुराणे तसेच जैन व बौद्ध साहित्यातील निर्देशित व्यक्तींची माहिती देण्यात आली आहे.

१) इतिहास विषयातील भारतातील आद्य कोश कोणता आहे?

उत्तर - इतिहास विषयातील भारतातील भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश हा आद्यकोष होय.

२) 'भारतीय चित्रकोश मंडळा' ची स्थापना कोणी केली?

उत्तर - सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी भारतीय चित्रकोश मंडळाची स्थापना केली.

३) शेतकऱ्यांच्या ज्ञानकोश रचने मागील भूमिका स्पष्ट करा.

उत्तर - मराठी माणसांना बहिष्कृत करावे त्यांच्या ज्ञानाची कक्षा विस्तारावी त्यांच्या विचारांचे क्षेत्र अधिक व्यापक व्हावे आणि जगातील प्रगत लोकांच्या बरोबरीने त्यांनी प्रगल्भ व्हावे ही शेतकऱ्यांच्या ज्ञानकोश रचने मागील भूमिका होते

**प्रश्न ५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) लिखित साधनांचा अभ्यास करणाऱ्यांनी कोणते प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता असते?

उत्तर- लिखित साधनांचा अभ्यास करत असताना खालील प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे.

अ) मोडी ब्राह्मणी पार्शियल यासारख्या लिपी आणि त्याच्या विकासाच्या क्रमाचे ज्ञान.

ब) इतिहासकालीन समाज रचना आणि परंपरा साहित्य आणि संस्कृती राजसत्ता शासन व्यवस्था इत्यादींचे प्राथमिक ज्ञान.

क) विविध चित्रशैली शिल्पकला शैली आणि त्याचा विकासाचा क्रम याचे ज्ञान.
ड) कागदाचे प्रकार शाई आणि रंग यांचे ज्ञान.
इ) कोरीव लेखांसाठी वापरलेला दगड धातू यांच्या स्वरूपा विषयीची माहिती.
ई) दस्तऐवजांची सफाई आणि संवर्धन करण्यासाठी आवश्यक रासायनिक प्रक्रिया साठी लागणारी उपकरणे आणि रसायने यांची माहिती.
फ) संग्रहालयाच्या जालना मधील प्रदर्शन व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञान.
ग) संशोधन पर लेखन

२) भौतिक साधनांचा अभ्यास करणाऱ्याला कोणत्या कृती कराव्या लागतात?
उत्तर - अ) पुरा वस्तूंचे संकलन कालखंड आणि प्रकार यानुसार वर्गीकरण करणे, सूची तयार करणे.
ब) पुरा वस्तूंचे संवर्धन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सफाई आणि इतर रासायनिक प्रक्रिया करणे.
क) निवडक पुरावा वस्तू किंवा त्यांच्या प्रतिकृती प्रदर्शित करणे.
ड) पुरावस्तु संबंधित संशोधन पर लेखन प्रसिद्ध करणे.
इ) वनस्पती आणि प्राणी यांचे अश्मिभूत अवशेष यांचे वर्गीकरण करणे. सूची तयार करणे.
ई) निवडक जीवाश्मक किंवा त्यांच्या प्रतिकृती प्रदर्शित करणे.

३) कोशाचे प्रकार लिहा.
उत्तर - कोशाचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.
अ) शब्दकोश - शब्दकोशात शब्दांचा संग्रह शब्दांचा अर्थ प्रतिशब्द पर्यायी शब्द शब्दांची व्युत्पत्ती दिलेली असते. शब्दकोशांचे महत्त्वाचे प्रकार म्हणजे सर्व संग्रहक विशिष्ट शब्दकोश परिभाषा कोश उत्पत्ती कोश समानार्थी किंवा विरुद्ध शब्दकोश म्हणी वाक्प्रचार संग्रह कोश इत्यादी.
ब) विश्वकोशाचे दोन भाग पडतात १) सर्वसंग्राहक उदा. एन्सायक्लोपीडिया, ब्रिटानिका, महाराष्ट्रीयन ज्ञानकोश मराठी विश्वकोश २) विशिष्ट विषय पर कोश हे एखाद्या विषयाला वाहून घेतलेले खुश असतात उदा. भारतीय संस्कृती कोश व्यायामकोश इत्यादी.
क) कोश सदृश्य वाङमय -
कोश सदृश्य वाङ्मयात एखाद्या विषयाची समग्र मांडणी केलेली असते यामध्ये एखाद्या विशिष्ट विषयावर तज्ञांकडून लेख लिहून घेऊन ग्रंथ निर्मिती करतात.
ड) सूची वाङ:मय -
ग्रंथाच्या अखेरीस दिलेली त्या ग्रंथातील व्यक्ती विषय स्थळे व ग्रंथ यांची यादी शब्द यांच्या याद्यांना सूची म्हणतात सूची सहसा आकारविल्ली असते ती त्या ग्रंथाच्या वाचनास मदत करणारी असते.

४) लिखित साधनांचा अभ्यास करणाऱ्याला कोणत्या कृती कराव्या लागतात.
उत्तर- लिखित साधनांचा अभ्यास करणाऱ्याला पुढील कृती कराव्या लागतात.
अ) ताम्रपट दरबारी दप्तरे खाजगी पत्रे आणि दैनंदिनी ऐतिहासिक ग्रंथ हस्तलिखिते चित्रे छायाचित्रे जुने ग्रंथ इत्यादी दस्तावेजांचे संकलन संपादन करणे.
ब) दस्तऐवजांच्या संवर्धनासाठी आवश्यक असणाऱ्या सफाई आणि इतर रासायनिक प्रक्रिया करणे.
क) दस्तऐवजांचे ऐतिहासिक मूल्य निश्चित करणे.
ड) निवडक दस्तऐवज प्रदर्शित करणे.
इ) संपादित साहित्य आणि संशोधनाचे निष्कर्ष प्रकाशित करणे.

# राज्यशास्त्र

## प्रकरण 1) संविधानाची वाटचाल*

**प्र.१ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१)लोकशाहीचा गाभा म्हणजे------- होय.

अ) प्रौढ मताधिकार

ब) सत्तेचे विकेंद्रीकरण

क) राखीव जागांचे धोरण

ड) न्यायालयीन निर्णय

उत्तर - सत्तेचे विकेंद्रीकरण.

२) भारतात 26 जानेवारी 1950 पासून ------------- राज्यकारभार करण्यास सुरुवात झाली.

अ) राष्ट्रपतींच्या आदेशानुसार

ब )संसदेच्या कायद्यानुसार

क) संविधानानुसार

ड) न्यायालयाच्या आदेशानुसार.

उत्तर - संविधानानुसार

३) भारतात आता ------- वर्षे पूर्ण झालेल्या सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार मिळाला आहे.

अ) 15

ब )18

क) 21

ड) 25

उत्तर - 18

**प्र.२ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

१) भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते .

उत्तर - हे विधान बरोबर आहे; कारण -

१) भारतीय संविधानाने स्वातंत्र्यपूर्व काळातील मतदानाच्या अधिकारासाठी असणारी सर्व बंधने रद्द केल्यामुळे मतदारांची संख्या वाढली आहे.

२) संविधानाने स्वीकारलेल्या प्रौढ मताधिकाराच्या तरतुदीमुळे सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे.

३) सुरुवातीस मताधिकारासाठी असणारी 21 वर्षाची अट 18 वर्षे पूर्ण अशी केल्यामुळे मताधिकार अधिक व्यापक झाला मतदारांची एवढी संख्या जगातील कोणत्याच लोकशाही देशात नाही म्हणून भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते.

२) सर्वसमावेशक लोकशाहीमुळे समाजातील संघर्ष कमी होतात.

उत्तर - हे विधान बरोबर आहे; कारण -

१) सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करणे हे लोकशाहीचे ध्येय असते.

२) कोणताही भेदभाव न करता सर्वांना विकासाची समान संधी दिल्याने सर्व सामाजिक घटक मुख्य प्रवाहात सामील होतात.

३) लोकशाहीत सर्व समाज घटकांना सामावून घेण्याची प्रक्रिया होत असल्यामुळे समाजातील संघर्ष ही कमी होतात.

**प्र.३ पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

१) माहितीचा अधिकार

उत्तर - १) शासनाने केलेल्या व्यवहारांची माहिती जनतेला मिळावी शासन आणि जनता यांच्यात सुसंवाद साधला जाऊन परस्परांविषयी विश्वास वाढावा यासाठी 2005 साली शासनाने माहितीचा अधिकार नागरिकांना दिला.

२) गोपनीयतेच्या नावाखाली शासकीय कारभारातील गैरप्रकार या अधिकारामुळे दडपले जाऊ शकत नाहीत.

३) शासनाचा कारभार पारदर्शक होण्यास आणि आपण जनतेला उत्तरदायी आहोत याची जाणीव या अधिकारामुळे शासनाला होते.

४) माहितीच्या अधिकारामुळे लोकशाही आणि नागरिकांचे अधिकार यांचे सक्षमीकरण झाले. शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी होऊन शासनाचे व्यवहार खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली.

२) सत्तेचे विकेंद्रीकरण

उत्तर - १) देशाच्या सत्तेचे अनेक प्रकारे विभाजन होणे म्हणजेच सत्तेचे विकेंद्रीकरण होय

२) हुकूमशाहीत किंवा लष्करशाहीत सत्ता एका व्यक्तीच्या किंवा गटाच्या हाती केंद्रित झालेली असते.

३) लोकशाही व्यवस्थेत मात्र सत्तेचे केंद्रशासन, राज्य शासन व स्थानिक शासन संस्था यात विभाजन होते. सत्तेचे विकेंद्रीकरण होणे हा लोकशाहीचा गाभा असतो.

४) लोकशाही विकेंद्रीकरणामुळे सत्तेच्या गैरवापर आला आळा बसतो तसेच सामान्य जनतेला सत्तेत सहभागी होण्याची अधिक संधी मिळते आणि खरीखुरी लोकशाही प्रत्यक्षात येते.

**प्र.४  थोडक्यात टिपा लिहा**

लोकसभेतील महिलांचे प्रतिनिधित्व

उत्तर-  १) संविधानकारांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरुवातीपासूनच स्त्री पुरुष समानतेचे धोरण स्वीकारून दोहोंनाही समान राजकीय अधिकार प्रदान केले.

२) त्यामुळे 1952 च्या पहिल्या लोकसभेत 22 महिला निवडून आल्या होत्या. ही संख्या वाढत जाऊन 2014 च्या निवडणुकीत ही संख्या 66 वर जाऊन पोहोचली आहे.

३) लोकसभेच्या एकूण जागेच्या 50 टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवाव्यात असे विधेयक संसदेच्या पटलावर मांडले गेले आहे.

४) स्त्रियांचे लोकसभेतील

प्रतिनिधित्व वाढल्यास स्त्रियांवरील अन्याय दूर होईल आणि देशाच्या निर्णय प्रक्रियेतील स्त्रियांचा सहभाग वाढेल.

**प्र.५ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे म्हणजे काय ?

उत्तर -  सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, म्हणजे -

१) ज्या सामाजिक बाबींमुळे, विचारांमुळे व्यक्तीवर वा काही लोकसमूहांवर अन्याय होतो त्या बाबी वा ते विचार नष्ट करणे.

२) व्यक्ती म्हणून सर्वांचा

दर्जा समान मानणे व तशी धोरणे आखणे.

३) जात, धर्म, भाषा, लिंग, वंश, जन्मस्थान, संपत्ती इत्यादींवर आधारित श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद न करता समान वागणूक देणे.

४) सर्वांना विकासाची समान संधी देणे.

२)  महिलांचे सत्तेत प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी भारतात कोणते प्रयत्न झाले?

उत्तर  -राजकारण आणि राजकीय संस्था यात सुरुवातीपासूनच महिलांचे प्रतिनिधित्व सर्वत्र कमी होते. जगभरातल्या देशांप्रमाणे भारतानेही ते वाढवण्यासाठी पुढील प्रयत्न केले.

१)73 व्या व 74 व्या घटनादुरुस्तीने स्थानिक शासन संस्थांमध्ये महिलांसाठी 33% जागा राखून ठेवल्या गेल्या.

२) महाराष्ट्रासह अन्य 15 राज्यात हे प्रमाण 50% एवढे आहे.

३) सरपंच, नगराध्यक्ष, महापौर या पदासाठी एक तृतीयांश पदे महिलांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

४) विधानसभेत व संसदेत 50 टक्के जागा राखून ठेवण्याबाबतचे विधेयक पटलावर ठेवले गेले  आहे.

# पाठ 2) निवडणूक प्रक्रिया

**प्रश्न ६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा :**

१) भारतीय संविधानाच्या -------------------या कलमान्वये निवडणूक आयोगाची निर्मिती केली गेली आहे.

अ) ३७० **ब) ३२४** क) ३५१ ड) ३०१

२) राजकीय पक्षांना मान्यता देण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार------------असतो.

अ) सरकार ब) न्यायालय **क) निवडणूक आयोग** ड) राष्ट्रपती

३) लोकसभेतील एकूण सदस्य संख्या --------------आहे.

अ) २८८ ब) २५० **क) ५४३** ड) ५००

४) वयाची -----------वर्ष पूर्ण केलेल्या प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा हक्क आहे.

**अ) १८** ब) २१ क) २५ ड) १६

५) सध्याच्या हिमाचल प्रदेश या---------------------------- राज्यातील हे भारताचे पहिले मतदार ठरले.

**अ) श्याम शरण नेगी** ब) प्रेमकुमार धुमल

क) सुकुमार सेन ड) अमर्त सेन

**प्रश्न ७. पुढील विधाने चूक की बरोबर ते सहकारण स्पष्ट करा.**

१) निवडणुकी संबंधी वाद झाल्यास ते सोन्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असते.

उत्तर - हे विधान बरोबर आहे.

अ) निवडणुकीसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास ते सोडवण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर असते.

ब) एखाद्या मतदारसंघात पुन्हा निवडणुका घेणे अथवा उमेदवाराचे अपात्रता घोषित करणे हे काम निवडणूक आयोगाचे असते.

२) निवडणूक प्रक्रियेत गोपनीयता असते.

उत्तर - हे विधान चूक आहे

अ) निवडणुका ह्या न्याय मार्गाने होऊन त्यांच्यात विश्वासहार्यता असायला पाहिजे.

ब) खुल्या वातावरणात निवडणुका झाल्या नाहीत तर निवडणूक प्रक्रियेत गैरप्रकार होतील.

क) निवडणुकीत कार्यक्षम आणि प्रामाणिक प्रति निवडून येणे गरजेचे आहे म्हणून निवडणूक प्रक्रियेत गोपनियता असू नये.

३) निवडणुका घेणे ही सरकारची जबाबदारी असते.

उत्तर - हे विधान चूक आहे.

अ) निवडणुकीचे संपूर्ण संचालन ही निवडणूक आयोगाची जबाबदारी असते.

ब) निवडणूक आयोग कोणत्या राज्यात केव्हा व किती टप्प्यात निवडणुका घेण्याचे ठरवत असते

**प्रश्न ८. (अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा (कोणतेही एक) :** **2**

१) निवडणूक आयोग

उत्तर - अ) लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी निवडणुका खुल्या वातावरणात घेण्याची यंत्रणा असणे गरजेचे असते.

ब) भारतीय संविधानाने कलम 324 अन्वये भारतीय निवडणूक आयोगाची निर्मिती केली आहे.

क) निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्यापासून निवडणुकांचे निकाल जाहीर करण्यापर्यंत निवडणुकीची सर्व प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली चालते.

२) मध्यवर्ती निवडणुका

उत्तर - अ) निवडून आलेल्या सरकार मुदत पूर्ण होण्याआधीच अल्पमतात आले असेल.

ब) अनेक घटक पक्ष मिळून सरकार स्थापन झाले असल्यास घटक पक्षांनी पाठिंबा काढून घेतल्यास सरकारचे बहुमत संपुष्टात येते.

क) परळी सरकार स्थापन करण्याची शक्यता नसेल तर अशा वेळी मुदत पूर्ण होण्याआधीच निवडणुका घ्याव्या लागतात त्या मध्यवर्ती निवडणुका असतात.

३) राजकीय पक्षाची मान्यता

उत्तर - अ) आपल्या देशात बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे.


ब) राजकीय पक्षांना मान्यता देण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला आहे.

क) लोकसभा व विधानसभेतील मतदानाची टक्केवारी आणि पक्षांच्या प्रतिनिधींची संख्या यावर पक्ष मान्यता अवलंबून असते.

ड) निवडणूक आयोग राजकीय पक्षांना निवडणूक चिन्ह देत असते.

**(ब) दिलेल्या सुचनेनुसार कृती करा**

(2) पुढील ओघतक्ता पूर्ण करा :




**प्रश्न ९ पुढील प्रश्नाचे थोडक्यात उत्तर लिहा (कोणतेही एक) :** **2**

**१) प्रतिनिधित्व म्हणजे काय?**

उत्तर - अ) आधुनिक लोकशाही ही प्रतिनिधिक लोकशाही आहे.

ब) लोकशाहीतील निर्णय प्रक्रियेत संपूर्ण जनतेला सामावून घेणे शक्य नाही.

क) जनतेने आपल्या वतीने काही न्यू लोकांना राज्यकारभार करण्यासाठी प्रतिनिधी म्हणून निवडून देण्याची पद्धत निर्माण झाली आहे.

ड) प्रतिनिधी जनतेला जबाबदार राहून जनतेच्या कल्याणाला प्राधान्य देत राज्यकारभार करणे अपेक्षित असते.

**२) लोकशाही पद्धतीत निवडणुका घेणे गरजेचे का असते?**

उत्तर - अ) लोकशाहीचे अस्तित्व हे निवडणुकींवर अवलंबून असते.

ब) राजकीय पक्षांना निवडणुकीच्या माध्यमातून काम करण्याची संधी मिळते.

क) सत्तेत बदल घडवून आणण्याची माध्यम म्हणजे निवडणुका होय.

**३) ईव्हीएम मशीनचे फायदे सांगा.**

उत्तर - १) ईव्हीएम मशीनवर दर्शवलेल्या उमेदवारांपैकी कोणालाही मत द्यायचे नसेल तर वरीलपैकी कोणी नाही हा पर्याय देता येणे मतदारांना शक्य झाले.

२) दिव्यांग व्यक्तींनाही मतदान करणे सोपे जाऊ लागले.

३) पर्यावरणाच्या रक्षणाला मदत झाली. विशेषता वृक्षतोडीला प्रतिबंध झाला.४) निवडणुकांचे निकाल लवकर लागू लागले.

**४) मतदानासाठी कोणत्या अटी निश्चित केल्या गेल्या आहे?**

उत्तर - मतदानासाठी पुढील अटीची पूर्तता करणे गरजेचे आहे.

१) मतदान करणारे व्यक्ती भारतीय नागरिक असली पाहिजे. २) त्याने वयाची 18 वर्षे पूर्ण केलेली असावी.

३) त्याने मतदार यादीत  नावाची नोंद केलेली असावी.

# पाठ 4) सामाजिक व राजकीय चळवळी

**प्रश्न क्र. 6) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** ( प्रत्येकी 1 गुण )

**1)** शेतकरी चळवळीची ----------------- ही प्रमुख मागणी आहे.

अ) वन जमिनीवर लागवड करण्याचा अधिकार मिळावा.

**ब) शेतमालाला योग्य भाव मिळावा.**

क) ग्राहकांचे संरक्षण करावे.

ड) धरणे बांधावीत.

**2)** शेतीचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होण्यासाठी -------------- करण्यात आली.

अ) जलक्रांती

**ब) हरितक्रांती**

क) औद्योगिक क्रांती

ड) धवलक्रांती

**3)** --------------- चळवळींना फार महत्त्व असते.

अ) समाजवादी व्यवस्थेत

ब) हुकूमशाहीमध्ये

**क) लोकशाहीत**

ड ) कम्युनिस्ट शासनात

**4)** हरितक्रांती ---------------- या उद्देशाने करण्यात आली.

अ) पर्यावरणाचा ऱ्हास थांबविणे

ब) जंगलांचे संरक्षण वृद्धी करणे

**क) शेतीचे उत्पादन वाढवून देश स्वावलंबी बनवणे**

ड) वृक्षतोड थांबविणे

**5)** 1899 मध्ये आपल्या मागण्यांसाठी ----------------  कामगारांनी मोठा संप केला होता.

**अ) रेल्वे**

ब) गिरणी

क) हातमाग

ड) कंत्राटी

**6)** डॉ. राजेंद्र सिंह हे 'भारताचे --------------------- ' या नावाने ओळखले जातात.

अ) पोलादी पुरुष

ब) पर्यावरण स्नेही

क) युगपुरुष

**ड) जलपुरुष**

**7)** स्वातंत्र्यपूर्व काळात ओडिशातील ------------------  या आदिवासी जमातीने ब्रिटिशांविरोधात उठाव केला.

अ) कोळी

**ब) गोंड**

क) भिल्ल

ड) मोशी

**प्रश्न क्र. 7) पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.** ( प्रत्येकी 1 गुण )

**1) 'ग्राहक चळवळ' अस्तित्वात आली.**

**उत्तर:**

हे विधान बरोबर आहे. कारण-

1) अर्थव्यवस्थेतील बदलांचा आणि बदललेल्या समाज व्यवस्थेचा ग्राहकांवर परिणाम होत असतो.

2) भेसळ वस्तूंच्या वाढलेल्या किमती, वजन मापातील फसवणूक, वस्तूंचा कमी दर्जा पण अधिक किमती इत्यादींसारख्या अनेक समस्यांना ग्राहकांना तोंड द्यावे लागते.

3) अशा फसवणुकींपासून संरक्षण करण्यासाठी 1986 साली ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. त्यामुळे ग्राहकांना त्यांच्या हक्काचे जाणीव झाली.

म्हणून ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

**2) चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते.**

**उत्तर:**

हे विधान चूक आहे. कारण -

1) कोणतीही चळवळ नेतृत्वामुळेच क्रियाशील राहते आणि चळवळीचे यश अपयश ही खंबीर नेतृत्वावरच अवलंबून असते.

2) खंबीर नेतृत्वच लोकांपर्यंत पोहोचून जनाधार मिळवू शकते व चळवळीची परिणामकारकता वाढवू शकते.

3) चळवळीचा कार्यक्रम, आंदोलनाची दिशा आणि तीव्रता केव्हा कमी-अधिक करायची याबाबत खंबीर नेतृत्वच योग्य निर्णय घेऊ शकते.

म्हणून चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज असते.

**3) लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्त्व असते.**

**उत्तर:**

हे विधान बरोबर आहे. कारण -

1 सार्वजनिक प्रश्नांच्या निराकरणासाठी एक व अनेक व्यक्ती संघटित होऊन सामूहिक आंदोलन उभे करतात

2 सामाजिक प्रश्न संदर्भातील सर्व माहिती आंदोलनातील कार्यकर्ते शासनाला देत असतात

3 शासनाच्या काही निर्णयांना अथवा धोरणांना विरोध करण्यासाठी ही चळवळी उभ्या केल्या जातात.

म्हणून लोकशाहीमध्ये चळवळींना फार महत्व असते.

**प्रश्न क्र. 8) पुढील संकल्पना स्पष्ट करा.** ( प्रत्येकी 2 गुण )

**1) आदिवासी चळवळ : -**

**उत्तर:**

1) स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी आदिवासींच्या जंगल संपत्तीवर उदरनिर्वाह करण्याच्या हक्कावर गदा आणली.

2) ओडिशातील गोंड, महाराष्ट्रातील कोळी, भिल्ल, रामोशी बिहारमधील संथाळ, मुंडा आदिवासींनी मोठ्या प्रमाणात उठाव केला.

3) वनजमिनींवरील त्यांचे हक्क वनातील उत्पादने गोळा करण्याचे व वनजमिनींवर लागवड करण्याचे त्यांचे हक्क मान्य केले जात नाहीत या मागण्यासाठी अनेक ठिकाणी आदिवासींचे आंदोलन अद्यापही चालू आहेत.

**2) कामगार चळवळ :-**

**उत्तर :**

1) 1850 नंतर भारतात कापड गिरणी, रेल्वे कंपन्या असे उद्योग सुरू झाले. औद्योगीकरणामुळे देशात कामगारांचा मोठा वर्ग निर्माण झाला.

2) पुढे त्यांच्या समस्या वाढल्या. या समस्या सोडवण्यासाठी 1920 मध्ये 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस' स्थापन होऊन कामगार चळवळी जोम धरू लागल्या.

3) स्वातंत्र्योत्तर काळातही कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी अनेक युनियन ची स्थापना झाली

4) जागतिकीकरण आणि कंत्राटी कामगार पद्धतीने कामगार चळवळीला मोठा आघात झाला आहे.

**3) भारतातील शेतकरी चळवळ :-**

**उत्तर:**

1) भारतातील शेतकरी चळवळ ही एक अत्यंत महत्त्वाची चळवळ आहे. ब्रिटिशांच्या राजवटीत वसाहती काळातील सरकारच्या शेती विरोधी धोरणामुळे शेतकरी संघटित होऊ लागले


2) शेतकरी चळवळीच्या प्रेरणा महात्मा फुले न्यायमूर्ती रानडे महात्मा गांधी यांच्या विचारांमधून घेतल्या गेल्या.

3) शेतीविषयक काही सुधारणांमुळे शेतकरी चळवळ संथ राहिली.

4) शेतीमालाला योग्य भाव मिळावा शेतीला उद्योगाचा दर्जा मिळावा कर्जमाफी, कर्जमुक्ती, राष्ट्रीय शेती विषयक धोरण या शेतकरी संघटनांच्या प्रमुख मागणी आहेत.

**ब) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** ( प्रत्येकी 2 गुण )

1) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.



कामगार चळवळ

( आदिवासी चळवळ, स्त्री- मुक्ती चळवळ

2) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.

राजा राममोहन रॉय

सावित्रीबाई फुले

स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजसुधारक

महात्मा फुले

ईश्वरचंद्र विद्यासागर

पंडिता रमाबाई

**प्रश्न क्र. 9) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** ( प्रत्येकी 2 गुण )

1) ग्राहक चळवळ अस्तित्वात आली.

**उत्तर:**

1) 1986 साली ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला.त्यानंतर ग्राहक चळवळीचा उदय झाला.

2) व्यवस्थेतील बदलांमुळे तसेच समाजव्यवस्था बदलल्यामुळे ग्राहकांना भेसळ, वस्तूंची वाढलेली किंमत, वजन मापातील फसवणूक अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा फसवणुकींपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी ग्राहक चळवळ सुरुवात झाली.

2) चळवळ म्हणजे काय?

**उत्तर:**

1) चळवळ ही एक सामायिक कृती असते त्यात अनेक लोकांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असतो.

2) चळवळ हे लोकांचे विशिष्ट प्रश्नां भोवती निर्माण झालेले संघटन असते.

3) चळवळीसमोर एखादा निश्चित सार्वजनिक हेतू अथवा प्रश्न असतो.

4) चळवळीला नेतृत्व असते नेतृत्वामुळेच चळवळ क्रियाशील राहते.

5)कोणत्याही चळवळीला जनतेचा पाठिंबा आवश्यक असतो. चळवळ ज्या प्रश्नाभोवती निर्माण झाली आहे. तो प्रश्न जनतेला आपला वाटला पाहिजे.

3) पर्यावरण चळवळीचे कार्य स्पष्ट करा.

**उत्तर:**

1) पर्यावरणाचा ऱ्हास केवळ भारतातील च नव्हे तर जागतिक गंभीर समस्या बनली आहे.

2) पर्यावरणाचा रास थांबवावा आणि शाश्वत विकासाकडे जगाची वाटचाल व्हावी यासाठी अनेक जागतिक परिषदा घेतल्या जात आहेत.

3) भारतातही पर्यावरणातील विविध घटकांच्या सुधारण्यासाठी अनेक चळवळी झाल्या व सक्रिय आहेत.  उदा.चिपको आंदोलन.

4) जैवविविधतेचे संरक्षण, पाण्याच्या विविध स्त्रोतांचे जतन, जंगल आवरण, नद्यांचे प्रदूषण, हरित पट्ट्यांचे संरक्षण, रासायनिक द्रव्यांचा वापर व त्यांचे दुष्परिणाम इत्यादी प्रश्न घेऊन पर्यावरण चळवळ



समाप्त

भारतात संघर्ष करीत आहे.

## प्रकरण ५. भारतीय लोकशाही समोरील आवाहने

**१)** जगातील सर्वच लोकशाही राष्ट्रापुढील मोठे आव्हान म्हणजे ...........

अ. धार्मीक संघर्ष

ब. नक्षलवादी कारवाया

**क. लोकशाहीची पाढेमुळे आणखी खोलवर नेणे**

ड. गुंडगिरीला महत्तव

**२)** .............. वाढल्यामुळे समाजात धार्मिक तेढ निर्माण होते.

**अ. जमातवाद**

ब. दहशतवाद

क. भ्रष्टाचार

ड. जातियता

**प्र. ७) चुक की बरोबर :— सकारण स्पष्ट करा**

**१) डाव्या उग्रवादी चळवळीत आज शेतकरी व आदिवासी यांच्या समस्यांचे महत्तव वाढत आहे.**

**उत्तर :—** हे **विधान चूक आहे कारण :—**

१) जमीनदारानी शेतकरी आणि आदिवासी यांच्या जमिनी बळकावल्या

२) यामुळे हा अन्याय दुर करून भुमीहिनांना जमिनी परत मिळवुन देण्यासाठी नक्षलवादयांनी म्हणजेच डाव्या उग्रवादांनी चळवळ सुरू केले.

३) परंतु मुळ उददेश बाजुला पळुन हि चळवळ सरकारविरोधात हिंसक कार्यवाहया करू लागली. पोलीसांवर हल्ले करू लागले. म्हणुन डाव्या उग्रवादी चळवळी आज शेतकरी व आदिवासी यांच्या समस्यांचे महत्तव कमी झाले आहे.

**२) लोकशाही टिकवण्यासाठी लक्ष राहावे लागते.**

**उत्तर :— हे विधान बरोबर आहे कारण :—**

१) लोकशाही व्यवस्था केवळ शासकीय पातळीवर असून चालत नाही, तर ती लोकापर्यंत पोहोचली पाहिजे.

२) लोकशाहीतील लोकांचे हक्क, स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी सतत जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

३) भ्रष्टाचार, हिंसा गुन्हेगारीकरण यांसारख्या लोकशाहीला आव्हान देणा—या समस्या वेळीच नष्ट कराव्या लागतात. त्यासाठी लोकांना आणि शासनालाही सतत दक्ष राहावे लागते.

**प्र. ८) अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा**

**१) भ्रष्टाचार**

**उत्तर :—** १) कायदयाला भंग करून,वाजवीपेक्षा अधिक पैसे घेणे, दुस—यांना नाडणे याला **'भ्रष्टाचार'** असे म्हणतात.


२) भ्रष्ट्राचार केवळ आॅर्थिक स्वरूपातच असतो, असे नाही, तर सामाजिक, राजकीय, धार्मिक, सरकारी पातळीवर असा सर्वत्र होत असतो.

३) अधिकारांचा गैरवापर हाही भ्रष्टाचारच असतो. निवडणुकीतील गैरप्रकार, लाच देणे वा स्विकारणे, मालाची साठवणूक करून अधिक किमतीला विकणे हे सर्व प्रकार भ्रष्टाचाराचेच.

४) भारतात सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांत भ्रष्टाचार ही मोठी समस्या बनलेली आहे. वाढत्या भ्रष्टाचारामुळेच लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडू शकतो.

**प्र. ८) ब) पुढील संकल्पचित्रे पुर्ण करा**


**१. प्रश्न/उत्तर**




**प्र. ८ ब)**

**२. समाजात लोकशाही रूजवण्यासाठीचे मार्ग :—**

**उत्तर :—**



**प्र. ९) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा**

**१) वाढत्या भ्रष्टाचाराचे कोणते परिणाम होतात ?**

**उत्तर :—** भ्रष्टाचार वाढत गेल्यास, त्याचे पुढील परिणाम होतात —

१) राजकीय आणि प्रशासकीय स्तरांवर भ्रष्टाचार वाढून सरकारची कार्यक्षमता कमी होते. २) सरकारी कामे पूर्ण होण्यास बराच विलंब होतो.

३) सार्वजनिक सोई व सुविधा यांची गुणवत्ता घसरते.

४) वाढत्या घोटाळयांमुळे लोकशाही व्यवस्थेबददल लोकांत अविश्वासाची आणि असमाधानाची भावना निर्माण होते.

५) लोकांचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडून देशात अराजक माजू शकते.

**२)राजकीय प्रक्रीया पारदर्शक होण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात ?**

**उत्तर :— १)** निवडणुका खुल्या आणि न्याय वातावरणात घेण्यासाठी स्वतंत्र निवडणुका निर्माण केली जाते.

२) राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी कडक शिक्षा देणारे कायदे निर्माण केले जातात.

३) राजकारणात आणि निवडणुकीत भ्रष्टाचार होवु नये म्हणुन कायदे निर्मिती केली जाते.

४) भ्रष्टाचारी गुन्हेगार अशांना दोन वर्षापेक्षा कालावधीची शिक्षा झाली असल्यास त्यांना राजकीय प्रक्रीयेत सहभागी होण्यास न्यायालयानी बंदी घातली आहे.

## --- श्रेय नामावली ---

| अ.क्र. | सुलभकांचे नाव | पद | शाळा / कॉलेज नाव |
|---|---|---|---|
| 01 | **श्री शिवप्रसाद नारायणराव मठपती** | सहा.शिक्षक | श्री सरस्वती विद्यालय प्रशाला, गंगाखेड ता.गंगाखेड जि.परभणी |
| 02 | **श्री विजयकुमार विनायक भवारी** | उच्च मा.शिक्षक | एस.एन.डी.टी.कनिष्ठ महिला महाविद्यालय,कर्वे रोड , पुणे 38 |
| 03 | **श्री मनोजकुमार दगडू जाधव** | उच्च मा.शिक्षक | राहुरी एज्युकेशन सोसायटीचे कनिष्ठ महाविद्यालय राहुरी,जि.अहमदनगर |
| 04 | **श्री मनोज वासुदेव खडके** | सहा.शिक्षक | काशीबाई उखाजी कोल्हे विद्यालय व जुनिअर कॉलेज, जळगाव |

| | | | |
|---|---|---|---|
| 05 | **श्री नरेन्द्र गुरुदास कन्नाके** | उच्च मा.शिक्षक | नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय शेगाव बूज |
| 06 | **श्री भापकर प्रकाश आबासाहेब** | सहा.शिक्षक | **MARUTI BADHE MEMORIAL SCHOOL,KONDHWA(BK)** |
| 07 | **श्री मनोज शालिग्राम महाजन** | सहा.शिक्षक | **IES NAVI MUMBAI HIGHSCHOOL VASHI** |
| 08 | **श्री अतुल रमेशराव पडोळे** | सहा.शिक्षक | जनता गर्ल्स हायस्कूल शेंदुरजना घाट ता.वरुड अमरावती |
| 09 | **श्री डॉ.बापू देवराम शिरसाठ** | सहा.शिक्षक | पी.आर.हायस्कूल ,धरणगाव जिल्हा जळगाव |

# BEST OF LUCK.......!!!!!